म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ..... कां.वा.
दा. २५

# सरदार वरडकाराम

BVBK-0400025

नों. क्र. २५

म. ग्रं. सं. ... शाखा.

२५

विषय किशोर ... ४...

BVBK-0400025

म. ग्रं. सं., ... शाखा.
दा. ... दिनांक ......
विषय ... ........

# सरदार कडकराम

लेखक
**अशोक देशपांडे**
बी. ए., बी. टी.

तीन रुपये

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे - २

सर्व हक्क लेखकाधीन

प्रकाशक : केशव वामन जोशी ◻ २५ बुधवार पेठ ◻ अप्पा बळवंत चौक ◻ पुणें २

मुद्रक : शशिकान्त महादेव देव ◻ सुलभ मुद्रणालय ◻ २९१ शनिवार पेठ ◻ पुणें ३०

कुमारांनो...!

एका जगप्रसिद्ध कादंबरीचें हें स्वैर रूपान्तर तुमच्या हातीं मोठ्या उमेदीनें देत आहोंत. मूळचें स्पेनचें वातावरण लेखकांनीं कौशल्यानें बदलून पेशवाईच्या अखेरच्या काळानंतरचें चित्रण केलें आहे. मराठी वेषांतील 'सरदार कडकराम' हा जगप्रसिद्ध कल्पनासम्राट् तुम्हांला निश्चित आवडावा......!

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. लढाईची तयारी | ... | १ |
| २. सरदारकी मिळाली | ... | ६ |
| ३. कामगिरीस आरंभ | ... | १४ |
| ४. राक्षस.... ! राक्षस.... ! | ... | २० |
| ५. राजकुमारीची मुक्तता | ... | २७ |
| ६. घोडदळाशीं सामना | ... | ३६ |
| ७. राजमुकुट सांपडला | ... | ४३ |
| ८. राजकुमारीवरील संकट | ... | ५० |
| ९. फडकरामचा डाव | ... | ६३ |
| १०. शंकरचा पराभव | ... | ७१ |
| ११. अग्निलोकांत प्रवेश | ... | ७९ |
| १२. फडकरामची सरदारकी | ... | ८८ |
| १३. अखेरचा पराभव | ... | ९५ |

१

# लढाईची तयारी

" खबरदार....! एक पाऊल पुढं टाकाल तर राईराईएवढ्या चिंधड्या करून टाकीन....!"

" तुम्ही काय समजतां? कुणासमोर उभे आहांत तुम्ही?"

" ह्या तलवारीचा पराक्रम माहीत नाहीं तुम्हांला?" भेकडांनो.... जा....काळं करा....! ही तलवार म्यानांतून मोकळी होण्यापूर्वीच थोबाडं फिरवा....!"

प्रत्युत्तर नसलेला हा संवाद पाहून आश्चर्य वाटण्याचें कांहीं एक कारण नव्हतें! सरदार कडकरामच्या घरांत हें सारें सर्वांना परिचित होतें....! तलवारीचा खणखणाट....प्रचंड आवाजांतील बोलणें....ढाल–तलवार घेऊन एकदम वाड्याच्या आवारांतून धांवणें हें सारें सरदार कडकरामच्या वाड्यांत नित्याचें होऊन बसलें होतें.

पेशवाईचा शेवट झाला होता. दुसऱ्या बाजीरावानें मराठी साम्राज्य इंग्रजांच्या झोळींत केव्हांच टाकून दिलें होतें. लढाईचा धसका घेतलेली मराठी जनता नुकतीच स्थिरावूं लागली होती. मराठ्यांचे महापराक्रम संपुष्टांत आले होते. लावणी व तमाशाचे फड सरत आले होते. उरल्या होत्या फक्त पौरुषाच्या कथा. अटकेपार झेंडे नेणाऱ्या मराठ्यांच्या युद्धकथा, छत्रपती शिवरायांनीं स्थापलेल्या मराठी साम्राज्यशाहीच्या स्थापनेच्या वीरकथा, थोरल्या बाजीरावांचा पराक्रम नि नाना फडणिसांचें शहाणपण, म्हातारे-कोतारे आपापल्याला पोराबाळांना तिखट-मीठ लावून अस्तंगत पौरुषाचें

वर्णन करीत होते.

कडकराम ह्याला अपवाद नव्हता. पेशवाईच्या शेवटकाळीं तो जरी वयानें लहान होता तरी त्यानें आपल्या वडिलांचा पराक्रम पाहिला होता. सरदार बापू गोखल्यांच्या सेनेंत त्याचे वडील सुभेदार होते. पण कडकराम लहानपणापासून प्रकृतीनें दुबळा होता. अंगकाठी अतिशय शेलाटी. सखे-सोबती सारे त्याला लहानपणापासून सतावीत असत. त्याचे कांहींही चालत नसे. पण त्याचा नाइलाज होत होता. आपल्यातील हा दोष माहीत असूनही कडकराम व्यायाम करीत नव्हता की तालमींत जात नव्हता. हळूहळू मोठा होत गेल्यावर त्याला पूर्वजांच्या पराक्रमाच्या कथा ऐकण्याचा फार नाद लागला. एखादा म्हातारा दिसला कीं, तो त्याला सतत नाना प्रश्न विचारून भंडावून सोडीत असे. ह्या अशा गोष्टींचें त्याला इतकें वेड लागलें कीं, तो कालांतरानें त्याच जुन्या काळांत वावरल्यासारखें वागूं लागला .... बोलूं लागला ! त्याचा पोषाख लढाईवर जाणाऱ्या मावळ्याचा असूं लागला. कम-रेला सतत तलवार, पाठीला ढाल, दाराशीं एक घोडें ! तो प्रत्यक्षांत जरी कधीं लढाईवर गेला नव्हता तरी लढाईचें सारें तंत्र त्याला माहीत होतें ! सरदार लोक कसे वागत होते याची त्याला पुरेपूर माहिती होती. सर-दारांच्या जीवनाचा त्याच्या मनावर इतका खोल परिणाम झालेला होता कीं, तो स्वतःला ‘ सरदार कडकराम ’ म्हणवून घेत असे. जुन्या बखरींतून सरदारांचें जसें वर्णन केलेलें असायचें तसा वागत असे. त्यासाठीं त्यानें किती तरी जुन्या बखरी गोळा केल्या होत्या ! त्या तो सतत वाचीत असे ! त्याला स्वप्नेंहि नेहमीं लढाईचींच पडत. झोपेंतून तो सतत लढाईच्या आवेशांत उठत असे व काल्पनिक लढाई खेळत असे. याशिवाय भुताखेतांच्या व राक्षसांच्या कथांचाहि त्याच्या मनावर विलक्षण पगडा होता. परीकथा व जादूगारांच्या कथाहि त्याला मोहवीत असत. आपल्या सभोंवतीं नेहमीं पऱ्या-राक्षस जादूगार वावरत आहेत असेंहि त्याला वाटायचें ! एकूण कडक[illegible] म्हणजे एक विलक्षण माणूस होता. वरील साऱ्या गोष्टींनीं तो जणुं [illegible] झपाटलेला होता. त्याचें व्यक्तिमत्त्व याच गोष्टींनीं घडत गेलेलें होतें.

त्याच्या घरांत त्याची फक्त एक पुतणी होती. आपल्या ह्या लहरी [illegible] त्याचा ती मोठ्या दक्षतेनें सांभाळ करीत असे. बकुळाला आपल्या [illegible]

त्याच्या स्वभावधर्माची पुरेपूर कल्पना आलेली होती. कडकराम तिच्याशीं बोलतांनाहि सरदाराच्या ढंगांत बोलत असे. त्यांत तिला नवीन असें कांहीं राहिलें नव्हतें. दिवसेंदिवस बकुळा अगदीं त्रासून जाऊं लागली. कडकरामचा लहरीपणा वाढूं लागला.

त्याला जेवणखाणाहि सुचेना. सतत सरदार बनण्याचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. त्याला झोपहि लागेना. रात्रंदिवस तो आपल्या स्वतःच्या ऐतिहासिक कल्पनांच्या विश्वांत रममाण होऊं लागला. दिवसादेखील तो मोठमोठ्या लढायांचीं स्वप्नं पाहूं लागला. जवळ जवळ त्याला लढाईचें वेड लागल्यासारखें झालें. तो स्वतःला महापराक्रमी वीर समजूं लागला. जगाच्या कल्याणासाठींच आपला हा अवतार आहे असें समजूं लागला. जगातील कोणताहि अन्याय त्याला सहन होत नव्हता. ज्याच्या ठिकाणीं दुःख आहे, अन्याय आहे तें तें त्याला दूर करावयाचें होतें. दीन दुबळ्यांचें संरक्षण करावयाचें होतें. यासाठीं कोणी त्राता उरला नव्हता. कंपनी सरकारला याची जाणीव नव्हती. लोकांना आपले समजणारा कोणी उरला नव्हता. ती उणीव कडकरामला दूर करावयाची होती. त्यामुळें आपण खूप मोठमोठ्या लढाया जिंकलों आहोंत, मी मी म्हणणाऱ्या योद्ध्यांचा पराभव केला आहे....असें त्याला नेहमीं वाटत असे. शिवाय त्याची अशी कल्पना होती कीं, आपल्या तलवारीच्या जोरावर आपण महान् अशा साम्राज्याची स्थापना केलेली आहे. नाना देश जिंकले आहेत अन् देशोदेशींचे राजे आपणाला शरण आलेले आहेत. जणुं कांहीं आपण अजिंक्य सम्राट आहोंत ! सिकंदर किंवा नेपोलियन यांचा पराक्रम आपणापुढें कांहींच नव्हता ! आणि त्याच दृष्टिकोनांतून आपल्या राज्याकडे तो पाहत होता ! जनतेला जास्तींत जास्त सुखांत ठेवणें त्याला भाग होतें. आपल्या राज्याचीच नव्हे तर अलम दुनियेची व्यथा त्याला दूर करावयाची होती. ‘ हें विश्वचि माझें घर ’ ह्या कल्पनेनें तो भारावलेला होता. मग ह्या कार्यांत कितीहि अडचणी आल्या तरी त्याची त्याला पर्वा नव्हती....! तो आतां कुणालाहि दाद देणार नव्हता....! आलेल्या संकटांना पार पाडून आपलें इच्छित कार्य पूर्ण करणार होता.... मग आयुष्यभर जरी त्याला सतत कष्ट पडत गेले तरी तो ते सहन करणार होता !

आतां खरोखरच तो त्या कार्याला लागला. जगातील अन्याय दूर करण्याची तयारी सुरू केली. वीराला शोभून दिसेल असें वागण्याची तो खबरदारी घेऊ लागला. त्याच्या वडिलांचें जुनें रणसाहित्य घरांत गंजत पडलेलें होतें. दूर अडगळींतील गंजलेलें चिलखत त्यानें हुडकून काढून स्वच्छ केलें. लढतांना घालण्याचें पोलादी जिरेटोपासारखें विशिष्ट शिरस्त्राण, घासून पुसून ठेवलेली जुनी तलवार व ढालही तयार ठेवली. थोडी दांडी तुटलेला एक भालाही त्याला सांपडला. ह्या साऱ्या वस्तू पाहून त्याचा आनंद गगनांत मावेना. तो आतां खरोखरचा सरदार शोभून दिसणार होता. वाड्याच्या मागील बाजूस नेहमीं दिसणारें मरतुकडें घोडें त्यानें आतां आपल्या गड्यास आणण्यास सांगितलें. घोड्याला चारा-पाणी कधींच वेळेवर मिळत नव्हतें. त्यामुळें त्याचीं कातडें हाडें एकत्र झालें होतें. त्याच्या अंगांत कसलेंही त्राण राहिलेलें नव्हतें. परंतु हा घोडा त्याला पंचकल्याणी अरबी घोड्यासारखा वाटूं लागला. साऱ्या जगांत असें ' जनावर ' कुठेंही नसेल असें त्याला वाटूं लागलें.

प्रत्येक सरदाराचा एक आवडता घोडा असतो हें त्याला माहीत होतें, तेव्हां आपल्या ह्या घोड्याचें नांव काय ठेवावें या विचारांत त्यानें चार-पांच दिवस काढले. पण नांव कांहीं सुचेना. अखेर त्यानें त्याला ' टपल्या ' म्हणायचें ठरवलें ! कारण टपला मारल्याशिवाय तो जागचा हलतहि नसे !

आतां प्रत्येक मोठ्या सरदाराप्रमाणें आपणही स्वतःचें कांहीं तरी चांगलें नांव ठेवलें पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. आपल्या नांवावरूनच जगाला आपली ओळख पटली पाहिजे असे त्याला वाटूं लागलें. नांवावरूनच लोकांनीं आपल्या पराक्रमाची कल्पना यायला हवी. नांव ऐकूनच लोक चळचळ कांपायला पाहिजेत. बऱ्याच दिवसांनंतर त्याला ' कडकराम ' हें नांव योग्य वाटलें. सुमानरावाचा तो एकदम ' कडकराम ' बनला ! सरदार कडकराम ! मोठी जादू वाटली त्याला ह्या नांवांत !

आतां तो पराक्रमी सरदार बनल्यानंतर त्याला एखाद्या राजकुमारी-बरोबरच विवाह करणें भाग होतें. कोणी फडतूस दहाजणीसारखी गंगी किंवा

ठकी चालणार नव्हती. त्याची पत्नीही अतिशय सुंदर असायला हवी होती. आपल्या डोळ्यांसमोर मग तो आपल्या भावी पत्नीचें रूप-सौंदर्य न्याहाळूं लागला. त्याच्या डोळ्यांसमोर अखेर एक स्त्री तरळूं लागली.... ! त्यानें तिला ' पद्माराजे ' म्हणण्यास आरंभ केला !

त्याची सुंदरपूरची पद्माराजे हीच जगांतील एकमेव सुंदर तरुणी आहे असें त्याला वाटूं लागलें ! हिचा लाभ झाल्याशिवाय त्याला आतां चैन पडणार नव्हतें ! ह्या काल्पनिक पद्माराजेचें रूप-वैभव न्याहाळण्यांत तो रात्रंदिवस मग्न झाला— !

★ ★

२

# सरदारकी मिळाली

आतां उशीर लावण्यांत अर्थ नाहीं असे विचार कडकरामच्या मनांत येऊं लागले. आपली आंखलेली योजना त्याला पार पाडायची होती. तो फक्त संधि पाहत होता. बकुळाचें त्याच्यावर फार लक्ष होतें. त्यामुळें अनेक-वेळां त्याचे बेत धुळीला मिळाले होते. शिवाय सर्जा शिंपी व दादू न्हावी त्याच्याकडे जवळजवळ पडून असत. त्याचा वाढत असलेला विक्षिप्तपणा त्यांच्याहि लक्षांत आलेला होता. शिवाय बकुळानें त्यांना सांगूनहि ठेवलें होतें. त्यामुळें त्या दोघांचें कडकरामच्या सर्व हालचालींवर लक्ष होतें. ह्या तिघांच्या तावडींतून कडकरामची सुटका होत नव्हती.

अखेर एके दिवशीं भल्या पहाटे बकुळा सारखझोंपेंत असतांना कडकरामला पळून जाण्याची संधि लाभली ! अजिबात आवाज न करता त्यानें मागील दाराची कडी काढली. त्या जवळ झोपलेल्या गड्यासहि त्याची चाहूल लागली नाहीं. टपल्या मागील बाजूसच होता. त्यालाहि हळूच सोडून पाठीमागील दरवाजानेंच तो लगबगीनें बाहेर पडला. त्याचा पोषाख संपूर्णपणें एका योद्धयाचा होता. त्यानें खास शिवून घेतलेली सुरवार घातली होती अंगांत चिलखत घालून त्यावर पायघोळ लांब कुडता घातला होता. कुमरेला पट्टा घालून तलवार खोवलेली होती. पाठीवर ढाल टाकून शिवाय हातांत भाला होता. संरक्षणार्थ डोक्यावर तें जुनें पोलादी शिरस्त्राण होतेंच. महायुद्धाच्या तयारीनें व जगाच्या कल्याणार्थ अखेर हा महापराक्रमी कडकराम घराबाहेर पडला. तो वारंवार स्वतःकडे पाहत होता. तो विलक्षण हरखून गेला होता. अंगावरील त्या विशिष्ट पोषाखामुळें त्यांच्या अंगांत विलक्षण जोम आल्या-

सारखें त्याला वाटूं लागलें होतें !

आतां जगांतील दुःख दूर होणार होतें. दीन-दुबळ्यांवरील अन्याय सरणार होता. परंतु टपल्या मात्र जागचा फारसा हलत नव्हता. त्याला मारमारून तो दमला. सारख्या टपल्या दिल्याशिवाय तो हलत नव्हता. कसा तरी तो जरा दूरवर आला. तेवढ्यांत त्याच्या मनांत एक विचार आला. तो सरदार बनून जग जिंकण्यास चालला होता. पण तो खरोखरचा सरदार होता काय ? आपणहून कुणी सरदार होते का ? अशा तऱ्हेनें सरदार बनतां येत नाहीं हें त्याला माहीत होतें. त्यासाठीं कांहीं तरी महान कार्य करायला हवें होतें. एखादी जंगी लढाई जिंकणें भाग होतें. मग कुणी तरी ' सरदार ' हा किताब बहाल करायला हवा होता. तेव्हां तो प्रथम मिळवायला भाग होतं. रस्त्यात एके ठिकाणी तीन बाजूने रस्ते जात होते. कोणत्या बाजूला जायचें ! प्रश्न पडला. त्यानें घोड्याचा लगाम सैल केला ! घोडें जिकडे वळेल तिकडे जाण्याचें ठरलें. टपल्या उत्तरेकडील रस्त्याकडे वळला. कडकरामनें त्याच दिशेनें जाण्याचें ठरविलें. पुढें काय करायचें, नक्की कुठें जायचें हें त्यानें कांहींहि मनांत आंखलेलें नव्हतें. परंतु कोणत्या का उपायानें आपणास ' सरदार ' ही पदवी मिळाली पाहिजे.

दिवसभर टपल्या पुढें पुढें हळूहळू जात होता. वाटेंत फारसे ओळखीचे कुणी भेटलें नाहीं हें बरें झालें ! ऊन्ह तळपत होतें. वैशाखवणवा पेटल्यासारखें भासत होतें. अधूनमधून जोरदार वादळ होत होतें. तो अतिशय थकला होता. शिवाय भूकहि अतिशय लागलेली होती. पुढें जाण्याचें फारसें त्राण राहिलेलें नव्हतें. टपल्याचीहि तीच अवस्था झालेली होती. खरें म्हणजे आतां विश्रांतीची दोघांनाहि जरूर होती. समोर दूरवर एक धर्मशाळा दिसत होती. तिथपर्यंत जाण्याचें त्यानें ठरविलें.

अखेर रडत खडत त्या धर्मशाळेपर्यंत तो आला. धर्मशाळेबाहेर दोन मुली खेळत होत्या.

परंतु कडकराम हा नेहमीं काल्पनिक विश्वांत रमणारा होता ! त्या धर्मशाळेच्या ठिकाणीं त्याला भुईकोट किल्लाच वाटूं लागला ! त्याभोंवतीं असलेली भिंत त्याला एखाद्या तटासारखी वाटूं लागली. त्याखालीं त्याला

खंदकहि दिसूं लागला ! त्या समोर खेळणाऱ्या त्या दोन मुली किल्लेदाराच्या मुली आहेत असें त्याला वाटूं लागलें. एक हत्यारी वीर आपणाकडे येत आहे हें पाहून त्या मुली घाबरून आंत पळून गेल्या !

आपल्याला पाहून त्या घाबरून आंत उभ्या आहेत हें पाहून कडकराम म्हणाला, " मुलींनो...! मला घाबरूं नका....! मी एक नामांकित सरदार आहें....जगाचें दुःख दूर करण्याची मी मोहीम हाती घेतली आहे— माझ्या पराक्रमाची तुम्हांला अजून कल्पना नाही....साऱ्या स्त्रिया मला भगिनी-समान आहेत....स्त्रियांच्यावर मी हल्ला करीत नाहीं...."

त्या दोघी कडकरामचें हें बोलणें ऐकून घाबरल्या तर नाहींच पण हंसूं लागल्या ! हें पाहून कडकरामला राग आला.

" काय ग ? " कडकराम एकदम म्हणाला. " कशासाठीं हंसताय ? किल्लेदाराच्या मुली म्हणून तुम्हांला अशा तऱ्हेनं हंसणं शोभत नाहीं. "

आपल्याला किल्लेदाराच्या मुली म्हटलेलें पाहून त्या दोघींना अजून हंसूं आलें. कडकरामला आतां राग आवरेना. धर्मशाळेचा व्यवस्थापक रामजी-बाबा हें सर्व ऐकत होता ! त्यानें खिडकींतून बाहेर डोकावून पाहिलेंहि होतें. पण अजून लक्ष दिलें नव्हतें. तो जरा विनोदी स्वभावाचा होता. चालू असलेली गंमत पाहून त्यालाहि करमणूक वाटत होती ! मानवी स्वभावाचे नित्य नवे नमुने धर्मशाळेंत येत होते. पण हा नमुना आगळाच होता. अजून गंमत करण्याच्या हेतूनें बाहेर येऊन त्या सरदाराशीं बोलण्याचा त्यानें निश्चय केला.

" महाराज—" आपले हंसूं आवरून रामजीबाबा म्हणाला; आपली कोणती सेवा मी करूं शकतों ? गरिबाच्या घरीं सरकारांचे चरण कशासाठीं लागत आहेत ?....या....आंत तर या अगोदर, मग बोलूं...."

कडकराम रामजीबाबाला किल्लेदार समजला. इतक्या मोठ्या किल्ल्याचा किल्लेदार आपणाशीं इतक्या अदबीनें वागत आहे याचें त्याला आश्चर्य वाटूं लागलें होतें. कडकराम अगदीं हरखून गेला. आपण एखाद्या सरदारासारखे दिसत आहोंत हें पाहून त्याला मनांतून अतिशय आनंद झाला.

" किल्लेदार, " कडकराम रामजीबाबाला म्हणाला, " आपण केलेल्या

माझ्या स्वागताबाबत मला समाधान वाटलें. माझ्यासाठीं फारशी तसदी घेऊं नका. उगीच थोडा वेळ मी विश्रांती घेणार आहें तुमच्या येथें."

एवढें बोलून तो मोठ्या ऐटींत घोड्यावरून खालीं उतरला व पलीकडे उभ्या असलेल्या एका सेवकास घोड्याकडे लक्ष देण्यास सांगून तो रामजी-बाबाच्या पाठोपाठ आंत गेला. त्या मुलीहि त्यांच्या मागोमाग आंत गेल्या! त्यांनीं कडकरामला चिलखत उतरवण्यास मदत केली! मोठ्या मुष्किलीनें त्यांनीं हंसूं आवरलें होतें. त्याचें शिरस्त्राण कांहीं निघत नव्हतें. तें एका दोरीनें पक्कें बांधलें होतें. दोरी कापण्यास कडकराम विरोध करीत होता. त्यामुळें रात्रभर तो टोप त्याच्या डोक्यावरच होता.

रामजीबाबांनीं त्याची खाण्याची व्यवस्था केली. टोप करकचून बांधल्या-मुळें त्याला नीट खातां येत नव्हतें. गिळतांना त्रास होत होता. पण त्याला कांहीं इलाज नव्हता. आपल्याला त्रास होत आहे हें वरून तो दाखवीतहि नव्हता.

आपल्या झालेल्या ह्या आदरातिथ्यावर कडकराम अगदीं खूष होऊन गेला. त्याला असें वाटलें कीं, किल्लेदारानें आपल्या सन्मानार्थ मोठी मेजवानी दिली. स्वागत केलें. रामजीबाबाचे त्यानें आभार मानले. परंतु त्याला एकदम आठवलें कीं, आपण अजून सरदार बनलों नाहीं ती पदवी आतां प्राप्त करून घ्यायला हवी. रामजीबाबा समोर बसला होता. त्याला त्यानें बाजूच्या खोलींत नेऊन म्हटलें,

"किल्लेदार! तुम्ही केलेल्या माझ्या ह्या स्वागतामुळें मला आतिशय आनंद झाला आहे. आतां माझं एकच मागणं तुमच्याजवळ आहे!"

"मी आपणाला काय देणार." रामजीबाबा म्हणाला.

त्याचा रोख रामजीबाबाच्या लक्षांत आला नव्हता.

"किल्लेदार," कडकराम म्हणाला, "तुम्ही मला एक गोष्ट दिली पाहिजे. ती मिळेपर्यंत मी हलणार नाहीं इथून...."

रामजीबाबा गोंधळून गेलेला पाहून कडकराम हंसून म्हणाला, "चिंता करूं नका.... मी आपणाला एक साधी गोष्ट मागणार आहें. मला पैसा-अडका—सोनेंनाणें नको आहे. माझी फक्त एक इच्छा पूर्ण करा."

“मला शक्य असेल तर पूर्ण करीन.” रामजीबाबा म्हणाला.

“किल्लेदार,” कडकराम गंभीरतेनें म्हणाला, “माझं कांहीं जादा मागणं नाहीं. मला फक्त तुम्ही ‘सरदार’ ही पदवी द्या ! मोठा समारंभ साजरा करा, पण मला सरदार करा ! एकदा मी सरदार झालों कीं, जग जिंकण्यास व त्यांतील दुःखें दूर करण्यास मी मोकळा होईन....तेव्हां माझ्या-वर कृपा करा व मला सरदार बनवा....!”

कडकरामचें हें विक्षिप्तपणाचें बोलणें ऐकून रामजीबाबाला हंसूं आवरेना. आपण करीत असलेलें नाटक त्यानें पुढें पूर्ण करण्याचें ठरविलें व कडकरामला सरदार बनविण्याचें कबूल केलें. हें ऐकून कडकरामचा आनंद गगनांत माचेना.

“किल्लेदार,” कडकराम म्हणाला, “मी आज रात्रभर किल्ल्यावर पहारा करतों. जर कोणी किल्ला सर करण्याचा प्रयत्न केलाच तर त्यांचा पुरा निकाल लावीन. सकाळीं मला तुम्ही ‘सरदार’ हा किताब द्या !”

“ठीक आहे.” रामजीबाबा हंसूं आवरीत म्हणाला, “कडक हारा व्हायला पाहिजे. डोळ्यांत तेल घालून सर्वत्र हिंडा. शत्रु दगलबाजी करील. दगाफटका होईल. सांभाळून रहा. हातांत नंगी तलवार असूं द्या. असो. आपल्याजवळ किती खजिना आहे?”

“खजिना ?” कडकराम आश्चर्य वाटून म्हणाला, “त्याची काय जरुरी आहे ?”

“वा ऽ” रामजीबाबा म्हणाला,” सरदाराजवळ भरपूर खजिना असणं फार जरूरीचं आहे. त्याशिवाय तुम्ही फौजफाटा कसा ठेवणार ?”

“त्याची आत्ताच जरुरी नाहीं.” कडकराम म्हणाला,

“शिवाय खरा बहादूर आपला पैसा जवळ बाळगीत नसतो. तो मिळवून आणतो.”

“हे पुस्तकी व्यवहार झाले.” रामजीबाबा म्हणाला, “सरदाराजवळ सुरुवातीला तरी त्याचा स्वतःचा पैसा असणं आवश्यक आहे. नोकर माणसं ठेवणं जरूर आहे. ऐन वेळीं उपयोगी पडणारं औषधपाणी आवश्यक आहे. लढाईंत जखमा होतात त्यासाठीं मलमपट्टी हवी. हें कांहीं आहे का तुमच्या-जवळ ?”

कडकराम गोंधळून गेला. वरील साऱ्या गोष्टी सरदाराजवळ असणें आवश्यक होतें. ह्या गोष्टी सुचविल्याबद्दल किल्लेदाराचें त्यानें पुन्हां पुन्हां आभार मानले.

धर्मशाळेंत मागील बाजूला एकीकडे पाण्याची टाकी होती. तेथें कडकराम पहाऱ्यासाठीं थांबला. त्यानें एका हातात ढाल घेतली होती व दुसऱ्या हातांत भाला सज्ज ठेवला होता. अधूनमधून तो सगळीकडे हिंडून येत होता. दूरवरचे कानोसे घेत होता. कोठें कांहीं वाजलें कीं, पटकन धांवून जात होता. मधूनच त्याला घोड्यांच्या टापांचे आवाज दुरवरून ऐकूं येत असत. शत्रू फार मोठ्या संख्येनें हल्ल्यासाठीं येत आहे. असे वाटून तो भाला रोखून त्या दिशेला उभा राही.

मध्यरात्रीच्या सुमारास कांहीं बैलगाड्या धर्मशाळेंत आल्या. लोक बाजारासाठीं चाललेले होते. बैलांना पाणी पाजण्यासाठीं एक गाडीवान त्या पाण्याच्या टाकीजवळ आला. आपणाकडे कुणी तरी हल्ला करण्यास येत आहे असें वाटून कडकराम गरजला, " खबरदार....! एक पाऊल पुढें टाकशील तर याद राख ! पुढें येण्याचें धाडस उगाच करूं नकोस....विनाकारण प्राणाला मुकशील. तूं कोण आहेस हें सांग मुकाट्यानं अगोदर....! "

गाडीवानाला रामजीबाबानें सारें सांगितलें होतें. त्यामुळें न घाबरतां बैलाला पुढें करून तो गाडीवान पुढें येऊ लागला. हें पाहतांच कडकरामला राग आला. तो भाला घेऊन त्याच्या अंगावर धांवला. त्याला जखमी केलें. बैल पळून गेले. त्या पाठोपाठ दुसरा गाडीवान बैल घेऊन येतांच त्याच्यावरहि कडकरामनें जोरदार हल्ला केला. दोन्ही गाडीवानांचा आरडाओरडा ऐकून धर्मशाळेंत मुक्कामाला असलेले इतर लोक लगेच धांवत आले. सशस्त्र कडकराम पाहून त्यांनी त्याच्यावर दगडाचा मारा चालू केला. कडकराम मोठ्या शर्थीनें ते सारे दगड ढालीवर घेत होता. आपल्यावर शत्रू फार मोठ्या प्रमाणांत तुटून पडला आहे असें वाटून त्याला चेव चढला. आतां चारी बाजूंनीं त्याच्यावर दगडफेक चालू होती. किल्लेदार आपल्या मदतीला कां येत नाहीं याचेंच त्याला आश्चर्य वाटत होतें. ढालीवर न पडलेले दगड त्याला लागून तो रक्तबंबाळ झाला होता. तेवढ्यांत रामजीबाबा धांवत आला

व त्यानें लोकांना आवरलें. हा एक वेडा आहे. त्याच्या नादाला न लागत जखमी गाडीवानावर उपकार करण्यास लोकांना सांगितलें. लोक त्या गाडीवानांना घेऊन आंत गेले.

रामजीबाबा कडकरामजवळ जाऊन म्हणाला,

" सरकार ! चुकीची क्षमा असावी. ह्या लोकांनी तुम्हांला विनाकारण त्रास दिला. ते मूर्ख होते. त्यांनी दिलेल्या त्रासाबाबत त्यांच्यातर्फे मी तुमची माफी मागतों. आतां आपला पहारा बंद करा. मध्यरात्र उलटून गेली आहे. आतां त्याची जरूर नाहीं. कुणीकडूनहि हल्ला होण्याची भीति नाहीं. चला, आतां विश्रांती घ्या....! सकाळीं तुम्हांला सरदार बनविण्याचा मोठा समारंभ आपण करूं.... "

हें ऐकून कडकरामला जग जिंकल्याचा भास झाला. आतां त्याला स्वर्ग दोन बोटें उरल्यासारखें वाटलें !

त्याला झोंप अशी लागली नाहींच. केव्हां एकदां सकाळ होते व केव्हां एकदां आपणाला सरदार ही पदवी मिळते असें त्याला वाटलें.

सकाळ होतांच रामजीबाबांनीं मोठा समारंभ आयोजित केला. धर्मशाळेंतील सारे लोक गंभीरतेनें हा कार्यक्रम पाहात होते व अनावर झालेलें हंसूं लपवीत होते.

कडकरामनें आपला युद्धाचा पोषाख केला होता व तो गुडघे टेकून एखाद्या वीरासारख्या रामजीबाबासमोर उभा होता. रामजीबाबाच्या मुलींनीं प्रथम कडकरामला कुंकू लावून ओवाळलें होतें. रामजीबाबा आपल्या हिशोबाच्या वह्या हातांत घेऊन मंत्र म्हटल्यासारख्या सुरांत कांहीं तरी पुटपुटत होता. जणुं कांहीं एखादा धार्मिक समारंभ पार पाडला जात होता. कांहीं वेळानें रामजीबाबानें एक जुनी गंजलेली तलवार तीन वेळां हवेंत फिरवून कडकरामाच्या कपाळाला लावली. त्या रात्रींच त्यानें ती अडगळींतून हुडकून ठेवली होती. मग तलवारीला कुंकू लावून ती कडकरामच्या ताब्यात त्यानें दिली व जयघोष केला, " सरदार कडकराम कीं " .... " जय ! "

लोक म्हणाले, " सरदार कडकराम कीं– "

" –जय "

“ सरदार कडकराम कीं— ”

“ जय ”

आणि सर्व लोक हा फुकट तमाशा पहायला मिळतो म्हणून हंसत हंसत पांगले.

आतां सरदार कडकरामला पुढील कार्य करण्याची घाई झाली होती. तो खरोखरचा सरदार बनलेला होता. रामजीबाबाचा मोठ्या आदरानें निरोप घेऊन त्यानें टपल्याला बाहेर काढले.

मोठ्या दिमाखानें तो ऐटींत टपल्यावर स्वार झालेला होता. त्यानें त्याला जोरानें टाच मारतांच रात्रीं भरपूर चारा खाल्लेला टपल्या एकदम उधळला !

★ ★

# ३

# कामगिरीस आरंभ

टपल्या वेगानें पुढें पुढें जात होता. कडकराम मोठ्या खुषींत होता. पुढें कोठें जायचें हें अजूनहि त्यानें ठरविलें नव्हतें. टपल्या नेईल तिकडे तो जात होता. लगाम सैलच ठेवला होता. थोडें पुढें जातांच कडकरामला कुणाच्या तरी रडण्याचा आवाज ऐकूं आला ! त्याची उत्सुकता वाढीला लागली. कुणावर तरी अन्याय होत असल्याची त्याला जाणीव झाली. त्यानें टपल्याला थांबवले व इकडे तिकडे आवाजाच्या रोखानें तो पाहूं लागला. पण शोध लागत नव्हता. जरा पलीकडे दाट झाडी होती. त्यापलीकडून आवाज येत होता. कडकरामनें टपल्याला एका जवळच्या झाडाला बांधलें व तो तलवार हातांत घेऊन पुढें निघाला. जरा पुढें जातांच त्याला एका मुलाला झाडाला बांधल्याचें दिसलें. त्या पोराला झाडाला बांधून कुणी तरी त्याला चाबकानें मारीत होतें. मुलगा गुराप्रमाणें ओरडत होता. कडकराम आपल्या-प्रमाणें दुसऱ्यालाहि योद्धा समजत असे. त्याच थाटांत तो सर्वांशीं बोलत असे.

" बहाद्दूर, " कडकराम त्या मुलाला मारणाऱ्या माणसाजवळ जाऊन म्हणाला, " तुझ्यासारख्या वीराला त्या लहान पोराला मारणें शोभून दिसत नाहीं. कशासाठीं त्याच्यावर वारंवार हल्ला करीत आहेस ? त्यानें तुझा कसला अपराध केला आहे ? "

कडकरामचा पोषाख व अवतार पाहून तो मारणारा माणूस मनांतून अगदीं वाबरून जाऊन म्हणाला, " सरदार ! हा माझा नोकर आहे. हा माझीं गुरं सांभाळतो. परंतु एखादं जनावर कुणी पळवून नेलं तरी ह्याच्या

लक्षांत येत नाहीं. आपल्याच तंद्रींत असतो हा. मग त्याच्या पगारांत मला कपात करावी लागते. पण तरीहि याचं वागणं कांहीं सुधारत नाहीं."

"हे पहा—" कडकराम गरजला, "तें मला कांहीं सांगूं नका. त्याला तात्रडतोब कैदेंतून मुक्त करा....त्याचा सर्व पगार चुकता करा.... ए पोरा....! सांग रे तुझे किती पैसे येणे आहे!"

"सरकार—" तो मुलगा म्हणाला, "माझा सात महिन्यांचा पगार यांनीं दिला नाहीं."

"महाराज—" तो माणूस आजिजीनें म्हणाला, "हा खोटं बोलत आहे. याला दोन-दोन कपडे, चपला व एकदां आजारी पडल्यावर औषधपाणी मी केलं आहे. तेव्हां ते पैसे मी काटणार आहे."

"गप्प बैस—" कडकराम त्या माणसावर ओरडून म्हणाला, "मला असलं कांहीं एक सांगूं नकोस....त्याचे सर्व पैसे त्याला मिळायला हवेत. त्याला बेदम बडवून तूं अर्धमेला कशासाठीं केला आहेस याचा जबाब मला अगोदर हवा आहे."

"सरकार—" तो अजून घाबरून म्हणाला, "आपली आज्ञा मंजूर आहे...पण आतां माझ्याजवळ पैसे नाहींत. घरीं जाऊन त्याला सर्व पैसे देऊन टाकतों."

"ठीक आहे." कडकराम खूष होऊन म्हणाला, "परंतु लक्षांत ठेव...जर त्याचे सारे पुरते पैसे दिले नाहींस तर याद राख...तुकडे तुकडे करून टाकीन तुझे...तूं अजून मला ओळखलेलं नाहींस...जा चालता हो...!"

कडकरामला वंदन करून तो माणूस त्या पोराला घेऊन गेला. ह्या घटनेमुळें कडकराम अजून फुगून गेला. लोक त्याचा आदर तर ठेवत होतेच, पण त्याला आतां भिऊं लागलेले पाहून तो आनंदून गेला. लोक आपल्याला सरदार मानूं लागलेले पाहून तर त्याला विलक्षण गर्व होत होता. आज एकाचें दुःख तो दूर करूं शकला होता. तलवारीच्या जोरावर त्यानें आज हा मोठा विजय संपादन केला होता.

वाटेंत पुन्हां एके ठिकाणीं चार रस्ते फुटले होते. कडकरामनें लगाम

सैल केला. टपल्या एका रस्त्याला वळला. तो रस्ता त्याच्याच गांवाकडे जात होता.

जरा दूर गेल्यावर त्याला एक व्यापाऱ्यांचा तांडा दिसला. त्यांच्याबरोबर कांहीं नोकरचाकर व सामानासाठीं बैल होते. कडकरामला वाटलें कीं हे घोडेवाले व्यापारी म्हणजे शत्रुसैन्य आहे! आपणावर हल्ला करण्यासाठीं तें येतं आहे! एकेक व्यापारी त्याला सैनिकासारखा भासूं लागला. आपणाला पराक्रम दाखविण्याची ही एक संधीच परमेश्वरानें दिली असें वाटलें त्याला. कडकरामने आपला भाला सरसावून लढण्याची तयारी केली. त्या आविर्भावांत तो हल्ल्याची वाट पाहूं लागला.

ते व्यापारी जवळ येताच त्यानें भाला रोखून त्यांची वाट आडविली!

"ए! हे बघा," कडकराम त्या सर्वांना दरडावून म्हणाला, "त्या जगात सुंदरपूरची राजकुमारी पद्माराजे सर्वांगसुंदर तरुणी आहे, हें तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं?"

सर्व लोक आश्चर्यानें थबकले! हा माणूस कोण आहे? त्याची ती राजकुमारी कुठली आहे? ती कशी आहे हें आपणाला हा कशासाठीं विचारीत आहे हें त्यांना समजेना! शिवाय तो सशस्त्र आहे हें पाहून ते पुरते घाबरून गेले. त्यांना हा वेडाच असावा असे वाटूं लागले. कारण वारंवार तो हा एकच प्रश्न त्यांना विचारूं लागला.

त्यांच्यापैकीं एक तरुण व्यापारी जरा हुषार होता. मानवी स्वभावाचे विविध अनुभव त्याला प्रवासांत आलेले होते.

"सरकार," तो व्यापारी म्हणाला, "आम्ही तर राजकुमारीचं नांव आत्तांच ऐकलं. शिवाय आम्ही त्यांना ओळखतहि नाहीं, किंवा त्या किती सुंदर आहेत हें आम्हांला माहीत नाहीं. त्यांना जर पाहण्याची संधि आम्हांला मिळाली तर आम्ही त्यांच्या सौंदर्याची स्तुति करूं."

"गप्प बैस! वटवट करू नकोस उगाच." कडकराम त्याला दरडावून म्हणाला, "तूं कुणाशी बोलत आहेस याची कल्पना आहे का तुला मूर्खा! राजकुमारीला दाखविल्यावर तूं तिचं सौंदर्य मान्य करशीलच — तुझा बापहि कबूल करील तें त्यांत नवीन काय आहे? परंतु राजकुमारीला न

पाहतांच तिचं आगळं सौंदर्य तुम्हांला मान्य करावंच लागेल. आणि ते तुम्हांला मान्य नसेल तर मला तुमच्याशीं युद्ध करावं लागेल हें लक्षांत ठेवा.... ! चला व्हा तयार लढाईला ! एकेक जण या किंवा सगळे मिळून या....चला ! ”

असें म्हणून कडकरामनें युद्धाच्या तयारीनें भाला सरसावला व घोड्याला जोरदार टांच दिली ! चालून चालून टपल्या विलक्षण थकलेला होता. जोराची टांच बसतांच टपल्या खालीं कोलमडला. आपण पडत आहोंत हें कळण्यापूर्वींच कडकरामहि भाल्यासह खालीं कोसळला ! तोंडावर पडल्या-मुळें नाकांतून रक्त येऊं लागले. चिलखत व पोलादी टोपामुळें त्याला लवकर उठतांहि येईना.

“ भेकडांनो थांबा ! पळूं नका ! ” जमिनीवर पडल्या पडल्याच कडक-राम गरजला, “ मी ह्या हडकुळ्या घोड्याच्या आगाऊपणामुळें खालीं पडल्याचा फायदा घेऊन पळून जाऊं नका. मी उठलों कीं आतां थांबा तुमचा चांगला खरपूस समाचार घेतों. ”

एका हातानें भाला सांभाळीत व एका हातानें नाकांतील रक्त पुसत पुसत उठतांना चाललेली कडकरामची गडबड पाहून व्यापाऱ्यांना हसूं आवरेना. ही गंमत पाहत पाहतच तें पुढें गेले. कडकराम नुसत्या शिव्या देत होता व बडबड करीत होता. त्या व्यापाऱ्यांना नाहीं परंतु त्यांच्या एका नोकराला या गोष्टीची चीड आली. त्याला आपला राग आवरता आला नाहीं. त्यानें चिडून कडकरामच्या हातांतील भाला हिसकावून घेऊन मोडून टाकला ! त्या दांड्यानें कडकरामला बेदम झोडपलें ! कडकरामचें कांहींहि चाललें नाहीं ! तो गडी निघून जाताच कडकरामनें जागचें उठण्याचा प्रयत्न केला परंतु भरपूर मिळालेल्या मारामुळें त्याला आतां उठतांहि येईना ! परंतु कसा तरी तो एका अंगावर झाला व दूर जाणाऱ्या त्या गड्याला शिव्या देत दगड मारूं लागला. त्याचे अंग जोरानें ठणकूं लागलें होतें. जागचें त्याला हसतां येत नव्हतें.

तेवढ्यांत त्यांच्या गांवचा एक मनुष्य गाढव घेऊन येत होता. कडक-रामाला खाली रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले पाहताच तो थांबला त्यानें पट-

...२

कन त्याचें रक्त व धूळ पुसून त्याला हलकेच उठवून आपल्या गाढवावर बसविले. त्या मरतुकड्या टपल्यावर आपले सामान लादून तो गांवाकडे निघाला. कडकरामाला अतिशय वेदना होत होत्या.

संध्याकाळच्या सुमारास ते कडकरामच्या घरीं पोहोंचले. त्या वेळीं सर्जा शिंपी व दादू न्हावीहि घरांत होते. कडकराम कुठें पळाला असावा यावर त्यांचें व बकुळाचें बोलणें चालू होतें. कुणालाच कल्पना नसतांना तो एकाएकीं गायब झालेला होता त्यामुळें सर्वजण काळजींत होते. लढाईचें सर्व साहित्य घेऊन तो फरारी झाला आहे याची सर्वांना कल्पना आलेली होती. तेव्हां जें वेड त्यानें घेतलें होतें त्याचपायीं त्यानें घर सोडलें असावें असें सर्वांना वाटलें—

" बरं का सर्जा काका, " बकुळा म्हणाली, " काकांचं तें इतिहासाचं व लढाई वेड घालविलं पाहिजे. रात्रंदिवस युद्धाशिवाय ते बोलत नव्हते.... सदान् कदा ढालतलवारीची भाषा— सरदारांच्या बडेजावांच्या गोष्टी— बघावी तेव्हां हातांत तलवार व ढाल— मी तर अगदीं विटलें आहें ह्या चमत्कारिक नादाला....घरोघर कां माणसं नाहींत ? पण हा नमुना वेगळाच. "

" माझ्याही हें लक्षात आलं होतं. " सर्जा शिंपी म्हणाला, " पण ते खरोखरच इतके वाहवत जातील असं वाटलं नव्हतं. पण आतां ते पुन्हां आले म्हणजे त्यांचा हा नाद बंद करायला हवा. त्याची ती बखरींची व पोथ्यांचीं बाडं नष्ट करून टाकलीं पाहिजेत. त्यांच्या डोळ्यांसमोरून ह्या सर्व ऐतिहासिक वस्तु हलविल्या पाहिजेत व त्यांना सतत दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टींत रमविलं पाहिजे. "

हें बोलणें चालू असतांनाच कडकराम तेथें पोहोंचला. तो माणूस बरोबर होताच. सारेजण बाहेर आले. रक्तबंबाळ झालेल्या कडकरामला गाढवावरून आणलेला पाहून सारे घाबरले. ही काय भानगड आहे हें कळेना कुणाला. सर्जा शिंपी, दादू न्हावी व त्या माणसानें कडकरामाला उचलून आणून आंत झोपविलें. बकुळानें त्याचे कपडे बदलले. चिलखत व टोप उतरवला. त्याच्या जखमा बांधून वैद्याकडून औषध आणलें.

" घाबरूं नका. " थोड्या वेळानें हळू आवाजांत कडकराम म्हणाला,

" फार मोठी लढाई जिंकून मी आलों आहें. त्यांतील ह्या जखमा आहेत. आम्हा वीरांना ह्या फुलासमानच असतात. काळजी करण्यासारखं कांहीं नाहीं. शत्रूचा निःपात झाला ही केवढी परमभाग्याची गोष्ट. शत्रूला असा कांहीं हिसका दाखविला आहे कीं पुन्हां आतां तोंड वर काढणार नाहीं.... आँ....आँ....अंग फार दुखतंय्....आँ.... "

" काका—" बकुळा म्हणाली, " आतां बोलूं नका फार....विश्रांती घ्या.... थोड्या वेळांतच मी झकास सैंपाक करतें.... "

" ठीक आहे. " विव्हळत विव्हळत कडकराम म्हणाला,

" विश्रांती कसली घेतोय्, पोरी ! आम्हा योद्ध्यांना हें कधींच जमणार नाहीं. आमची पाठ मरणोत्तरच भुईला लागायची.... शत्रूला पाठ कधींच दाखवीत नाहीं आम्ही....शिवाजी महाराजांना किंवा रावबाजींना कुठं विश्रांती मिळाली होती.... ! "

" काका ! काका ! " बकुळा म्हणाली, " अहो ! बोलताय् तरी किती ....आणि कशाला नांवं घेताय् त्या महापुरुषांची ? कामगिरी कोणती आणि तुमची कसली....आतां बोललांत तर पहा.... "

" बरं बाई. "

कडकराम म्हणाला, " नाहीं बोलत ! माझ्या कार्याची नाहीं तरी तुम्हांला आत्तांच ओळख पटणार नाहींच....माझं कार्य मलाच माहीत....! "

* *

. अं. ... ग्रंथालय शाखा.
२५.
ग्रंथ किशोर ... ४......

# ४

# राक्षस.... ! राक्षस.... !

कडकरामाला मार चांगलाच मिळाला होता. त्यामुळें चार-पांच दिवस झाले तरी त्याचा ठणका कमी होत नव्हता. तो अजून विव्हळत होताच. मुका मार दिसून येत नव्हता. वेदना थांबत नव्हत्या. त्याला उठतां येत नव्हतें.

एके दिवशीं सकाळींच सर्जा शिंपी आला. कडकरामला तें कळलेंच नाहीं. त्यानें परस्पर बकुळाला गाठलें. तिच्याकडून कडकरामची मागील बाजूची खोली उघडून घेतली. कांहीं दिवसांपूर्वीं बकुळाचें व त्याचें बोलणें झाल्याप्रमाणें कडकरामच्या सर्व बखरी व पोथ्या नष्ट करून टाकण्याचें आज त्यानें ठरविलें होतें. त्यासाठींच तो अगदीं सकाळींच आला होता. एका मोठ्या कोनाड्यांत कडकरामनें आपला हा सारा ऐतिहासिक खजिना ठेवलेला होता. थोड्या वेळांत दादू न्हावीहि आलाच !

त्या दोघांनीं मिळून सारीं पुस्तकें तिथून हलवून बकुळाच्या मदतीनें दुसऱ्या एका अडगळीच्या खोलींत लपवून ठेवलीं. कडकरामनें मोठ्या कष्टानें गोळा केलेलें व लिहून घेतलेलें हें सारें साहित्य थोड्याच वेळांत दृष्टीआड झालें. त्याशिवाय आतां इलाजच नव्हता.

“ एवढं करूनही आतां भागणार नाहीं ! ” सर्जा शिंपी म्हणाला, काकांची ही खोलीच बुजवून टाकायला हवी ! ”

“ तें कशासाठीं ? ” दादू न्हावी म्हणाला, सर्जाचा रोख त्याच्या लक्षांत आलेला नव्हता.

" त्याचं असं आहे—" सर्जा शिंपी म्हणाला, " काका बरे झाले कीं पुन्हां आपल्या खोलींत येतील. पुस्तकं पाहतील व पुस्तकं एकदा दिसलीं कीं त्यांचं तें वेड जाणार नाहीं....तेव्हां दाराशीं भिंत घालून त्यांची ही ऐतिहासिक खोलीच आपण नष्ट करून टाकू. अशी बेमालूम भिंत बांधूं कीं एकेकाळीं येथें खोली होती असं कुणाला वाटणारहि नाहीं."

" आणि मग त्या पलीकडील भिंतीच्या त्या खिडक्या ? " बकुळानें न राहवून विचारलें.

" अर्थात् त्याहि बंद केल्याच पाहिजेत कीं."

सर्जा शिंपी हंसून म्हणाला, " म्हणजे ह्या खोलीच्या सर्व खाणाखुणा आपण कायमच्या दूर करायला हव्यात. नाइलाज आहे."

आणि मग सर्जा शिंप्याच्या कल्पनेनुसार ताबडतोब त्या खोलीची सर्व निशाणी नष्ट झाली. नव्या भिंती उभारून पूर्वीप्रमाणें रंगहि देऊन टाकला गेला.

" बघूं या आतां काय होतंय ते." बकुळा म्हणाली, " सर्जाकाकांचा प्रयत्न कितपत यशस्वी होतोय् हें पाहूं."

" आतां तूं बघच काकांची गंमत." दादू न्हावी म्हणाला, " आतां कांहींच खाणाखुणा आपण ठेवलेल्या नाहींत."

कांहीं दिवसांनीं कडकरामला बरें वाटूं लागतांच तो प्रथम आपल्या खोलीकडे आला. इतके दिवस तो माजघराशेजारील बाहेरील बाजूच्या खोलींत होता. आपल्या खोलींत केव्हां एकदा जातोंय असें त्याला झालें होतें. त्याच्या आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! त्याच्या स्वतःच्याच घरीं त्याला आपली स्वतःची खोली सांपडत नव्हती ! त्यानें दोन-तीनदा प्रयत्न केला, पण खोली गायब झाली होती !

" बकुळा—" कडकराम गरजला.

" काय, काका ? " बकुळा म्हणाली. संभाव्य संकट ओळखून घाबरली होती ती. तिच्या आवाजांत कंप होता.

" काका, अंथरुणावरून कशासाठीं उठलांत ? "

" उगाच कांहीं तरी विचारूं नकोस ? " कडकराम जोरानें म्हणाला,

" माझी खोली कुठाय् ? घर आहे कीं भुताटकी ? माझ्याच घरांत मला माझी खोली सांपडूं नये ! सांग, कुठाय माझी खोली ! माझी पुस्तकं आहेत तिथं. तीं माझा जीव कीं प्राण आहेत....बोल, लवकर बोल...."

" सरकार," तेथें जवळ असलेली त्याची मोलकरीण म्हणाली...
" किनई एका राक्षसानं आपली खोली पळवून नेली.... ! "

" नाहीं हो काका–" बबुळा म्हणाली, " राक्षसानं नव्हे....एका जादूगारानं तिला पळविलं....काल रात्री चंद्रकिरणांतून तो आपल्या घरांत आला....पांढराशुभ्र पोषाख व पांढरीशुभ्र दाढी होती त्याला....तो घरांत येताच धुक्यासारखं वलय त्याच्या अंगासभोंवतीं दिसलं मला. धुकं नष्ट होतांच मीं पाहिलं तर तोहि गडप झाला होता व तुमची खोलीहि ठिकाणावर नव्हती ....कुणी फार मोठा जादूगार असावा....तुम्हांला येऊन सांगण्यापूर्वीच, क्षणांत सारं घडून गेलं होतं....कुठला हो असावा तो ? "

हें ऐकत असतांना कडकरामचा चेहरा रागानें लालबुंद होत होता; झाला होता.

" जादूगार असेल नाहीं तर....राक्षसहि असेल, " कडकराम म्हणाला, " ते वाटेल तीं रूपं घेतात हें माहीत नाहीं तुला....म्हणजे मला आता हा नवा शत्रू निर्माण झाला म्हणायचा....ठीक आहे. जाऊन जाऊन जाईल कुठं तो....माझ्याशीं गांठ आहे म्हणावं बच्चमजी !....तुकडे तुकडे करून टाकीन एक क्षणांत....आहेस म्हणावं कुठल्या धुंदींत ! "

नंतर कांहीं दिवस त्याच्या डोक्यांत हाच विषय घोळत होता....घरीं येईल त्याला तो ही राक्षसाची गोष्ट रंगवून सांगत होता....आश्चर्याचा आव आणून लोक मुकाट्यानें हे सारें ऐकून घेत होते....हंसूं दाबत होते– !

परंतु त्याचा शेजारी फडकराम मात्र हें रोज न कंटाळता ऐकत असे. कडकराम जें कांहीं सांगेल त्यावर फडकरामचा लगेच विश्वास बसत असे. थोडीफार त्याला शेती होती. परंतु त्यावर म्हणावी तशी त्याची गुजराण होत नसे. स्वभावानें तो जरा भोळा होता. कडकरामनें निरनिराळ्या गप्पा मारून त्याला असें बनविलें, कीं त्याच्याबरोबर मोहिमेवर येण्यास तो लगेच तयार झाला. कडकरामला कोणी तरी साथीदार हवाच होता. शिवाय सरदार

एकटाच कसा मोहिमेवर जाणार ! सेवक हा बरोबर हवाच. किल्लेदारानें— रामजीरावानें— त्याला तसें विचारलेंहि होतें. पण त्या वेळीं त्याच्याबरोबर कोणी नव्हतें. आतां अनायासें फडकराम तयार झाला होता ! त्याला त्यानें एका गोष्टीचें आमिष लावलें होतें. मोहिमेवर गेल्यावर जो भाग जिंकला जाईल त्याचा फडकरामला राजा करण्याचें त्यानें कबूल केलें होतें !

"काकासाहेब," फडकराम हुरळून जाऊन म्हणाला, "पहा हं ! गरिबावर दया करा....दिलेलं वचन मोडूं नका....आपण पहिला जो भाग जिंकाल तो मला मिळायला हवा....तिथला राजा मी बनेन....माझी बायको राणीसरकार होईल आणि माझी मुलं राजकुमार बनतील व मुली राजकुमाऽरीऽवॉऽमहराज....खरंच का मी राजा होईन....!"

"अरे वेड्या !" कडकराम हसून म्हणाला, "कडकरामला जें करायचं असतं तें एकदांच बोलून दाखवीत असतो."

"बरोबर आहे ! बरोबर आहे, फडकराम म्हणाला, "त्याविषयीं मला, आम्हांत शंका नाहीं."

"अरे," कडकराम म्हणाला, "पुरातन काळापासून ही चालत आलेली परंपरा आहे. सच्चे बहादूर लढाईत देश जिंकत असतात व त्यांची व्यवस्था त्यांचें सेवक नंतर पाहत असतात– यात नवीन असं कांहीं एक नाहीं.... सामानसुमान मात्र बरोबर भरपूर ठेव हं....एखादे वेळेस परतण्यास विलंब लागला तर पंचाईत नको उगाच पडायला....!"

"महाराज," फडकराम अदबीनं म्हणाला, "मला इतकं चालण्याची संवय नाहीं....शिवाय सामानसुमान....तेव्हां माझं गाढव बरोबर घेऊ का? माझ्याजवळ घोडंबिडं कांहीं नाहीं !"

कडकराम जरा विचारात पडला ! सरदाराचा सेवक गाढवावर बसून कसा येणार ? उद्यांचा राजा आज गाढवावर कसा बसतो ? हें कांहीं योग्य दिसत नव्हतें. पण त्याशिवाय दुसरा इलाज नव्हता.

"फडकराम," कडकराम म्हणाला, "हे बघ ! तूर्त तुझं गाढव तूं घे बरोबर....एखादुसरी लढाई आपण जिंकली कीं आपल्याला घोडेच घोडे मिळतील....त्यांतील एक झकास घोडा मग तूं घे....तूर्त तुझं गाढव आहेच !"

आतां दुसऱ्या मोहिमेची तयारी दोघांनाहि गुपचूप करायची होती. कुणालाहि कळायला नको होतें. थोडासा जरी कुणाला सुगावा लागला तर सारंच मुसळ केरांत जाणार होतं. घरातील किरकोळ वस्तु कुणाला नकळत दोघांनींहि विकून थोडे फार पैसे जमा केले. अडीअडचणीसाठी थोडे धान्य घेतलं बरोबर व एक दिवशी रात्री ते दोघे घरातून नाहीसे झाले ! कसलीच चाहूल कुणाला लागली नाहीं. सकाळ होण्यापूर्वींच ते गांवापासून बरेच लांब गेले होते. जातां जातां कडकराम फडकरामला नाना गोष्टी फुगवून सांगत होता. विविध बढाया मारीत होता ! राज्य जिंकल्यानंतर त्याची व्यवस्था कशी लावायची ही चर्चा तो करीत होता. त्यांत फडकराम कांहीं सुधारणा सांगत होता. पहिला हल्ला एकदम करायचा कीं शत्रू बेसावध असतांना रात्रीं करायचा ? चर्चा खूप रंगांत आली होती तेवढ्यांत कडक-रामला पवनचक्की दिसली ! तिचीं पातीं हवेंत फिरत होतीं....! जशी मूळ गोष्ट आहे त्या स्वरूपांत ती कडकरामला कधींच दिसत नसे....!

"फडकराम," कडकराम हर्षून म्हणाला, "आपलं नशीब उघडलं बघ ! परमेश्वराला अगदीं धन्यवाद द्यायला हवेत. आपल्याला लगेच संधी मिळत आहे. तें बघ आपल्या समोर राक्षस उभे आहेत ! त्यांना ठार मारून त्यांची संपत्ती आपण लुटून घेऊ....ह्या साऱ्या गोष्टी लढाई म्हटली कीं आल्याच....!"

फडकरामला आश्चर्य वाटूं लागलें होतें. त्यानें इकडे तिकडे चमकून पाहिलें. राक्षस तर कुठेंच दिसत नव्हतें. समोर फक्त एक पवनचक्की गरगरत होती.

"महाराज," फडकराम बिचकून म्हणाला, "मला तर कोठेंहि राक्षस दिसत नाहीं."

"मूर्खा !" कडकराम म्हणाला, "अरे, डोळे फुटले कीं काय तुझे ? अरे, तुझ्या डोक्यावर राक्षस सगळीकडं फिरू लागले आहेत तरी दिसत नाहींत तुला ? ते पहा त्यांचे लांबच्या लांब हात....अरे गाढवा....एकेक मैल देखील लांब असतात त्यांचे हात....!"

"सरकार," फडकराम म्हणाला, "आपल्या समोर तर ही पवनचक्की

भिरभिर फिरत आहे....ज्याला तुम्ही राक्षसांचे हात म्हणत आहांत ते तिचीं पातीं आहेत....वाऱ्यामुळें तीं पातीं सतत फिरत असतात. राक्षस वगैरे हे कांहीं नाहीं."

परंतु हें ऐकण्यास कडकरामला वेळ नव्हता. राक्षसांशीं सामना कसा द्यावयाचा याचे बेत तो आंखत होता. त्यामुळें कडकरामचें मूर्खासारखें बोलणें त्याला पसंत पडलें नव्हतें.

"भेकडा," कडकराम उपहासानें म्हणाला, "अरे ! तूं भित्रा आहेस. लढाईला घाबरत आहेस....तर दूर जाऊन उभा रहा—जा....मी पहिल्यापासूनच तुला ओळखून होतों....कीं लढाईत ऐन वेळीं तूं पाय मागं घेणार. अरे ! लढाई खेळावी आमच्यासारख्या शूर वीरांनींच....ठीक आहे....मी एकटाच लढीन.... तूं पाहत उभा रहा.... !

फडकराम कांहीं बोलण्यापूर्वींच कडकरामनें घोड्याला टाच मारली ! भाला सरसावला....पवनचक्की जवळ येतांच तो म्हणाला, "ए, भेकडांनोऽ तुम्ही जरी पुष्कळजण असला तरी मी एकटाच आहे....पण मी तुम्हांला घाबरत नाहीं....या एकेक या....म्हणजे घेतों समाचार एकेकाचा.... !"

तेवढ्यांत जोराचा वारा आला व पातीं वेगानें फिरूं लागलीं.... !

"या ! या !" कडकराम म्हणाला, "वाटल्यास सगळे एकदम या.... मी डरणारा नाहीं.... माझ्या पराक्रमांची तुम्हांला कल्पना नाहीं....तुमचें सारें हात मुळापासून उखडून टाकीन समजलांत !"....आणि कडकरामनें त्या पवनचक्कीच्या मोठ्या पात्यावर भाला जोरात खुपसला....भाला तर तुटलाच पण कडकरामहि जोरानें खालीं आपटला....टपल्याहि कोसळला !

"महाराज," फडकराम धांवत येत म्हणाला, "हें काय करून घेतलंत ? मी पहिल्या प्रथमच सांगितलं होतं कीं हें राक्षस नाहींत....ही पवनचक्की आहे....कोणीहि शहाणा ह्या पवनचक्कीला राक्षस म्हणणार नाहीं....पवनचक्की ती पवनचक्कीच म्हणणार !"

"गप्प बैस !" कडकराम खेकसला, "तुला कळायचं नाहीं काही यांतलं....अरे.... ! राक्षस काय कोणतंहि रूप घेऊं शकतात....ज्या जादूगार राक्षसानं माझी खोली पळविली त्याचीच ही करामत आहे, हें कुठं

माहीत आहे तुला ? त्यानें माझा पाठलाग चालू केलेला दिसतोय....पण मीही त्याला पुरून उरीन....माझ्या पराक्रमाची कीर्ति अजून त्याच्या काना-वर गेलेली दिसत नाहीं.... "

" असेल....असेल.... " फडकराम म्हणाला, " महाराज, पण माझ्या कांहीं हें लक्षांत येत नाहीं, बुवा ! "

कडकराम खालीं आपटल्यामुळें त्याच्या कपड्यांना धूळ फार लागली होती. फडकरामनें ती झटकून पुन्हां कडकरामला कसें तरी टपल्यावर बस-विलें. कडकरामला सडकून मार लागला होता, पण कांहींच न झाल्याचा आव उगाच त्यानें तोंडावर आणला होता !

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " अरे ! आत्ता कुठें सुरुवात झालीय् लढ्याला.... ! आतां माझ्या पराक्रमाची कल्पना तुला हळूहळू येत जाईल....थोड्याच दिवसांत तूं राजा बनशील यांत शंका नाहीं.... ! "

फडकराम कांहींच बोलला नाहीं ! पवनचक्कीला राक्षस समजून हल्ला करण्याची फजिती त्यानें पाहिली होती.

तो मुकाट्यानं जात होता. कडकराम त्याच्या पुढं होता.... !

* *

# ५

# राजकुमारीची मुक्तता

बराच वेळ असेंच चालू होतें. कुणी बोलत नव्हतें. मग हळूहळू कडकराम त्याच्या भावी योजना सांगूं लागला ! तेवढ्यांत त्यांना घोड्यावरून जाणारे दोन प्रवासी दिसले. त्यांच्या पाठोपाठ एक मेणा येत होता. मागें अजून दोन-तीन घोडेस्वार होते हें दृश्य पाहून कडकरामच्या मनांत वेगळीच कल्पना चमकूं लागली !

" बघ, " तो फडकरामला म्हणाला, " कुणी डाकू कोणा राजकुमरीला पळवून नेत आहेत पहा....पण त्यांना हें माहीत नाहीं कीं जगांतील सर्वांत श्रेष्ठ लढवैय्या कडकराम ह्या ठिकाणीं हजर आहे....आतां पहा चोरांनो माझा पराक्रम ! "

" महाराज, " फडकराम दबकत दबकत म्हणाला, " आपण हें काय म्हणत आहांत ? कुणी प्रवासी चालले असतील....आपणाला काय करायचंय त्यांच्याशीं....चला आपलं पुढं जाऊं भरा भरा....! "

" तुझं आपलं पुन्हा तेंच. " कडकराम म्हणाला, " अरे ! या पराक्रमी लढवैय्यांच्या गोष्टी तुझ्या लक्षांत यायच्या नाहींत ... हें हज्जार वेळां तुला मीं सांगितलं असेल....मी हजर असतांना हे चोरटे ह्या राजकुमारीला कसे पळवून नेतात तें पहातों मी आतां....तूं नुसतं पहात रहा...."

कडकराम लगेच रस्त्याच्या मधोमध घोडा आडवा घालून उभा राहिला ! ते घोडेस्वार व तो मेणा जवळ येतांच कडकराम गरजला, " एऽ भेकडांनोऽ ह्या राजकुमारीला कुठं पळवून नेत आहांत ? मुकाट्यानं तिला मुक्त करा....

नाहीं तर तुम्हीं आतां जगत नाहीं !— तुम्हा साऱ्यांचे मुडदे पाडून मी राजकुमारीची सोडवणूक केल्याशिवाय राहणार नाहीं हें लक्षांत ठेवा.... मुकाट्यानं तिला सोडा....! "

" महाराज—" एक घोडेस्वार अदबीनं म्हणाला, " तुम्ही कोणत्या राजकुमारीसंबंधीं बोलत आहांत ? कोण तिला पळवून नेत आहे ? आम्हांला तर याची अजिबात कल्पना नाहीं. आम्ही आपल्या वाटेनं जात आहोंत...."

परंतु कडकराम हें ऐकून घेण्याच्या मनःस्थितींत नव्हता. त्यानें एका घोडेस्वारावर एकदम हल्ला केला....तो बेसावध होता....पण एकदम त्यानें घोड्यावरून खालीं उडी मारल्यामुळें तो वचावला. पलीकडे दुसरा घोडेस्वार होता. तोहि पटकन बाजूला झाला. त्याच्याकडे जरा कडकराम वळताच तो पहिला खालीं पडलेला घोडेस्वार चटकन् घोड्यावर बसून पळून गेला. त्याच्या पाठोपाठ तो दुसराहि पळाला.

पहिले दोन्ही घोडेस्वार आपल्याला घाबरून पळालेले पाहतांच कडकरामला भलताच आनंद झाला. तो स्वतःच्या पराक्रमावर खूष होऊन गेला अगदी.

" राजकुमारी, " त्या मेण्याजवळ जाऊन तो म्हणाला, " तुला पळवून नेणाऱ्या त्या दोन डाकूंची मी काय वाट लावली हें तूं पाहिलं आहेसच ! तेव्हां आतां तुला घाबरायचं कांहीं एक कारण नाहीं....हा जगप्रसिद्ध योद्धा वीर कडकराम साक्षात् तुझ्यासमोर उभा आहे— तुझ्या ह्या संकटांत तुला वाटेल ती मदत करण्यास मी तयार आहें....आता सुखानें तूं आपल्या घरीं परतू शकशील....सांग कुठं जायचं आहे तुला ....परंतु तुला मात्र माझं एक काम करावं लागेल....जर तुला सुंदरपूरची राजकुमारी पद्माराजे भेटली तर तू संकटांत असतांना मी तुझे प्राण कसे वांचविले हें मात्र तिला सांगायचं तूं विसरतां कामा नये...."

तेवढ्यांत त्या मेण्यापाठोपाठ येणाऱ्या घोडेस्वारांपैकीं एकजण जवळ येऊन म्हणाला,

" अहो ! तुम्ही कोण आहांत.... चला बाजूला व्हा.... मेणा पुढं जाऊं द्या. मेणेवाले ताटकळत उभे आहेत. "

त्याचें बोलणें कडकरामला व्यवस्थित वाटलें नाहीं. व्यवहाराला सोडून होतें असें वाटलें.

" वा !" कडकराम म्हणाला, " कमाल आहे तुझी ! तूं कांहीं पराक्रमी वीर दिसत नाहींस मला.... जा मुकाट्यानं पुढं.... तूं मला ओळखलं नाहींस वाटतं !"

" काय म्हणालांत ?" राग येऊन तो घोडेस्वार म्हणाला, " मी पराक्रमी वीर नाहीं ? दाखवूं काय हिसका तुम्हांला ! येतां का मैदानांत ? करतां का चार हात ? चला या ?"

त्या घोडेस्वारानें हल्ला करण्यापूर्वींच कडकरामनें जवळ जाऊन त्याला एक जबरदस्त टोला देतांच तो पटकन् खालीं पडला...."

" बोल," त्या पडलेल्या माणसाला कडकराम म्हणाला, " माझी माफी मागण्यास तूं तयार आहेस कीं नाहीं. बोल ? का तुला अजून बेअब्रू करून घ्यायची आहे ?"

हा संवाद ऐकून ती मेण्यांतील तरुणी घाबरली व त्या माणसाला सोडून देण्याविषयीं कडकरामची प्रार्थना करूं लागली.

" ठीक आहे." कडकराम छाती फुगवून म्हणाला,

" याला जिवंत सोडण्यास मी एका अटीवर तयार आहे. सुंदरपूरच्या राजकुमारी पद्माराजेजवळ जाऊन माझ्या पराक्रमाचें वर्णन तूं केलं पाहिजेस. मी किती शूर आहे हें सांगितलं पाहिजेस."

त्या मेण्यांतील स्त्री अगोदरच घाबरलेली होती. तेव्हां पद्माराजे कुठें असते, ती कशी आहे वगैरे माहिती न विचारतांच तिनें अट मान्य केली.

हें ऐकून कडकरामला भलताच गर्व झाला. त्यानें त्या माणसाला जाऊं दिलें. लगेच तो मेणा व तीं माणसें निघून गेलीं !

आपल्या सरदाराचा हा महापराक्रम फडकराम मोठ्या प्रेमळ नजरेनें पाहत उभा होता ! आपल्या मालकानें इतक्या लोकांचा सहजासहजीं केलेला पराभव पाहून तो हरखून गेला. त्यानें असा विचार केला कीं, ज्या अर्थीं हीं माणसें पराभूत झालेलीं आहेत तेव्हां त्यांना आतां लुटायला हरकत नसावी ! एक घोडेस्वार मागें राहिला होता. त्याला अडवून फडकरामनें दम

देण्यास सुरुवात केली. हीं दोन्ही माणसें पुरती भंगड असावींत हें त्यानें ओळखलें होतें. तेव्हां त्यानें फडकरामला घोड्यावरून इतक्या जोरानें ढकललें कीं तो जोरांत खालीं पडला. तेवढ्यांत तो घोडेस्वार पुढें निसटला.

फडकरामचें अंग चांगलेंच शेकून निघालें. अंगावरील धूळ झटकीत तो उठला व फडकरामजवळ गेला.

" पाहिलास माझा पराक्रम." कडकरामनें त्याला मोठ्या ऐटींत विचारलें, " आतां माझें नांव ऐकलें रे ऐकलें कीं लोक चळांचळां कांपूं लागले आहेत .... त्या चोरांची मी कशी वाट लावली हें तूं पाहिलं आहेसच..... ठीक आहे आतां आपली खाण्यापिण्याची व्यवस्था कर.... इथंच जरा विश्रांति घेऊं आपण.... लढाईचा शीण घालवूं ! "

" महाराज, " फडकराम लीलतेनें म्हणाला, " फक्त वाळक्या भाकरीचे कांहीं तुकडे शिल्लक आहेत. "

" असूं देत ! " कडकराम म्हणाला, " मला तेच आवडतील... दे चटकन् ! "

" महाराज, " फडकराम चांचरत म्हणाला,

" आपण इतके मोठे पराक्रमी महावीर असतांना आपणाला ही वाळलेली भाकरी मी कसा देऊं ? "

" अरे त्यांत काय ? " कडकराम खूष होऊन हंसत हंसत म्हणाला, " आम्हां लोकांचें जीवन तूं विचारूं नकोस....रात्रंदिवस आम्हांवर युद्धाचा प्रसंग ! खाण्यापिण्याचे चोचले करण्यास आम्हांस फुरसद नसते....अरे, इथं भाकरीचे तुकडे तरी आहेत, पण रावबाजी मोहिमेवर असतांना उभ्या रानांतील शाळू खुडून हातावर घेऊन घोड्यावरून जात असतांना खात असत, समजलास ! मग आमची काय कथा ! दे—आण ते तुकडे....पाण्यांत भिजवून खाऊं....अरे, कित्येक दिवस खायलाहि मिळत नाहीं त्यापेक्षां हें बरं.... ! "

फडकरामचा नाइलाज झाला. त्यानें भाकरीचे ते वाळके तुकडे कडकरामला पाण्यांत भिजवून मऊ करून दिले. आपणाहि खाल्ले.

जरा विश्रांति घेऊन मग ते दोघे पुन्हां पुढच्या प्रवासाला निघाले.

वाटेंत त्यांना एक घनदाट जंगल लागलें. तेथें थोडी विश्रांति घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यानें आपले घोडे चरण्यास सोडले. एका आंब्याच्या झाडाखालीं ते विश्रांतीला बसले. घोडा चरत चरत पुढें गेला. तेथें दुसरीं कांहीं घोडीं चरत होतीं. टपल्याजवळ एक अगदीं मरतुकडें घोडें चरत होतें. त्याला पाहताच टपल्यानें त्याला जोरदार लाथा मारल्या! लाथा मारत मारत त्याला दूर हाकललें. थोड्याच अंतरावर त्या घोड्यांचे मालक विश्रांतीसाठीं पहुडले होते. त्यांतील त्या घोड्याच्या मालकानें कडकरामच्या टपल्याला बेदम बडवून काढण्यास आरंभ केला.

हें पाहतांच कडकराम रागानें लालबुंद झाला.

"फडकराम—" कडकराम म्हणाला, "हीं माणसं बहुतेक लुटारू असावींत. कुणीहि वीरपुरुष घोड्याला अशा तऱ्हेनं मारणार नाहीं, चला, आपल्याला यात पडावं लागणार आहे...."

"महाराज," फडकराम हळूच म्हणाला, "आपण तर दोघंजणच आहोंत.... तीं माणसें त्या मानानें खूपच आहेत. त्यांच्याशीं भांडणतटा उगाच कशाला काढायचा?"

"तुला कळत नाहीं तें हेंच." कडकराम जरा खवळून म्हणाला, "असा शेपूट घालून कां बसतोस सदा? अरे, मी एकटा त्यांना पुरून उरीन....काय समजलास!"

आणि फकडरामच्या उत्तराची वाट न पाहतां कडकराम एकदम पळत गेला व त्या माणसास ठोकण्यास आरंभ केला. फडकरामनें म्हटल्याबरोबर तीं इतर सारीं माणसें त्या मार खाणाऱ्या माणसाच्या मदतीला धांवलीं. त्या सर्वांनीं मिळून कडकरामला व्यवस्थित बडवून काढलें! आपला मालक मार खाऊं लागला आहे हें पाहतांच फडकरामहि तांतडीनें तिकडे त्याच्या मदतीला गेला, पण त्यालाहि खरपूस मार मिळाला. दोघेहि अति मारानें बेशुद्ध होऊन खालीं पडतांच ते मारणारे तांतडीनें निघून गेले! टपल्यालाहि पोटभर प्रसाद मिळाला होता!

"महाराज," तीं सारीं माणसें दूर गेल्यावर फडकराम काकुळतीनें म्हणाला, "माझ्याच्यानं असा रोज मार खाववणार नाहीं. मेहरबानी करून

मला आत्तां आपल्या सेवेंतून मुक्त करा. मी आपला घरीं निघून जातों. रोज असा मार खाऊन तें कधींच न मिळणारं राज्य मला नको आहे. मला आतां त्याची आशा राहिलेली नाहीं. तुमचं तुम्हांला तें लखलाभ होवो ! माझा प्राण जाण्याची वेळ आता जवळ येत चालली आहे.... ! ”

“ असा निराश होऊं नकोस. ” कडकराम म्हणाला,

“ आता ही माझी चूक होती. इतक्या नीच व हलक्या वृत्तीच्या लोकांशीं मी लढायला नको होतं.... पण न राहवून मी त्यांच्यावर हल्ला केला. देवानं त्याचं फळ मला दिलं....माझा पराक्रम अजून संपलेला नाहीं.... पण आतां मी निश्चय करीत आहे कीं, असल्या किरकोळ लोकांशीं मीं कधींच सामना करणार नाहीं ! ”

अशा तऱ्हेनें बराच वेळ फडकरामची समजूत त्याने काढली. दादा-बाबा करून त्याला जाण्यापासून परावृत्त केलें. अखेर अजून कांहीं दिवसांसाठीं फडकराम त्याच्याजवळ राहण्यास तयार झाला. मग ते पुढें जाण्याच्या तयारीनें उठले. टपल्यावर कडकरामला बसण्यासारखी परिस्थिती नव्हती. कारण त्याला अतिशय मारहाण झालेली होती. तेव्हा फडकरामच्या गाढवा-वरून दोघेहि पुढें निघाले. टपल्या रडतखडत मागें येत होता.... !

पुष्कळ वेळ चालल्यावर त्यांना एक धर्मशाळा दिसली.

“ महाराज,” फडकराम म्हणाला, “ ही चांगली धर्मशाळा दिसत आहे, येथें आपण आतां मुक्काम करूं.... ”

“ कमाल आहे तुझी. अरे, ही कसली धर्मशाळा ऽ? हा तर भुईकोट किल्ला दिसतो ऽ य.... ”

“ महाराज, ” फडकराम पुन्हा म्हणाला, “ अहो ! नीट पहा....ही धर्मशाळाच आहे....तें पहा अनेक प्रवासी ठिकठिकाणी घोळके करून बसलेले आहेत....फौज.... शिबंदी....तट...खंदक...तोफा....बंदुका.... वगैरे इथें कोठें दिसत आहे ? ”

कांहींहि न बोलतां कडकराम धर्मशाळेच्या दाराशीं आला. तेथें एक लहान खड्डा होता. तें गाढव जरा गोंधळलें. इकडे तिकडे केल्यामुळें पाठीमागें बसलेला कडकराम एकदम खालीं पडला. फडकरामनें तातडीनें त्याला उभें

केलें ! धूळ झटकली. तेवढ्यांत धर्मशाळेंतील कांहीं प्रवासी तेथें जमले. कडकरामला चांगलीच जखम झाली होती. सर्वांनीं मिळून त्याला आंत नेलें. तेथील व्यवस्थापकाच्या बायकोनें लगेच त्याच्या जखमेवर हळद टाकून पट्टी बांधली. दोघांनाहि जेवण दिलें व त्यांची झोंपण्याची व्यवस्था केली. व्यवस्थापक जानबा व त्याची पत्नी फार दयाळू होते. कडकराम त्याला किल्लेदारच समजत होता.

" किल्लेदारसाहेब—" कडकराम सकाळी निघतांना म्हणाला, " आज तुमचे आमच्यावर फार उपकार झाले. रात्रभर आम्ही आपल्या इथं भरपूर विश्रांति घेतली. जेवणखाण व्यवस्थित मिळालं होतं. आतां आम्ही पुढील प्रवासास निघतों...."

कडकराम आपल्या घोड्याकडे व फडकराम आपल्या गाढवाकडे निघतांच जानबा म्हणाला,

" महाराज, आपली व आपल्या जनावरांची जी सेवा आम्ही केली त्याबाबत महाराजांनीं कांहीं तरी बिदागी आम्हांला द्यावी, अशी इच्छा आहे ! "

" किल्लेदारसाहेब, " कडकराम म्हणाला, " मी आत्तांच आपणाला म्हणालों होतों कीं आपले आमच्यावरचे उपकार आम्ही कधींहि विसरणार नाहीं....आपल्यावर जर कधीं संकट आलं किंवा आपल्या किल्ल्याला शत्रूनं एकदम वेढा दिला तर तात्काळ मला निरोप द्या. मी तांतडीनं जादा कुमक घेऊन येईन व आपली सुटका करीन.... माझ्यासारख्या महापराक्रमी वीर आपल्या पाठीशीं उभा असतांना आपणाला भीति ती कसली राहणार आहे म्हणा...."

" महाराज— " जानबा म्हणाला, " दैवयोगानं तसं एखादं संकट जर माझ्यावर कोसळलं तर मी आपल्याला अवश्य बोलावणं पाठवीन....पण आत्तां जाण्यापूर्वीं आपण आपले झालेले पैसे चुकते करा....आपण आपलं पीठ पाणी आणलं असतं तर मी आपणाकडून कांहींहि घेतलं नसतं. जनावरांना आपल्या-जवळ चाराहि नव्हता....तो मी माझाच घातला आहे....तेव्हां हे पैसे द्यायलाच पाहिजेत असा नियम आहे.... "

" काय म्हणतां ? " कडकराम म्हणाला, " ही धर्मशाळा आहे ? मला हा किल्लाच वाटला होता....पण हरकत नाहीं कांहीं....तें कांहींहि असलं तरी तुम्ही आमच्याकडून पैसे घेतां कामा नये....कारण लढण्यासाठीं निघालेले सरदार आपल्याबरोबर पैसा ठेवीत नाहींत....वाटेंतील मुलुखांतून तो वसूल करावा लागतो....आम्हांला ज्या वस्तूंची गरज लागते त्या आम्ही पराक्रमी लोक तशाच घेत असतों....किंवा सामना देऊन मिळवीत असतों— तुम्हांलाहि लढायचं असेल तर या मी तयार आहें.... "

—आणि खरोखरच त्यानें लढण्याचा पवित्रा घेतला.... !

त्याचा हा रणावेश पाहून जानबा खरोखरच कचरला. न जाणो हा कडकराम खवळला तर आपल्याला ठार मारायलाहि कमी करणार नाहीं असें वाटलें त्याला. कडकरामला मुकाट्यानें जाऊं दिलें. तो मोठ्या रुबाबात हातांत तलवार घेऊन बाहेर पडला. पण जानबानें फडकरामला अडविलें ! पैसे दिल्याशिवाय त्याला तो बाहेर सोडण्यास तयार नव्हता.

" मला कशासाठीं अडवितां ? " फडकराम म्हणाला, " माझ्या मालकाकडून तुम्ही पैसे घेतले नाहींत तर मला कशासाठीं मागतां ? मी मुळींच नाहीं देणार ! "

फडकरामचें हें असलें बोलणें ऐकून जानबाला अतिशय राग आला. इतर प्रवाश्यांना बोलवून त्यानें फडकरामला बडवून काढण्यास आरंभ केला. फडकराम जोराजोरानें ओरडूं लागला. हें ऐकून कडकराम धांवत येत आहे हें पाहून जानबानें चपळाईनें मुख्य दरवाजा लावून घेतला ! बिचाऱ्या फडकरामला आतां बेदम मार खाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. त्याच्या मदतीला कडकराम येऊं शकत नव्हता. त्यानें बाहेरून त्या दाराला जोरजोरानें लाथा मारण्यास आरंभ केला होता. मोठ्या आवाजांत तो धमक्याहि देत होता. दार उघडत नाहीं हें पाहून तो त्या धर्मशाळेच्या चारी बाजूंला कुठें आंत जाण्यास वाट मिळते का तें पाहूं लागला. कोठेंहि वाट नव्हती. तेव्हां बाहेरून मोठे मोठे दगड आंत फेकण्यास त्यानें आरंभ करतांच मार मारून अर्धमेला झालेला फडकरामला बाहेर सोडण्यांत आले ! दणके खात तें गाढवहि बाहेर पळालें !

" शाब्बास ! फडकराम....वा ! " कडकराम म्हणाला, " तूं आज अगदीं वीरोचित वर्तन केलंस....कितीहि मारहाण झाली तरी आपला बाणा सोडला नाहींस....मी आज अगदीं खूष आहें तुझ्यावर....ही धर्मशाळा नव्हेच....! कोणा जादूगाराचेंच निवासस्थान असावें....नाहीं तर कोणी सद्‌गृहस्थ आपल्या दारीं आलेल्या पाहुण्याला इतकें मरेपर्यंत चोपून काढणार नाहीं....हा आपला अतिथिधर्म नव्हे....टोपीकराच्या संगतीमुळें आपले लोक आतां बदलूं लागले आहेत....प्रत्येक गोष्टीचा पैसा तयार करूं लागले आहेत....मी तुझ्या मदतीला धांवून येतांच त्या चेटक्यानं माझ्यासमोर एक जादूची भिंत पटकन् उभी केली....मग आतां मला हें तूं सांग कीं, यांत माझा कांहीं दोष आहे का ? "

फडकरामला इतकें बेदम मारलेलें होतें कीं, बोलण्याचीहि ताकद त्याच्या अंगांत राहिलेली नव्हती.

" मऽहाऽराऽज—" फडकराम मोठ्या मुष्किलीनें बोलत होता.... " आतां कृपा करून घरीं चलावं....आपण जेथें जेथें जात आहोंत तेथें आपल्याला यथेच्छ कुबलण्यांत येत आहे....खरोखरच हड्डी नरम झालीय्.... तुम्हांला हें सारें जादूगाराचं किंवा चेटक्याचं वाटत आहे, पण मी सांगतों त्यावर विश्वास ठेवा कीं हीं सारीं माणसंच आहेत. यापुढेंहि आपणाला असलींच माणसं भेटणार आहेत....आतां मात्र फार मार खाण्यास माझं हाडहि शिल्लक राहिलेलं नाहीं ! आतां कुणी मला मारलं तर पटकन् माझा प्राणच जाईल....तेव्हां दयावंत व्हा व लगेच घरीं परतां...चला...हा रस्ता आपल्या गांवींच जात आहे— चला ! "

" अरे, फडकराम," कडकराम म्हणाला, "इतका निराश होऊं नको.... शिवाय यांत तुझाहि कांहीं दोष दिसत नाहीं मला....ही सारी त्या जादूगाराचीच किमया आहे....तुझ्या तोंडून तोच बोलत आहे.... माझा हा पराक्रम त्याला आतां सहन होत नाहीं म्हणून मला घरीं घालवायला तो बसला आहे....अरे....विसर हे....! थोड्याच अवधींत तूं बरा होशील....चल जाऊं....या हळूहळू....!

फडकराम कसा तरी त्याच्या बरोबर पुढें जाऊं लागला.

कुणीहि बोलत नव्हतें ! !

* *

# ६

# घोडदळाशीं सामना

वाटेवरची शांतता ब्याच काळानंतर एकदम भंग पावली. पुढें कडकराम व मागें फडकराम होता. त्या दोघांना दूरवर एकदम धूळ उडत असलेली दिसली.

" हे बघ, फडकराम—" कडकराम दूरवर हातानें दाखवीत म्हणाला, " आपल्या समोरून काय येत आहे तें पहा....फार मोठी फौज आपल्यावर चालून येत आहे यात आतां अजिबात शंका नाहीं....ही सारी धूळ घोडदळाची आहे....तें अतिशय वेगानं आपणाकडे येत आहे....सावध रहा !"

" महाराऽज ! महाराऽज !" फडकराम म्हणाला," ह्या दुसऱ्या बाजूला पहा...तिकडेहि तसंच दिसत आहे....प्रचंड धूळ....धुळीशिवाय दुसरं कांहींहि नाहीं !"

" अरे," कडकराम म्हणाला, " चारी बाजूंना पहा ! सगळीकडं धूळच धूळ....! बहुतेक चारी बाजूंनीं शत्रूच्या घोडदळांनीं आपणाला वेढलं आहे. मग मात्र आज जबरदस्त लढाई होईल आपली....अरे ! आतां आज तूं नुसता माझा पराक्रम पाहात रहा— फार दिवसांनीं अशी संधी आतां मला मिळत आहे....तुलाहि अनायासें मोठी लढाई पहावयास मिळेल....नाहीं तरी तूं अजून युद्ध कुठं पाहिलं आहेस म्हणा....आजची ही लढाई माझं नांव सुवर्णाक्षरांनीं इतिहासांत लिहून ठेवील...असं वाटूं लागलं आहे मला....!"

जरा पुढें थोडें उंच टेकाड होतें. त्यावर ते दोघे गेले व पाहूं लागले ! साऱ्या आसमंतांत धूळ उठली होती. कडकरामला विलक्षण आनंद झाला.

आजच्याइतका आनंद यापूर्वी त्याला कधीं झालेला नव्हता....जातिवंत योद्धयाचा पवित्रा घेऊन तो मोठ्या ऐटींत घोड्यावर बसला होता....यापूर्वी झालेल्या मोठमोठ्या लढायांचे किस्से त्याच्या डोक्यांत घोळूं लागले होते.... त्याला आठवलें....पानिपत–! पानिपतच्या लढाईंत मराठ्यांना असेंच चारी बाजूंनीं घेरलें होतें....! आतां आलेल्या फौजेशीं सामना कसा द्यावयाचा याची योजना तो आंखत होता. आपण कुठं थांबायचं ....फडकरामला भराभर कोणतें हुकूम द्यावयाचे याचा विचार तो करीत होता. एकहि जिवंत सुटतां कामा नये...सर्वांची कत्तल व्हावयास त्याला हवी होती.

जी धूळ सर्वत्र उठली होती त्याचें कारण वेगळेंच होतें ! फौज वगैरे कांहींहि नव्हतें. धनगरांचें बरेच कळप इकडून तिकडे निघाले होते. हजारों मेंढ्यांमुळें धूळ फार उठलेली होती.

" महाराऽज, " फडकराम म्हणाला, " मला फौज वगैरे दिसत नाहीं आपल्याला उगाच कांहीं तरी भ्रम होत होता...मला तर काळ्या काळ्या वस्तु हंसत डुलत येतांना दिसत आहेत....घोडा तर एकहि दिसत नाहीं. "

कडकराम डोळे ताणून पाहूं लागला ! त्याला तसें कांहींच दिसलें नाहीं तेव्हां म्हणाला, " बघ ! लागलास तूं पुन्हां भंपकसारखं बोलायला....अरे ! ते पहा हजारों घोडे दौडत येत आहेत....आणि तुला कांहीं तरी काळ्या वस्तु म्हणे दिसताहेत....तुझ्याइतका मूर्ख मनुष्य मी आजपर्यंत तरी पाहिला नाहीं असं मला वाटतं. अरे ! जरा डोळे उघडून पहा....आपल्याला चारी बाजूंनीं घेरण्याचा प्रयत्न केला जात आहे हें तुझ्या लक्षांत येणार नाहीं.... सावध रहा....! लढायला किंवा मरायला तयार हो ! आजच्यासारखी नामांकित लढाई पुढें कधींहि होणार नाहीं व आजतागायत झालेली नाहीं ! "

" महाराज ! महाराज ! " फडकराम म्हणाला, " त्या काळ्या वस्तु म्हणजे दुसरं तिसरं कांहीं नसून चक्क आतां मेंढ्या दिसूं लागल्या आहेत. धनगरांचे कळपच्या कळप चाललेले दिसत आहेत. हें पहा....मेंढरांचें ओरडणेंहि ऐकूं येऊं लागलें आहे....नीट पाहून घ्या ! नाहीं तरी तुम्हांला कांहीं तरी जादूटोणा वाटायचा....आणि पुन्हां मार खावा लागायचा.... तसलं कांहीं करूं नका आतां....! "

" तुला वेड तर लागलेलं नाहीं ? " कडकराम म्हणाला, " मला तर नक्की असं वाटूं लागलं आहे कीं तुझं डोकं फिरलंय.... असा भेकडासारखा प्रवचन कशासाठीं देऊं लागला आहेस ! तुला फारच भीति वाटूं लागली असली तर माझ्या पाठीमागें रहा.... जर एखादा शिपाई मागून पळून जाऊं लागला तर त्याचा तरी निकाल लाव ! "

हें बोलणें चालू आहे तोपर्यंत मेंढ्या जवळ आल्या.... त्यांचा गोंगाट वाढला.

कडकरामला चेव चढला ! त्यानें घोड्याला जोरदार टांच दिली व त्या मेंढ्यांवर तो तुटून पडला. सर्व मेंढ्या घाबरून जिथल्या तेथें थांबल्या. भाला उगारून तो एका मेंढीला मारणार तोच एक दगड सूंऽऽ करीत आला व त्याच्या छातीवर बसला.... नंतर त्याला उगारण्यास अवसरच मिळाला नाहीं.... धनगरांनीं पाठोपाठ दगड भिरकवण्यास आरंभ केला.... त्याला वाटत होतें कीं शत्रूनें आपल्यावर जोरदार हल्ला चालू केला आहे ! त्याला अनेक ठिकाणीं दगड लागले होते.... तो आतां अजून पुढें आला व हवेंत भाला फिरवूं लागला.... फडकरामला मदतीसाठीं बोलावूं लागला... फडकराम त्याला सतत परत बोलावीत होता. पण त्याला मित्रा समजून तो माघारीं वळत नव्हता. त्याला एक मोठा दगड छातीवर भलत्याच जोरानें लागला.... दुसरा लगेच डोक्यावर बसला... कडकराम दगडांच्या माऱ्यामुळे अखेर घोड्यावरून खालीं कोसळला.... खालीं पडल्यावरहि तो जोरजोरानें हात-पाय हलवीत होता व ओरडत होता..... " अरे भेकडांनो ! वीरासारखे लढा.... बायकासारखे दगड कशासाठीं मारीत आहांत ! हिंमत असेल तर तलवार घेऊन या नि पहा मग माझा पराक्रम.... एकेकाचे मुडदे लोळवीन खालीं.... !

तेवढ्यांत कडकरामनें एका पळणाऱ्या मेंढीचा एक पाय धरला व तिला जमिनीवर दाबूं लागतांच धनगरानें हातांतील काठी जोरानें त्याच्या हातावर मारली ! कडकरामनें मेंढी सोडून दिली. त्या धनगरांना नक्की वाटलें कीं हा कुणी वेडा असावा... त्याशिवाय असला मूर्खपणा कोणी करणार नाहीं... त्याला शिव्यागाळी करीत ते धनगर पुढें निघून गेले... कडकराम तेथेंच

अजून हातवारे व बडबड करीत पडलेला होता... कांहीं जखमांतून थोडें रक्त वाहत होतें.... !

फडकरामनें मग हळूहळू त्याला उठविलें. " महाराज— " त्याच्या अंगावरील धूळ झाडतां झाडतां फडकराम म्हणाला, " मी पहिल्यापासून तुम्हांला सांगत होतों कीं, घोडदळ वगैरे कांहीं नसून फक्त मेंढपाळ येत आहेत. परंतु नेहमींप्रमाणें तुम्हांला माझं बोलणं खरं वाटलं नाहीं. विनाकारण त्या मेंढपाळांच्या वाटेला गेला व अशी ही त्रिकट परिस्थिती निर्माण झाली. "

" तुला आतां केव्हां कळणार कुणास ठाऊक. "

धारदार आवाजांत फडकराम म्हणाला, " अरे गाढवा.... त्या मेंढ्या नव्हत्या.... ते सैनिक होते.... माझ्या त्या जादूगार शत्रूनं त्यांना मेंढ्यांचीं रूपं दिलीं होतीं.... मला आज चारी बाजूंनं घेरून ठार करण्याची त्यांची इच्छा होती.... आज जर मी त्यांना पळवून लावलं नसतं तर तूं कांहीं जिवंत रहात नव्हतास.... पण उलट तूं मलाच दोष देत बसला आहेस...."

फडकराम नेहमींप्रमाणें कांहीं बोलला नाहीं.... हळूहळू ते पुढें चालले. कांहीं वेळांपूर्वीं घडलेला प्रसंग कडकराम विसरला होता—आतां त्याचें नवे बेत व नव्या योजना चालू होत्या.

दुरून एक गाडी येत होती. त्यावर ब्रिटिश कंपनी सरकारचा झेंडा फडकत होता. कडकरामला वाटलें कीं, समोरून रथच येत आहे व आपल्याला लढण्याची आणखी एक संधी मिळत आहे.... !

" फडकराम— " कडकराम मोठ्या उत्साहाने म्हणाला, " पहा.... कुठल्या तरी राजाचा रथ येत आहे. त्याचा झेंडा वर फडकत आहे.... बहुतेक त्याची माझ्याबरोबर लढण्याची इच्छा दिसत आहे....त्याच्या फौजेनं बहुतेक त्याला सोडून दिलं असावं म्हणूनच एकटा मैदानांत उतरणार असं दिसतं आहे....त्याला मी ठार मारलं कीं त्याचं राज्य आपल्याला मिळणार....आज मात्र आपलं खरं भाग्य उदयास येत आहे....आतां कांहीं काळजी उरणार नाहीं....हें राज्य मी जिंकलं कीं त्याची तूं व्यवस्था पहा.... मी एकटाच पुढं जाईन....व एकापाठोपाठ अनेक राज्यं सर करीन....!"

ती गाडी जवळ आली तसे त्यावरील कंपनी सरकारचें निशाण पाहून फडकराम म्हणाला, " महाराज.... ही सरकारी गाडी दिसत आहे. त्यावर कंपनी सरकारचं निशाण फडकत आहे.... तेव्हां येथें अतिप्रसंग करूं नये.... आपण मुकाट्यानं पुढें जाऊं. उगाच तमाशा नको.... ! "

तेवढ्यांत तो ' रथ ' जवळ आला ! कडकराम लढण्याच्या आवेशांत तयार राहिला. त्यानें भाला सरसावला....

" एऽऽ " कडकराम जोरदार आवाजात त्या गाडीवानास म्हणाला, " रथ थांबव....आंत कोण आहे ? तो बाहेर कां येत नाहीं....त्याच्या बरोबर लढण्याची माझी तयारी आहे.... !

" महाराज— " तो गाडीवान म्हणाला, " या बंद गाडीच्या आंत वाघाचा पिंजरा आहे. आमच्या कंपनी सरकारनें तो माधवपूरच्या महाराजांना भेट म्हणून दिला आहे....म्हणून आम्ही माधवपूरकडे त्याला घेऊन जात आहोंत.... !

" अस्सं ? " एक नवी कल्पना सुचून कडकराम म्हणाला, " पण वाघ तगडा आहे कीं म्हातारा.... ? "

" महाराज, " तो गाडीवान म्हणाला, " अहो ! खास परदेशांतून ह्याला आणलेलं आहे....फार धोकेबाज आहे....त्याला खाना देण्याची वेळ झालेली आहे....आम्हांला लौकर जावयाचं आहे....जाऊं द्या.... "

" आतां तुम्हांला जातां येणार नाहीं. " कडकराम म्हणाला.

" कां ? "

" अरे ! " कडकराम ठसक्यांत म्हणाला, " जरा त्या वाघोबाला बाहेर तरी काढा....त्याला मी कोण आहे हें कळूं तरी दे.... "

कडकरामचें हें बोलणें ऐकून तो गाडीवान अक्षरशः घाबरला ! गाडीबरोबर दोन घोडेस्वार रक्षक होते....इतक्या वेळ हा संवाद ते मुकाट्यानें ऐकत होते....पण आतां ते पुढें सरसावले व कडकरामला बाजूला जाण्यास सांगूं लागले ! कडकराम जागचा हलण्यास तयार नव्हता....उलट त्याला असें वाटूं लागलें कीं हे लोक पळपुटे असावेत व यांचा वाघ जरूर म्हातारा असावा....माझ्याशीं त्याला लढतां येणार नसावें.... ! त्याला अधिकच

जोर चढला....

" एऽ " कडकराम ठसक्यांत म्हणाला, " या वाघाला तुला बाहेर काढावें लागेलच....त्याच्याशीं लढल्याशिवाय मी येथून पुढें जाऊं देणार नाहीं.... "

आतां मात्र ते सारे जण अक्षरशः घाबरले. परंतु आतां कांहीं उपाय नव्हता. कडकरामचा आवेश पाहण्यासारखा होता. गाडीवान पिंजऱ्यावर चढताच बाकीजण दूर उभे राहिले. फडकरामनें कडकरामला आवरण्याचा फार प्रयत्न केला पण त्याचेंहि त्यानें ऐकलें नाहीं. फडकरामहि दूर जाऊन उभा राहिला. गाडीवानानें पिंजऱ्याचें झाकण थोडें वर उचललें. वाघोबा शांत तऱ्हेनें झोंपलेले होते ! कडकरामबरोबर दोन हात करण्याची त्याची तयारी नसावी. तो जागचा हललाहि नाहीं किंवा त्यानें डोळेहि उघडले नाहींत.

" त्याला बाहेर काढा. " कडकराम म्हणाला.

" महाराज, " गाडीवान म्हणाला, " कंटाळून कंटाळून त्याची झोंप लागलेली आहे. त्याला जागे केले तर तो कुणाला जिवंत ठेवेल असं मला वाटत नाहीं. तो आंत असलेलाच बरा. "

" ठीक आहे. " कडकराम म्हणाला, " मी या वाघाला हरविलं आहे असं मला प्रमाणपत्र द्या....मला पाहतांच वाघ पिंजऱ्याबाहेर निघाला नाहीं हें जगाला कळायला हवं. "

" महाराज, " गाडीवान म्हणाला, " आम्हांला कुणालाच लिहावाचायला येत नाहीं. परंतु आम्ही मुंबईला परत गेलों कीं कंपनी सरकारचं प्रशस्तिपत्रक तुम्हांला जरूर पाठवूं. येवढंच नव्हे तर सायबाकडून दरबारांत तुम्हांला आमंत्रण पाठवू. "

कडकराम बाजूला होतांच गाडी व घोडेस्वार निघून गेले. कडकरामची छाती गर्वानें अधिक फुगली. मोठ्या रुबाबात तो फडकरामकडे गेला. व केलेल्या पराक्रमाची फुशारकी मारू लागला. त्यानें आज खरोखरच वाघाला हरवलें होतें. इतिहासांतील शेरखानाची गोष्ट त्याला माहीत होती. त्याची त्याला आठवण झाली.

" फडकराम—" कडकराम म्हणाला, " यापूर्वी वाघाला जिंकणारा कुणी एक शेरखान होऊन गेला असेल, पण वाघ जागचा हलला नाहीं ह्या महापराक्रमी कडकरामापुढेंच ! आपली डाळ शिजणार नाहीं हें त्या वाघानं ओळखलं व झोंपेचं सोंग घेऊन निपचित पडून राहिला लेकाचा....भेकड–भ्याड...."

फडकराम कांहींच बोलला नाहीं. दोघेहि मुकाट्यानें हळूहळू पुढें जाऊं लागले. बरेच दूर गेल्यावर कडकराम त्या वाघासंबंधीं पुन्हां वारंवार त्याच बढाया मारूं लागला. फडकरामला मात्र आतां कडकरामच्या पराक्रमाबाबत खात्री वाटूं लागली....! आपला मालक खरोखरच धाडशी व पराक्रमी आहे असें दिसून आलें ! नाहीं तर दार उघडलें तरी वाघ बाहेर कसा आला नाहीं ?

आपल्या मालकाकडे पाहण्याची त्याची दृष्टी आज बदलली.

* *

# ७

# राजमुकुट सांपडला

वाटेंत जातां जातां कडकरामनें हुशारकीचे दोन-तीन प्रकार केलेच. लोक त्याला....त्याच्या पोषाखाला घाबरत होते. कडकरामचे घोडे जिकडे जाईल तिकडे तेहि जात होते. कोठें जायचें हें टपल्याच्या मनावर होतें. वाट फुटेल तिकडे तो जात होता.

जरा पुढें गेल्यावर कडकरामला समोरून एक माणूस येत असलेला दिसला. त्याच्या डोक्यावर कांहीं तरी चमकत होतें ! पूर्वीं होऊन गेलेल्या कोण्या एका राजाचा मुकुट चोरीला गेल्याची दंतकथा त्याला एकदम आठवली. त्याच्या कुठल्या तरी सरदारानें तो राजमुकुट पळविला होता.

कडकरामच्या मनांत कल्पनेची वीज चमकून गेली....त्याला वाटलें.... हाच तो सरदार समोरून येत आहे ! अनायासें आपल्याला संधि लाभत आहे....

" कडकराम– " आनंदून कडकराम म्हणाला, " माझी प्रत्येक गोष्ट केव्हां ना केव्हां खरी होतच असते....पूर्वीं केव्हां तरी मी एका राजाचा मुकुट चोरीला गेल्याची कथा ऐकली होती. त्याच वेळीं मला वाटलं होतं कीं, हा राजमुकुट कोठें दूर जाणार नाहीं....याच भागांत केव्हां तरी आपणाला सांपडेल....तेव्हांपासून मी त्या राजमुकुटाच्या शोधांत होतों.... बरं झालं आतां....माझी एकमेव इच्छा मी आतां तो राजमुकुट माझ्या डोक्यावर ठेवून पूर्ण करून घेणार....पहा....तो माणूस पहा....कसा राजमुकुट घालून आपल्याकडेच येत आहे...."

" महाराज," फडकराम म्हणाला, " मला तर तो राजमुकुटहि दिसत नाहीं व कोणी सरदार येत असलेलाहि दिसत नाहीं....समोरून एक साधा-सुधा प्रवासी येत आहे....मरतुकड्या घोड्यावर कुठं सरदार बसत असतो काय ? त्याच्या डोक्यावर कांहीं तरी चपटं असं चमकत आहे हें खरं आहे; परंतु तो राजमुकुट मात्र निश्चित नाहीं....उगाच कांहीं तरी समजूत करून घेऊं नका....चला, आपल्याला उशीर होत आहे पुढं जाण्यास...."

" तुला समजत नाहीं तें हेंच." कडकराम म्हणाला, " विनाकारण माझा पाय मागें ओढूं नकोस....आतां नुसती माझी करामत पहा ! "

" ए," कडकराम तो मनुष्य जवळ येतांच म्हणाला, " तुझ्या डोक्यावरचा तो राजमुकुट मुकाट्यानं माझ्या ताब्यात दे....नाहीं तर युद्ध करण्यास तयार होऽ "

तो घोडेस्वार घाबरला. पितळेचें पातेलें बाजारांतून खरेदी करून तो गांवीं परत चालला होता. वाटेत पावसाची सर आली म्हणून त्यानें तें डोक्यावर पालथें घातलें होतें ! त्यावर ऊन पडल्यामुळें तें चमकत होतें. हत्यारबंद कडकरामचा तो विलक्षण प्रश्न पाहून तो प्रवासी भलताच घाबरला घोड्यावरून त्यानें एकदम उडी मारली व तो पळून गेला. परंतु जीव घेऊन पळतां पळतां त्याचें तें पातेलें खालीं पडलें !

" फडकराम," कडकराम म्हणाला, " तो धुळींत पडलेला राजमुकुट मोठ्या सन्मानानें वंदन करून उचलून माझ्याजवळ दे....!

" महाराज—" तें पातेलें उचलून फडकराम हंसत म्हणाला,

" घ्यावें, सरकार ! "

" तूं हंसत आहेस कशासाठीं ? " कडकराम आपल्या डोक्यावर ते पातेलें ठेवण्याची खटपट करीत म्हणाला,

" ज्या राजाचा हा मुकुट आहे त्याचं डोकं खूप लहान असावं म्हणून माझ्या डोक्यावर हा नीट बसत नाहीं—"

" सरकार," न राहवून फडकराम म्हणाला, " आपण ज्याला राजमुकुट म्हणत आहांत तें एक पितळेचं नवं पातेलं आहे. म्हणून तें चमकत आहे. तें जर डोक्यावर ठेवलं तर लोक तुम्हांला हंसतील....तें टाकून द्या....

ज्याचं असेल तो बिचारा नंतर घेऊन जाईल....”

“ मूर्खा,” कडकराम एकदम म्हणाला, “ तुला हें माहीत नाहीं कीं, ज्यानं हा राजमुकुट पळविला त्यानं त्याचं सोनं काढून घेऊन पुन्हा तो पितळेचा तयार केला आहे. हरकत नाहीं वाटेंत कोठं मोठं गांव लागलं तर आपण हा नीट करून घेऊं. ”

“ महाराज,” फडकराम म्हणाला, “ ठीक आहे....तें नंतर पाहूं.... परंतु त्या माणसाचं तें घोडं पलीकडे उभं आहे....आपण परवानगी देत असाल तर तें मी घेतों....माझं हें गाढव चालून चालून आतां थकलं आहे.”

“ फडकराम,” कडकराम म्हणाला, “ शत्रूला मी युद्धाचं आव्हान दिलं होतं....परंतु भेकडासारखा तो मला घाबरून पळून गेला....युद्धांत सांपड-लेली शत्रूची मालमत्ता आपलीच असते....तेव्हां हें घोडं आतां आपल्या ताब्यांत आलं आहे.... तें घेण्यास कांहींच हरकत नाहीं....”

फडकरामनें आपल्या गाढवाला दूर हाकलून देऊन त्या घोड्याला जवळच्या झाडाला बांधून ठेवलें. त्यावरील खोगिरांत त्यांना दशम्यांचें भलें मोठें गाठोडें सांपडलें. बऱ्याच दिवसांत त्या दोघांना भरपूर खाण्यास मिळालें नव्हतें.

त्या दशम्यांवर त्यांनी यथेच्छ ताव मारला. ढेकर देऊन दोघे पुन्हां पुढें निघाले.

“ सरकार,—” जरा पुढें गेल्यावर फडकराम म्हणाला, “ जर आपली आज्ञा होईल तर....तर.... ”

“ तर....काय ? ”

“ तर एक गोष्ट सुचवावी म्हणतो. ”

“ बोल. ”

“ महाराज, ” फडकराम उत्साहानें म्हणाला, “ अशा आडवाटेला पराक्रम गाजवून काय उपयोग होणार आहे ? कुठं तरी मोठी लढाई जिंकून दाही दिशांना पराक्रम दाखवायला हवा.... त्यामुळं साऱ्या दुनियेंत आपलं नांव गर्जत राहील.... इतिहासांत नमूद केलं जाईल.... आयाबाया तुमच्या वीरकथा आपल्या पोराबाळांना सांगतील. ”

" तुझं म्हणणं रास्त आहे. " कडकराम हरखून जाऊन म्हणाला, " पण माझ्या अजून फार मोठ्या योजना आहेत. यापेक्षां मोठमोठे पराक्रम गाजवून जगाला दिपवून टाकण्याचं सामर्थ्य या तलवारींत आहे. तें मला दुनियेला दाखवायचं आहे. जेव्हा अलम् दुनियेंतील राजेरजवाड्यांना माझ्या ह्या पौरुषाच्या कथा कळतील तेव्हां ते माझं वीरोचित स्वागत करतील. त्यांच्या शाही दरबारांतून मला आदराचं स्थान मिळेल. आणि मग एकाहून एक सुंदर अशा राजकुमारी माझ्याशीं लग्न करण्यासाठीं धडपड करतील. त्यांच्या जवळ असणाऱ्या एखाद्या सुंदर दासीबरोबर तुझं लग्न मी लावून देईन.... "

" सरकार, " फडकराम खूष होऊन म्हणाला, " मी तरी हेंच म्हणत होतों... माझी तरी दुसरी कोणती इच्छा आहे ? आपली जगभर प्रसिद्धी व्हावी... आपला मानसन्मान व्हावा असंच मला वाटतं... तेव्हां असं कांहीं तरी करून दाखवा.... "

" अरे, " कडकराम फुशारकीनें म्हणाला, " पराक्रम म्हणजे माझ्या हातचा मळ आहे. ह्या तलवारीच्या जोरावर एक दिवस मी राजा होईन व तुला माझा प्रमुख सरदार करीन... माझ्याबरोबर लोक तुलाहि आदरानं वंदन करतील. "

" यात कांहीं शंका नाहीं. " फडकराम म्हणाला, " कोणत्याहि सरदाराला मी हार जाणार नाहीं.... संधि मिळतांच मीहि माझा पराक्रम दाखवीन.... "

" अरे, " कडकराम म्हणाला, " हळूहळू सर्व गोष्टी साध्य होत असतात.... पण तूं आत्तांपासूनच सरदारासारखं रुबाबात वागत जा.... विनाकारण दाढी वाढवत जाऊं नकोस... तुझ्यामुळं मला कधीं खालीं पहायची पाळी येऊं नये म्हणजे झालं... "

" छे ! महाराज ! " फडकराम म्हणाला, " असं कधींच होणार नाहीं.... मला एकदा तुम्ही सरदार तर करा आणि मग बोला.... "

संभाषण चालू होतें... वाट सरत होती. तेवढ्यांत वाटेत कांहीं घोडेस्वार येत असतांना दिसले. कांहीं कैदी अटक करून ते नेत होते. त्यांना

दोऱ्या बांधून कांही हत्यारबंद शिपाई त्यांच्याबरोबर चालत होते, दोन्ही बाजूंनीं घोडेस्वार होते.

" महाराज, " कडकराम कांहीं बोलण्यापूर्वींच कडकराम म्हणाला, " हे कैदी दिसत आहेत. चौकशीसाठीं कुठं तरी दूर नेत आहेत वाटतं. "

ते बिचारे कैदी पाहून कडकरामला दया उत्पन्न झाली होती. तो त्याच विचारात होता.

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " परमेश्वरानं प्रत्येकाला जन्मजात स्वातंत्र्य दिलेलं आहे....कोणत्याहि राजाला अशा तऱ्हेनं कोणाचं स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार नाहीं....त्यांना पकडल्यामुळं त्यांच्यावर अन्याय झाला आहे...."

कडकरामच्या ह्या बोलण्यानं फडकरामला भीती वाटली. त्यानें कांहीं वटवट केली असती तर अंगलट आलें असतें.

" महाराज, " फडकराम चाचरत म्हणाला, " सरकारी कामांत ढवळाढवळ आपल्याला करता येणार नाहीं. त्यांनीं कांहीं तरी गुन्हा केला असेल म्हणूनच त्यांना ही शिक्षा मिळाली असावी अपराधाशिवाय त्यांची अशी अवस्था झाली नसावी. "

" तेंच मला कळायला हवं. " कडकराम त्वेषानं म्हणाला. " ह्या दुर्दैवी लोकांनी कोणता गुन्हा केलाय् ? कशासाठी त्यांना काढण्या लावण्यात आल्या आहेत ? बिचाऱ्यांची कशी दीन अवस्था झालीय् पहा. त्यांच्या मदतीला येथें कोणीहि नाहीं. अशा ह्या त्यांच्या संकटाच्या वेळीं त्यांच्या मदतीला धांवून जाणं हें माझं आद्य कर्तव्य ठरणार आहे. मोठेपणाचा हाच मार्ग आहे. "

" काय आहे अपराध यांचा ? " कडकरामनें जवळ आलेल्या एका घोडे-स्वराला अडवून विचारलें.

" त्यांनाच विचारा कीं ! " तो घोडेस्वार म्हणाला.

तो लगेच त्या कैद्याजवळ गेला व त्यांची सारी चौकशी करून म्हणाला, " परंतु तुम्ही घोर असा कांहींच गुन्हा केलेला नाहीं....तुमच्यावर अन्याय झालेला आहे. तुमची सुटका व्हायलाच हवी....चला करतों मी मदत तुम्हांला. तेव्हां मी ह्या पहारेकऱ्यांना असा हुकूम देतो कीं, तुम्हांला मुक्त

केले पाहिजे. आतां इथून मात्र तुम्ही नीट वागायला हवं....!"

"पण तुम्ही कोण आहांत?" एक पहारेकरी म्हणाला, "तुमचा हुकूम आम्हांला पाळतां येणार नाहीं! तुम्ही आमची काय चेष्टा लावलीय्? सरकारी कैद्यांना लवकर जायला हवं...चला बाजूला व्हा...नाही तर..."

"नाही तर काय?" रागानें कडकराम म्हणाला,

"काय करणार आहेस? मी कोण आहे हें तुला माहीत नाहीं काय? ऐक—मला सरदार कडकराम म्हणतात...माझ्या पराक्रमाची तुला कल्पना नाही. समाजसेवा हें माझं ब्रीद आहे. संकटांत पडलेल्यांची मुक्तता करणं हें माझं कर्तव्य आहे...."

बोलणें संपण्यापूर्वींच कडकराम त्या पहारेकऱ्यावर तुटून पडला. तो बेसावध होता. एकदम झालेल्या हल्ल्यामुळें तो जखमी झाला. इतर पहारेकरीहि घाबरले. कैदी सुटका करून घेऊं लागले! कडकरामनें त्यांच्या दोऱ्या तोडल्या. त्या सर्वांनीं मिळून पहारेकऱ्यांना पिटाळून लावलें. त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं. शिपाई पळून गेले!

"बंधूंनो!" कडकराम त्या मुक्त झालेल्या कैद्यांना म्हणाला, "या सरदार कडकरामनें तुमची आज मुक्तता केलेली आहे. म्हणून तुम्हांला आतां माझं एक काम करावं लागेल. माझा हा पराक्रम राजकुमारी पद्मा-राजेला तुम्हांला सांगावा लागेल."

"सरकार," एक कैदी म्हणाला, "आतां आम्हांला कुठं जातां येणार नाहीं. आम्ही जंगलांत पळून जाणार...बाहेर कुठं दिसलों तर आम्हांला पुन्हां पकडतील...त्यामुळं तुमचं काम आम्हांला मुळींच करतां येणार नाहीं..."

"काय म्हणालांत?" कडकराम रागानें म्हणाला, "काम करतां येणार नाहीं! अरे वा! मी तुम्हांला मुक्त केलं त्याचं हें फळ कीं काय? ठीक आहे...तुम्हा सर्वांना जाणं अशक्य असेल तर एकट्यानं कुणी तरी जावं व माझं हें काम करावं...नाहीं तर एकेकाला माझा हिसका दाखवीन..."

कडकरामच्या बोलण्यावरून त्या कैद्यांनीं त्याला पुरतें ओळखलें! दगड फेकीत फेकीत ते सारे पळून गेले. दोन-तीन दगड कडकरामला लागले

देखील... !

" फडकराम," कडकराम म्हणाला, "खालच्या प्रकारच्या लोकांना मदत करूं नये कधीं.... प्रतारणा हाच त्यांचा धर्म असतो.... त्यांची सुटका केली हीच मोठी चूक झाली."

" महाराज," फडकराम म्हणाला, " मी तर पहिल्या प्रथम सांगितलं होतं कीं, सरकारी मामल्यांत ढवळाढवळ करूं नये.... परंतु आपण विनाकारण हट्टाला पेटलो.... आतां ते पळून गेलेले शिपाई जादा कुमक घेऊन इथं येतील व आपल्याला पकडतील.... तेव्हां इथून लवकर पळून गेलेलं बरं.... चला, निघा, लवकर...."

कडकरामच्या मनांतही हा प्रश्न उपस्थित झाला होताच.... जादा शिपाई आले तर ? समोरच दाट झाडीचा डोंगर दिसत होता....

ते दोघे त्या झाडीत पसार झाले !

* *

# ८

# राजकुमारीवरील संकट

**त्या** शिपायांची त्यांना रात्रभर भीति वाटत होती. पण त्यांपैकीं कुणी आलं नाहीं. सकाळीं भल्या पहांटे फडकरामला जाग आली.

" फडकराम— " तो म्हणाला, " माझं काम करशील का? मी एक पत्र देतो. ते तूं सुंदरपूरच्या राजकुमारी पद्माराजेला नेऊन दे.... तूं येईपर्यंत मी इथंच राहीन.... पुढील सर्व योजना आखीन. "

राजकुमारी पद्माराजे नांवाची रूपसुंदरी अस्तित्वात नाहीं याची फडकरामला कल्पना होती आणि जर कदाचित् कुठें असेल तर तिला फडकरामशीं कांहीं एक कर्तव्य नव्हतें. बऱ्याच दिवसांत त्याला व्यवस्थित जेवण मिळालें नव्हतें. विश्रांतीहि लाभली नव्हती. त्या दृष्टिकोनांतून राजकुमारीला भेटून येण्याचें त्यानें तात्काळ मान्य केलें. खूष होऊन फडकरामनें चिठ्ठी लिहून देतांच तो आपल्या गांवाकडे निघाला.

वाटेंत पुन्हां ती जानबा असलेली धर्मशाळा लागली. त्याशिवाय दुसरा रस्ता नव्हताच. तिथेंच त्याला भरपूर मार मिळाला होता! त्याला मनांतून फार भीति वाटत होती, परंतु त्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता. अजून त्याचं गांव दूर होतें. बिचकत बिचकत तो आंत जाणार तों दाराच्या पलीकडे सर्जा शिंपी व दादू न्हावी गप्पा मारीत उभे होते! फडकरामला शोधून काढण्यासाठींच ते निघाले होते! योगायोगानें त्यांची व फडकरामची गांठ पडली.

" फडकराम, " सर्जा शिंपी म्हणाला, " वा! बरं झालं भेटलां तें....

तुमच्याच शोधांत होतों आम्ही....अरे, कांहीं पत्ता ! कुठून आलास तूं.... आणि सरदारसाहेब कुठं आहेत ? त्यांचा कांहीं पत्ता ? जखमी वगैरे झालेले नाहींत ना ? "

" छे ! छे ! " फडकराम हंसून म्हणाला, " सारं कांहीं व्यवस्थित आहे. एका महत्त्वाच्या कामासाठीं ते एके ठिकाणीं थांबले असून मला अत्यंत गुप्त अशा कामगिरीसाठीं त्यांनीं रवाना केलं आहे. मीं तिकडेच चाललों आहें. आज विश्रांती घेऊन उद्यां मीं निघणार आहें. "

त्याच्या चेहऱ्यावरून हा आपल्याला कांहीं तरी बनवीत आहे असे सर्जा शिंप्यास वाटून तो म्हणाला, " फडकराम ! तूं खरं बोलत आहेस असं मला वाटत नाहीं.... तुझा चेहराच सांगतोय् कीं, तूं खरें सत्य लपवीत आहेस.... तूं कदाचित् त्याचा निकाल लावून आला असशील किंवा त्याला फसवून तूं आला आहेस याबाबत माझी खात्री होऊन चुकली आहे. कारण तूं आणलेलं घोडं त्याचं आहे.... तुझं नाहीं.... "

फडकराम घाबरला....! कडकरामचें घोडें त्यानें आणलें होतें. परंतु त्याचा शिंप्यानें विचित्र अर्थ लावलेला पाहून त्याला आश्चर्य वाटलें. तो कोणत्या विशेष कामगिरीवर निघाला आहे हें सारें त्यानें सांगून टाकलें. कडकरामनें राजकुमारीला दिलेली चिठ्ठी शिंप्याला दाखविण्यासाठीं त्यानें बराच वेळ हुडकली पण ती सांपडली नाहीं. ती कुठं पडली हें त्याला आठवत नव्हतं. मग फडकरामनं त्यांच्याजवळ आपल्या मालकाची स्तुति केली. त्यानें गाजविलेले पराक्रम तिखट-मीठ लावून सांगितले तो राजा होणार असून आपण सरदार बनून राजकुमारीच्या सुंदर दासीबरोबर लग्न करणार असल्याचीहि फुशारकी मारली.

हें सारें ऐकून सर्जा शिंपी व दादू न्हावी विचारांत पडले. कडकरामच्या ह्या सर्व उद्योगांची त्यांना कल्पना आली. त्याचें हें जुनें-पुराणें वेड भलत्याच थराला गेल्याची जाणीव झाली. आतां कांहीं तरी उपाय शोधून काढणें भाग होतें. तो सरळ घरीं येणें कठीण होतें. कांहीं तरी जबरदस्त कल्पना काढणें आवश्यक होतें. सर्जा शिंप्याच्या डोक्यांत एकदम एक कल्पना आली ! जवळच्याच गांवीं त्याच्या ओळखीची एक इंद्रायणी नांवाची तरुणी होती-

तिच्या संमतीनें एक नाटक त्याला करतां येण्यासारखें सुचलें. पण प्रश्न तिच्या सहाय्याचा होता. त्यानें आपली कल्पना दादूला सांगितली. मग तांतडीनें ते दोघे त्या शेजारच्या गांवीं इंद्रायणीकडे गेले. फडकरामनें तोंपर्यंत विश्रांति घेण्याचें ठरविलें.

सर्जा शिंप्याची कल्पना इंद्रायणीस प्रथम पसंत पडली नाहीं. परंतु बरेच आढेवेढे घेऊन अखेर ती कबूल झाली व त्यांच्याबरोबर त्या धर्मशाळेंत आली.

" फडकराम," सर्जा शिंपी म्हणाला, " ही एक राजकुमारी आहे. तिचं राज्य राक्षसांनीं पळवून नेलेलं आहे. सरदार कडकरामच्या गोष्टी तिनं ऐकल्या आहेत. त्यावरून त्यांची कीर्ति पाहून त्यांच्या मदतीची तिला अपेक्षा आहे. तेव्हां त्यांच्याकडे तिला घेऊन जा. त्यांच्याशिवाय हें काम होणार नाहीं. "

" नेईन, अवश्य नेईन, परंतु एका अटीवर. " फडकराम म्हणाला.

" कोणत्या ? " दादू न्हाव्यानें विचारलें.

" मी राजकुमारी पद्माराजेकडे जाऊन आलों, असें तुम्ही सरदारांना सांगितलं पाहिजे. " फडकराम म्हणाला, " तरच मी ह्या राजकुमारीला त्यांच्याकडे नेईन...."

" ठीक आहे. " सर्जा शिंपी म्हणाला, " आम्ही अवश्य सांगूं. "

" त्यांत विशेष काय आहे. " दादू म्हणाला.

फडकराम त्या सर्वांना घेऊन त्या दाट जंगलाकडे आला. दादू न्हाव्यानें दाढी-मिश्या लावून वेषांतर केलें होतें. तो राजकुमारी इंद्रायणीचा सेवक बनला होता. सर्जा शिंपी त्या ठिकाणापासून जरा अंतरावर एका मोठ्या झाडाआड लपला होता.

इंद्रायणीनें आल्याक्षणीच झकास नाटक करून कडकरामचे पाय धरले व आपलें राज्य परत मिळवून देण्याची विनंती केली.

" महाराज," इंद्रायणी पुढें म्हणाली, " जोंपर्यंत तुम्ही मला माझं राज्य परत मिळवून देत नाहीं तोंपर्यंत तुमचे हे विजयी चरण मी सोडणार नाहीं. "

" सरकार," फडकराम म्हणाला, " आजपर्यंत आपण अनेक दुःखितांचीं दुःखं दूर केलीं आहेत....तेव्हां आपल्या तलवारीच्या जोरावर आतां ह्या बिचारीचं काम करून टाकावं....दुःखामुळं पहा बिचारीची अवस्था कशी केविलवाणी झाली आहे....आपला पत्ता काढीत काढीत किती तरी दूरवरून ती इथं आली आहे...."

फडकरामच्या ह्या प्रशस्तीमुळें कडकराम भलताच फुगला. इंद्रायणीनें नाटक व्यवस्थित पार पाडलें होतें.

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " चला-लढाईची तयारी करा.... आतां उशीर करून उपयोग होणार नाहीं....माझं चिलखत, टोप वगैरे तयार ठेव. टपल्याला व्यवस्थित ठेव....जा....राजकुमारीच्या चेहऱ्याकडे आतां मला पाहवत नाहीं....तिचं राज्य तिला परत मिळवून दिल्याशिवाय आतां मला चैन पडणार नाहीं....तोच राक्षस सारखा माझ्या मागं लागला आहे.... त्याचा आतां पुरता निकाल लावतों....हरामखोर लेकाचा...."

वेषांतर केलेला दादू कडकरामला कांहीं ओळखूं आला नाहीं ! पण सर्जा शिंपी मात्र एकदम त्याच्या समोर येऊन म्हणाला, " सरदार ! किती तरी दिवस आपल्या शोधांत होतों....मला आपली मदत हवी आहे....मी लुटारू लोकांकडून संपूर्णपणें लुटला गेलों आहें. "

कडकरामनें त्यालाहि आश्वासन दिलें. सर्वजण त्या राक्षसाच्या शोधांत निघाले. वाटेंत इंद्रायणीला तो सारखीं आश्वासनें देत होता. राक्षसाला तो कसकसा खेळवणार आहे हें सांगत होता. सर्जालाही समजून सांगत होता. तेवढ्यांत वाटेंत त्यांना एक मुलगा भेटला. तो म्हणाला, " सरदार ! मला ओळखलं नाहीं तुम्ही ? माझा मालक मारीत असतांना त्याच्या तावडींतून तुम्ही माझी सुटका केली होती....त्याला माझे सर्व पैसे परत देण्यास सांगितले होते....आपण जर आलां नसतां त्या वेळीं तर मी तेव्हां जिवंत सुटलों नसतों....!"

" होऽ....हो...." कांहीं तरी आठवल्यासारखें करून कडकराम म्हणाला, " पण तुझे ते पैसे त्यानं परत दिले का ? "

" नाहीं, हुजूर. " तो मुलगा म्हणाला, " त्यानं मला एक कवडीही

दिली नाहीं....उलट घरीं गेल्यावर पुन्हां मला बदड बदड बद्डलं व हाकलून दिलं.... "

" हरामखोर लेकाचा !" कडकराम खवळून म्हणाला, " कुठाय् तुझा तो मालक.... त्याची हड्डी नरम करतों.... माझा आदेश त्यानं पाळला नाहीं फडकराम.. चल त्याच्याकडे ...त्याला दाखवितों आतां माझा हिसका... "

" सरकार, " इंद्रायणी म्हणाली, " आपण माझं काम पूर्ण करण्याचं वचन मला दिलं आहे...आपण माझ्याकामासाठीं चाललों असतांना ही दुसरी कामगिरी आपण कशी स्वीकारतां ? माझं काम अधिक महत्त्वाचं आहे...तेव्हां तें अगोदर पूर्ण करा...माझं राज्य मला मिळवून द्या... "

" ठीक आहे. " कडकराम म्हणाला, " तूं योग्य तेंच बोललीस... तुझंच कार्य अधिक महत्त्वाचं आहे... हें मी विसरलोंच...पोरा तुला जरा थांबावं लागेल...ही कामगिरी फत्ते झाल्यावर तुझ्या मालकाचा निकाल लावून टाकतो. "

" कांहीं उपयोग नाहीं, तुमचा. " तो मुलगा जातां जातां म्हणाला, " तुम्ही नुसत्या गप्पा मारीत आहांत....तुमच्या हातून कांहींही होणार नाहीं. नुसता आवेशाच दांडगा.... "

तो अजून कांहीं बोलणार पण कडकराम त्याच्या अंगावर धांवून जाण्याच्या तयारींत असतांनाच तो मुलगा जोरानें पळाला व झाडींत गडप झाला. कडकरामनें त्याच्या पाठलागाचा विचार बोलून दाखविला, पण सर्वांनीं त्याला अडविलें. त्यामुळें त्याचा नाइलाज झाला. त्याचा राग सर्वांनीं मिळून शांत केल्यावर पुढील प्रवास चालू झाला.

दोन दिवसांनीं ते जानबाच्या धर्मशाळेंत विश्रांतीसाठीं आले. तेथें थांबल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. हे सारे येतांच जानबा घाईघाईनें बाहेर आला व तो कांहीं बोलण्यापूर्वींच सर्जा शिप्यानें त्याला खुणावलें.

" जानबा, " कडकराम म्हणाला, " आम्ही महत्त्वाच्या कामगिरीवर आहोंत....थोडा वेळ येथें आमची छावणी पडणार आहे. तरी आपण जातीनें आमची व्यवस्था करावी. "

" जशी आपली आज्ञा." जानबा हंसूं लपवीत मोठ्या नम्रतेनें म्हणाला. जेवणखाण होतांच कडकरामला लगेच झोंप आली. प्रवासांत तो थकलेला होता. शिवाय बरेच दिवस त्याला व्यवस्थित झोप आलेली नव्हती. झोपेंत त्याला स्वप्न पडलें........इंद्रायणीचें राज्य जिंकणाऱ्या राक्षसाची व त्याची सलामी झाली....कडकराम मोठ्या त्वेषानें त्याच्यावर धांवून गेला....राक्षस अक्राळ-विक्राळ चेहऱ्यानें त्याच्यावर हल्ले करीत होता....तो तितक्याच आवेशानें तोंड देत होता....राक्षस निरनिराळीं रूपें घेत होता....पण कडकराम त्याला पुरून उरत होता....

कडकरामच्या खोलींतून आरडाओरडा ऐकूं येऊं लागला....तो जोर-जोरानें ओरडत होता....

" भेकडांनो....पळतां कुठं ? "

" थांबा ! थांबा ! "

" पळूं नकोस मूर्खा ! राजकुमारीचं राज्य परत दे.... "

कडकराम ज्या खोलींत झोपला होता त्या शेजारच्या खोलींत फडकराम झोंपला होता. त्याला जाग आली....कडकरामच्या खोलींतून लढाईसारखा आवाज येत होता....तो ओरडत होता... तलवारीचा खणखणाट चालू होता....फडकराम घाबरला व धर्मशाळेंत सर्वत्र ऐकूं जाईल अशा आवाजांत ओरडूं लागला..." धांवा ! धांवा ! माझ्या मालकाला मदत करा...त्यांच्या-वर राक्षसांनीं हल्ला केलाय...या ऽ या ऽ "

सगळेजण धांवत आले...खिडकींतून पाहिलें...तर खोलींत सर्वत्र धान्य विखुरलेलें होतें...गाडगीं-मडकीं फुटलीं होतीं...हातांत तलवार घेऊन कडकराम कोपऱ्यांत थरथरत उभा होता... !

तो ज्या खोलींत झोंपला होता तेथील दोन्ही कोपऱ्यांत गाडग्या—मड-क्यांची उतरंड होती. त्यांत धान्य साठविलेलें होतें. अंधारांत कडकरामला कोपऱ्यांत कुणी तरी उभे असल्याचा भास झाला असावा...शिवाय त्याला राक्षसाचें स्वप्न पडलें होतेंच...अर्धवट झोंपेंत असल्यामुळें त्या उतरंडीला राक्षस समजून त्यानें तलवारीचे वार केले होते ! गाडगीं फुटून सर्वत्र धान्य पसरलें !

धान्याची झालेली ही नासाडी पाहून जानबा खवळला ! कडकरामवर तो तुटून पडला. त्याला बेदम मारूं लागला. सर्जा शिंपी व दादू न्हाव्यानें त्याला कसें तरी आवरलें. कडकराम अजून जणु झोंपेंतच होता. आपल्याला राक्षसच बडवून काढीत आहे असें वाटत होतें. त्याला अखेर फडकरामनें त्याच्या अंगावर पातेलेंभर पाणी टाकलें ! तेव्हां कडकराम खऱ्या अर्थानें जागा झाला !

फडकराम इकडे तिकडे पाहत होता...त्याला वाटलें खोलींत चारदोन राक्षसांचीं प्रेतें दिसतील ! पण सांडलेल्या धान्याखेरीज व फुटलेल्या मडक्यां-शिवाय खोलींत कांहींहि नव्हतें. कडकरामच्या संगतीमुळें राक्षस...जादूगार वगैरेवर फडकरामचा विश्वास बसूं लागला होता.

" राजकुमारी," इंद्रायणीस पाहून कडकराम म्हणाला, " तुझं काम झालं आहे. राक्षसांचा मी आतां पुरता निकाल लावला आहे. आतां तुझं राज्य तूं आनंदानं सांभाळ....पुन्हां असला मूर्खपणा करूं नकोस...जा आतां...मला इतर कामं खूप आहेत...."

झालेल्या नुकसानीबाबत सर्जा शिंप्यानें जानबाला कांहीं पैसे दिले व ते सारे तिथून निघणार तेवढ्यात इंद्रायणीचा नवरा तिला न्यायला तेथें आला. सर्जा शिंप्यानें पटकन् त्याला एका बाजूला नेलें व अजून कांहीं दिवस तिला आपल्याबरोबर असण्याची जरुरी आहे असें विनवून सांगितलें. तो निघून जातांच फडकरामला शंका आली ! सर्जाचें बोलणें अर्धवट त्याच्या कानावर आलें होतें. आजपर्यंत इंद्रायणीला तो खरोखरच राजकुमारी समजत होता. आतां त्याला कळून चुकलें कीं, ती शिंप्याच्या ओळखीची सर्वसामान्य स्त्री आहे. त्याला खात्री होत चालली कीं, कडकरामला राज्य मिळण्याची शक्यता कमी आहे....मग आपणहि सरदार कसले बनणार !

" सरकार," फडकराम न राहवून म्हणाला, " आपली फसगत झालेली आहे....आपण आजपर्यंत जिला राजकुमारी समजत होतों ती राजकुमारी वगैरे कांहींहि नसून एक सर्वसामान्य स्त्री आहे. सर्जा शिंप्याच्या ओळखीची आहे. आपण लढाई वगैरे करून राक्षसांना मुळींच ठार मारलेलं नाहीं. ते नव्हते. त्या खोलींतील धान्याच्या गाडग्या-मडक्यांच्या उतरंडी होत्या !

अंधारांत आपणास ते राक्षस वाटले नि आपण तलवारीनं तें सारें फोडून टाकलें...."

"काय म्हणालास?" कडकराम म्हणाला, "मी राक्षस मारले नसून उतरंडी फोडल्या आहेत? मूर्खा, उगाच कांहीं तरी बडबडूं नकोस...."

परंतु फडकरामनें त्याला त्या खोलीत नेऊन ते सारे दृश्य दाखवितांच कडकरामची खात्री पटली.

"फडकराम," कडकराम म्हणाला, "कमाल आहे....! नक्कीच कांहीं तरी जादू घडली आहे....ह्या धर्मशाळेंत प्रत्येक वेळा आपल्याला नवा अनुभव येत आहे....आतां मीच खुद्द राजकुमारीला विचारतों याबाबत मी आतां...."

"राजकुमारी," पलीकडे असलेल्या इंद्रायणीकडे जाऊन तो म्हणाला, "तूं राजकुमारी नसून एक सर्वसामान्य स्त्री आहेस अशी माझी खात्री झाली आहे....तूं आमची ही जी फसगत केलीस त्याबाबत तुला जबरदस्त शासन मला करावं लागणार आहे...."

"महाराज," इंद्रायणी काकुळतीनें म्हणाली..."आपला कांहीं तरी गैरसमज होत आहे....मी खरोखरच चंदनगडची राजकुमारी आहें....आतां तुम्हांला आज फार त्रास झालेला आहे...आजच्या दिवस संपूर्ण विश्रांति घेऊन उद्यां निघूं आपण...."

सगळ्यांचा नाइलाज झाला. निघण्याची तयारी केलेली थांबवावी लागली. सर्जा शिंप्याला मात्र विनाकारण चिंता वाटूं लागली होती. कडकरामला केव्हां कसली लहर येईल याचा कांहीं नेम नव्हता...त्याच्याबाबत जागरूक राहणें भाग होतें...त्यामुळें विनाकारण मुक्काम वाढला असें त्याला वाटलें.

दिवस कसा तरी गेला. पण रात्रीची फार काळजी होती...

रात्रीं झोपण्याच्या सुमारास कडकरामला नवी कल्पना सुचली.

"फडकराम," कडकराम म्हणाला, "कालचा प्रकार तूं पाहिला आहेसच.... कोणी तरी मोठा जादूगार इथं असलाच पाहिजे... तेव्हां आज रात्रभर मी आतां इथं पहारा करीत बसतों व बघतों तो जादूगार कसा येतो तें..."

आणि टपल्यावर स्वार होऊन तो त्या धर्मशाळेबाहेर गेला. किल्ला समजून पहारा करूं लागला. कडकरामचे हे चाळे जानवाच्या दोन मुली खिडकींत डोकावून पाहत होत्या.... त्यांना हास्याच्या उकळ्या फुटत होत्या.... ! आतां कांहीं तरी झकास तमाशा पहायला मिळणार याची त्यांना कल्पना होती. कडकरामचें धर्मशाळेभोंवतीं चकरा मारण्याचें काम चालूंच होतें. अशाच एका फेरींत त्याचें लक्ष त्या दोघींकडे गेलें. त्याच्या मनांत लगेच एक कल्पना झळकली.... त्याला वाटलें ह्या मुलींना आपल्याशीं लग्न करायचें आहे ! त्यासाठींच त्या अशा रात्रीच्या वेळीं खिडकींत बसून आपणाला बोलावीत आहेत.... !

" स्वरूपसुंदरींनो, " त्या खिडकीजवळ थांबून तो म्हणाला, " जरी तुमच्या मनांत असलें तरी मी तुमच्याशीं कांहीं विवाह करूं शकणार नाहीं. तें भाग्य फक्त राजकुमारी पद्मराजेंना लाभलेलं आहे.... तिच्यासारखी सुंदरी जगांत कोठेंहि तुम्हांला पहायला मिळायची नाहीं.... ! "

तेवढ्यांत टपल्या गडबड करूं लागला.... कडकरामला धरण्यासाहि कांहीं आधार नव्हता. तेव्हां त्यांतील धाकटी तरुणी म्हणाली, " महाराज ! तुमचा हात माझ्या हातात द्या, म्हणजे तोल नाहीं जायचा आपला.... आपल्याला व्यवस्थित गप्पा मारीत इथं थांबतां येईल . "

कडकरामनें बोलतां बोलतां तिच्या हातांत आपला हात देतांच जुन्या पागोट्यानें तिनें त्याचा हात खिडकीशीं बांधून टाकला.... व त्या तेथून निघून गेल्या.... कडकराम अजून बोलतच होता. आपला हात हातांत घेऊन त्या बोलत आहेत असेंच वाटलें त्याला.... हात अवघडला म्हणून त्यानें खालीं करण्याचा प्रयत्न करतांच त्याला कळून चुकलें कीं आपला हात कुणाच्या हातांत नसून कशानें तरी खिडकींत बांधून ठेवलेला आहे व खिडकींत कोणीहि नाहीं ! आतां त्याची परिस्थिति मोठी चमत्कारिक झालेली होती. तो थोडासा हलला असतां किंवा दुसऱ्या हातानें तो हात सोडविण्याचा प्रयत्न केला असतां तर तो तसाच अधांतरी लोंबकळत तिथं राहिला असता— घोडा पळून गेला असता. त्याची खात्री होऊन चुकली कीं त्या दुष्ट जादूगारानें स्त्रीचीं रूपें घेऊन आपल्याला बरोबर पकडून ठेवलें

आहे. आपण त्यांच्याशीं बोललों हा आपला सर्वांत मोठा गाढवपणा झालेला आहे... ! आपण ह्या जादूच्या किल्ल्यांत आज पुन्हां मुक्काम करायला नको होता— ! त्याच्या हाताला विलक्षण रग लागली... कळा येऊं लागल्या... फडकरामला त्यानें बऱ्याच हांका मारून पाहिल्या... परंतु तो आंत असल्यामुळें त्याला कांहींहि ऐकूं आलें नव्हतें... शिवाय धर्म-शाळेचा दरवाजा बंद झालेला होता... अशा परिस्थितींत पहांट झाली. कुणी तरी प्रवासी दाराशीं येऊन दार ठोठावीत होते—

" ए ऽ कोण आहे दाराशीं ?" कडकराम म्हणाला— " इतक्या लवकर किल्ल्याचा दरवाजा उघडीत नाहींत....जा थोड्या वेळानें या.... "

त्या प्रवाश्याचा एक घोडा तेवढ्यांत टपल्याला लाथा मारूं लागला.... त्याला मारण्यासाठीं टपल्या थोडा पुढें हलतांच कडकराम अधांतरी लोंबकळूं लागला....ओरडूं लागला. त्याच्या हाताला विलक्षण मुंग्या आल्या होत्या.... सारें असह्य झालें होतें.... त्याच्या आरड्याओरडयानें त्या दोघी आंत झोंपलेल्या मुली जाग्या झाल्या व त्यांनीं त्याचा हात सोडवितांच कडकराम दणक्यानें खालीं आपटला ! त्याला बराच मुका मार लागला.

जमिनीवर पडून तो कण्हूं लागला. त्या नव्यानें आलेल्या प्रवाश्यांनीं त्याला उठवून बसविलें व जानबाला हाका मारल्या. त्याचा आरडाओरडा ऐकून सर्जा.. दादू...फडकराम सारे जण घाईघाईनें बाहेर आले व कडकरामला नाना प्रश्न विचारूं लागले. परंतु त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो मुकाट्यानें उठला व घोडयावर बसून त्यानें धर्मशाळेंभोंवतीं दोन-तीन चकरा मारल्या !

" ए ऽ मूर्ख जादूगारा, " धर्मशाळेंत येऊन तो म्हणाला,

" तुझ्या मूळ स्वरूपांत माझ्यासमोर ये.... तुला लढण्याचें मी जाहीर आव्हान देत आहे... तुझी ताकद असेल तर ये मुकाट्यानें बाहेर... "

कडकरामच्या कल्पनाविश्वाची साऱ्यांना कल्पना आलेली होती .. कुणीही त्याच्याकडे लक्ष दिलें नाहीं.

त्या दिवशींही तेथेंच मुक्काम करण्याचें सर्जा—दादूंनीं ठरविलें. ते दोघेही एका नव्या विचारांत होते. कांहीं तरी नवी युक्ति करणें भाग होतें. वाट्टेल

तें करून कडकरामला घरीं नेणें जरूरीचें होतें. इंद्रायणीचें नाटक आतां त्यांनीं संपवून तिला परत पाठविली. धर्मशाळेच्या आवारांत एक वाघ पकडण्याचा मोठा पिंजरा पडलेला पाहून दादू न्हाव्याला एक कल्पना सुचली ! सर्जालाही ती पसंत पडली. त्यांनीं लगेच शेजारच्या गांवांत जाऊन एक गाडीवान ठरविला. रात्रीं तो येतांच जानबाच्या परवानगीनें त्यांनीं तो पिंजरा गाडींत ठेवला व गाडी धर्मशाळेच्या मागील बाजूला उभी केली.

कडकरामला आपण ओळखूं येऊं नये म्हणून दोघांनीं वेषांतर केलें ! फडकरामला या कार्यक्रमाची कांहीं कल्पना नव्हती.

रात्रीं कडकराम गाढ झोंपतांच सर्जा व दादू त्याच्या खोलींत गेले. तो घोरत पडला होता. त्या दोघांनीं एका दोरीनें त्याला बांधण्यास आरंभ केला. त्याचे हातपाय बांधतांच त्याला जाग आली. वेषांतरित सर्जा-दादूला तो ओळखूं शकला नाहीं ! दोन अनोळखी माणसें पाहून तो चांगलाच घाबरला ! त्यानें उठून बसण्याचा प्रयत्न केला, पण त्याला तें हातपाय बांधल्यामुळें जमलें नाहीं. ही जादूगाराचीच कांहीं तरी किमया असली पाहिजे असें त्याला वाटलें !

त्याच्या तोंडांत बोळा घालून त्या दोघांनीं त्याला गाडींतील पिंजऱ्यांत आणून बसविलें ! तोंडांतील बोळा काढून टाकला. त्याचे हातपाय मोकळे केले व पिंजऱ्याचें दार लावून टाकलें ! ही सारी जादूच चालू आहे असें कडकराम समजत होता. फडकरामला यांतील कांहींहि माहीत नव्हतें ! तो अजून गाढ झोपलेला होता !

गाडी चालू होण्यापूर्वीं गंमत पाहण्यासाठीं हातांत दिवा घेऊन जानबा तेथें आला. त्याला पाहतांच कडकराम त्याला म्हणाला, " किल्लेदारसाहेब ! मी तुमचा अतिशय उतराई आहे...तुम्ही जातीनं जी माझी काळजी घेतली ती मी कधीं विसरणार नाहीं.. ह्या जादूगारांच्या तावडींतून मी सुटका करून घेतली कीं तुम्हांला तुमच्या इमानीचें बक्षीस देण्यासाठीं येईन..."

" सरदार– " आवाज बदलून दादू म्हणाला, " आपण कांहीं काळजी करूं नका...आम्ही राजकुमारी पद्माराजेकडून आलेलों आहोंत...त्यांनींच

हा रथ आम्हांला दिला आहे...आतां आपण त्यांच्याकडे गेलों कीं, आपला व त्यांचा वैभवशाली विवाह साजरा होणार आहे..:त्यासाठीं राजधानींत प्रचंड तयारी सुरू झालेली आहे...सारे पौरजन आपल्या स्वागतासाठीं उभे आहेत ..!"

"जादूगारांनो–" कडकराम म्हणाला, "तुम्ही हें खरं बोलत आहांत कीं खोटं!"

"सरदार," सर्जा आवाज बदलून म्हणाला, "आम्हांला खोटं वागून कसं चालणार...बोलून चालून आम्ही दरबारचे सेवक...राजकुमारींची आज्ञा पाळणं हा आमचा धर्म आहे...आपण मनांत अजिबात शंका आणूं नका..."

प्रवास सुरू झाला. पिंजऱ्याच्या पाठोपाठ सर्जा व दादू घोड्यावरून हळूहळू जात होते. वाटेंत अनेक प्रवासी भेटत होते. पिंजऱ्यांतील माणूस पाहून त्यांना आश्चर्य वाटत होतें. आतां चांगलेंच उजाडलें होतें. त्यामुळें पिंजऱ्यांतील कडकराम लांबूनहि स्पष्ट दिसत होता. एक प्रवाश्यानें न राहवून दादूस विचारलें, "पिंजऱ्यांत कोण आहे?"

"तुला काय करायचंय विचारून." कडकराम म्हणाला, "तूं वीरांच्या कथा व त्यांचें जीवन अजून पाहिलेलं नाहीं. तेव्हां तुला यांतलं कांहीं एक कळणार नाहीं...मुकाट्यानें पुढं चालूं लाग!"

पिंजऱ्यांत घालून एका माणसाला नेत असलेलें पाहून बरेच प्रवासी त्या पाठोपाठ चालूं लागले होते. सकाळ होतांच फडकरामला जानबाकडून सारी हकीकत कळतांच तो वेगानें घोड्यावरून निघाला होता. तो कांहीं वेळांतच त्या जत्रेजवळ येऊन पोहोंचला. त्याच्या अगोदर आलेल्या प्रवाश्यांनीं ही हकीकत त्याला सांगतांच तो म्हणाला, "ही जादू वगैरे कांहींहि नाहीं! तो पिंजऱ्यांतील सरदार कडकराम आहे व मी त्याचा सेवक आहे. आमच्या गांवच्या ह्या शिंप्यानें व न्हाव्यानं जबरदस्तीनं माझ्या मालकाला पकडून ठेवलं आहे! माझे मालक अतिशय पराक्रमी आहेत. त्यांचा पराक्रम ह्या दोघांना सहन होत नाहीं. त्यामुळं अशा तऱ्हेनं कपटनीतीनं पकडून ते त्यांना गांवाकडं परत नेत आहेत. आतां खरं म्हणजे आमचे

महाराज राजा होणार होते व मला सरदार बनविणार होते......पण ह्या दुष्टांनीं त्यांत खो घातला..."

कडकराम ज्याला त्याला ही हकीकत सांगत होता. पण सर्जा व दादू त्याच्याकडं दुर्लक्ष करीत होते.

पांच-सहा दिवसांत ते आपल्या गांवीं आले. संध्याकाळच्या सुमारास गाडी गांवांत शिरल्यामुळें बरींच माणसें व पोरेंबाळें गोळा झालीं. सर्वांना आश्चर्य वाटूं लागलें होतें. पोरांनीं तर आरडाओरडा चालू केला. कडकरामच्या घरापुढें तर भलतांच गोंधळ व गर्दी झाली. हें पाहून बकुळा पटकन बाहेर आली. कशासाठीं गोंधळ चालू आहे हें प्रथम तिला कळलेंच नाहीं. पण पिंजऱ्यांत आपल्या काकाला पाहतांच ती धांवत गेली व त्याला घरांत घेऊन आली! तिचा आनंद आज गगनांत मावत नव्हता. शब्द दिल्या-प्रमाणें सर्जा व दादू कडकरामला परत घेऊन आले होते.

आपल्या पुतणीला पाहून कडकरामला आश्चर्य वाटलें. जादूगार पळून गेला असावा असें त्याला वाटलें. आरडाओरड ऐकून कडकरामची बायका-पोरेंहि तेथें आलीं. त्याला पाहून त्यांनाहि आनंद झाला. पण आपल्यासाठीं त्यानें कांहींहि न आणलेलें पाहून तीं सारीं निराश झालीं...!

"बकुळा," कडकराम म्हणाला, "मला जादूगारांनीं प्रथम पळविलं होतं, पण त्यांना हाकलून देऊन अखेर मी घरीं परत आलों आहें."

"काका," बकुळा म्हणाली, "तुमचा पराक्रम तसाच आहे...तुम्ही देश गाजवून घरीं परत येणार याची मला कल्पना होतीच...आतां विश्रांति घ्या...मी गरम गरम स्वैंपाक आतां तयार करतें..."

कडकरामच्या खोलींतून बकुळा बाहेर येतांच दादूनें त्या खोलीला कडी घातली व तो हळूच म्हणाला, "बकुळा! आतां तुझ्या ह्या विक्षिप्त चुल-त्याला सांभाळ...मोठ्या मुष्किलीनं आम्ही त्याला परत आणलेलं आहे... आतां जर ते पळाले तर परत कांहीं आम्हांला जमणार नाहीं...आम्ही जातों आतां...."

"नाहीं." बकुळा म्हणाली, "शेजारच्या खोलींत तुम्ही दोघं विश्रांति घ्या... जेवण करूनच आतां घरीं जायचं...!"

बकुळा स्वैंपाकाच्या तयारीला लागली!

★ ★

# १

# फडकरामचा डाव

फडकरामला घरीं येऊन बरेच दिवस झाले. सर्जा व दादू आजिबात फिरकले नव्हते. त्यांनीं त्याला पिंजऱ्यांतून आणलें होतें. कदाचित् तो आपल्यावर खवळेल अशी त्यांची कल्पना होती. परंतु बकुळाची व त्यांची कधीं तरी गांठभेट होत होती. त्यांच्या घरीं अधूनमधून ती जात असे. त्यांच्या बायका तिच्या मैत्रिणी होत्या. परंतु बरेच दिवस झाल्यानंतर अखेर ते एकदां फडकराच्या घरीं आले.

फडकराम त्यांच्याशीं पूर्वीप्रमाणेंच बोलला. आपल्या पराक्रमाच्या कथा रंगवून त्यानें सांगितल्या. पूर्वीं होऊन गेलेल्या सतेज काळांतहि तो रंगला होता. इतिहासाच्या चाकोरीबाहेर तो जात नव्हता. ढाल व तलवार सुटत नव्हती. राज्यस्थापनेचें वेड जात नव्हतें. सर्जा व दादू कळून चुकले कीं त्याच्यांत आतां मुळींच फरक पडणार नाहीं. कल्पनेचा हा सम्राट् मूळ पदावर कायम आहे. जादूगार व राक्षसांच्या काल्पनिक हल्ल्यांत गुंग आहे.

" दादू, " सर्जा घरीं जातांना वाटेंत म्हणाला,

" कसं काय वाटलं ? "

" कांहीं फरक नाहीं. " दादू उत्तरला.

" मला कांहीं हें चिन्ह चांगलं वाटत नाहीं. "

" बरोबर आहे. "

" एक दिवस असा उगवेल कीं तो घरांतून पुन्हां गायब झालेला असेल."

" आतां पुन्हां मात्र आपल्या बापालाहि जमणार नाहीं त्याला पकडून आणायचं...."

काळ सरत होता. कडकराम नित्य नव्या योजनांत मग्न होत होता. त्याचा नवा शेजारी शंकर सतत आतां त्याच्याकडे असायचा तो तरुण होता. धाडसी होता. कडकरामच्या स्वभावाची त्याला पुरेपूर कल्पना होती. त्याची स्तुति करतां करतां टिंगलाहि करीत होता. किंबहुना त्याची बोलण्याची ही पद्धत कडकरामच्या लक्षांत येत नसे. त्याचा शंकर पुरेपूर फायदा घेत असे. तो नेहमीं म्हणायचा, " सरदार ! नुसत्या महाराष्ट्रांतच नव्हे तर दाक्षिणेंत व उत्तरेंतहि आपल्या पराक्रमाच्या कथा पोहोंचल्या आहेत. "

कडकराम हरखून गेला कीं तो पुढें म्हणायचा, " ठिकठिकाणचे शाहीर व भाट आपल्या पराक्रमाचे पवाडे गात आहेत. "

शंकरच्या ह्या असल्या बोलण्याला फडकरामहि बळी पडायचा कडक-राम व फडकराम पुन्हां खूप वेळ एकत्र बसूं लागले होते. कडकराम पुन्हां नव्या पराक्रमाचे बेत आंखीत होता.जगातील दुःख अजून सरलें नव्हतें. हें त्याला दूर करायचें होतें. फडकरामचीहि सरदार होण्याची इच्छा अपूर्ण राहिली होती. शंकर ह्या गोष्टींना उत्तेजन देत होता.

" सरदार, " एकदां शंकर म्हणाला, " अंजनगडची जत्रा जवळ येत चालली आहे. तें एक जुनें पुराणें ऐतिहासिक स्थळ आहे. लांब लांबचे लोक तेथें जमतात. तेथील किल्ला पाहण्यासारखा आहे. तिथं निर-निराळ्या शर्यती घेतल्या जातात. तलवारीचें युद्ध हें त्यांतील प्रमुख आक-र्षण आहे. शिवाय दांडपट्टे-भालाफेक वगैरे कार्यक्रम असतात. माझी खात्री आहे कीं, ह्या शर्यतींत तुम्ही जर भाग घेतला तर तुम्ही बाकीच्यांना पळवून लावाल. "

अंजनगडला जाण्याचें कडकरामच्या मनांत सारखें घोळूं लागलें. तेथील शर्यती त्याला खुणावूं लागल्या. तलवारी बोलावूं लागल्या. भाला त्याच्या डोळ्यासमोरून हालेना. रात्रंदिवस त्याला तींच स्वप्नें पडूं लागलीं. फडक-रामला त्यानें तयारीहि करण्यास सांगितलें. त्याचें जाणें येणें फार वाढलें. त्यामुळें बकुळा अस्वस्थ झाली. तिला शंका येऊं लागली. रात्रंदिवस ती डोळ्यात तेल घालून बसली. सर्जा व दादूला तिनें हें सांगतांच तेही रोज

पुन्हां घरीं येऊं लागले. कडकरामचा बराच वेळ घेऊं लागले. परंतु ते नसतांना फडकरामशीं कडकराम अत्यंत हळू आवाजांत खलबतें करूं लागला. बकुळानें हें शंकरलाहि सांगताच तो म्हणाला, "तुम्ही मुळींच घाबरूं नका...मी त्यांचा पुरता बंदोबस्त करतो."

परंतु शंकर उलट त्यांना प्रोत्साहन देत होता. अंजनगडच्या जत्रेचें खूळ कडकरामच्या मनांत त्यानेंच भरविलें होतें. आपल्या घरचीं कांहीं जुनीं पुराणीं गंजलेलीं शस्त्रहि गुपचूपपणें त्यानें कडकरामला दिलीं होतीं.

एके दिवशी पहांटे पहांटे कडकराम व फडकराम नेहमींप्रमाणें गायब झाले ! बकुळाचा नुकताच डोळा लागला होता. त्याचा फायदा कडकरामनें घेतला. फडकराम केव्हांपासून बाहेर उभा होता. उजाडण्यापूर्वी ते गांवापासून बरेच दूर गेले होते. या वेळीं कडकरामच्या मनांत एक कल्पना आली. राजकुमारी पद्माराजे सुंदरपूर ह्या संस्थानच्या प्रमुख अशा सुंदरपूर शहरी राहत होती ! आपण सुंदरपूरला जाऊन तिची गांठ भेट घेतली तर? त्यानें ठरविलें. फडकरामला सांगितलें. लगेच ते सुंदरपूरकडे जाणाऱ्या रस्त्याला लागले. सह्याद्रीच्या कुशींत लपलेल्या सुंदरपूरला जाण्यास त्यांना पाच-सहा दिवस लागले. सह्याद्रीच्या खोऱ्यांतून त्यांचा प्रवास चालू होता. सर्वत्र आंब्यांना मोहोर चांगलाच आलेला होता. डेरेदार दिसणारीं आंब्याचीं हिरवीगार झाडें त्यांचें लक्ष वेधून घेत होतीं. अखेर सुंदरपूर जवळ आलें. संस्थानी शहर असल्यामुळें मनोरे असणाऱ्या उंच उंच इमारती दुरून दिसूं लागल्या. गांवाची तटबंदी नजरेंत भरूं लागली. राजवाड्यांना मनोरे ठेवण्याची पौर्वात्य पद्धती सर्वत्र रूढ झालेली होती. इमारतीवर ब्रिटिश संस्कृतीची जबरदस्त छाप होती. गांव जवळ येत चाललें तसा फडकराम मनांतून घाबरला होता. कारण मागें एकदां कडकरामची चिठ्ठी घेऊन तो सुंदरपूरला न येतां मधूनच माघारीं फिरला होता. परंतु त्याला मात्र तसें सांगितलें नव्हतें. जर कांहीं प्रश्न विचारले तर पंचाईत पडणार होती. राजकुमारी पद्माराजे त्याला खरोखरच भेटली व आपल्यासंबंधीं तिला कडकरामनें कांहीं विचारलें तर?

सुंदरपूर आतां अगदीं जवळ आलें होतें. अंधार पडल्यावर आपण

गांवांत जायचें असें कडकरामनें फडकरामला सांगितलें. त्यामुळें गांवाबाहेरच एका मोठ्या आम्रवृक्षाखालीं त्यांनीं मुक्काम ठोकला. संध्याकाळची वाट ते पाहूं लागले. अजून उन्हें कललीं नव्हतीं. बराच वेळ थांवणें भाग होतें. दोघेही पुढील भोजनांत मग्न झालेले होते. कडकराम तर अगदीं खूष होऊन गेला होता. आपली राजकुमारी आपल्याला भेटणार ही कल्पनाच त्याला मोहून टाकीत होती.

खूप अंधार पडल्यावर ते दोघे गांवांत शिरले. गांवांत सामसूम झालेली होती. रस्त्यावर कुणी चिटपांखरूंही दिसत नव्हतें.

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " तूं पुढं हो... यापूर्वीं एकदां तूं तिच्याकडं जाऊन आलेला आहेस... तेव्हां तिच्या महालाकडे लवकर घेऊन चल... ते समोर काय दिसत आहे ? तिचा महाल तर नव्हे .. "

" हुजूर, " फडकराम चांचरत म्हणाला, " अंधारामुळं मी रस्ता चुकलोंय् असं वाटत आहे मला... कदाचित् तो असेलही महाल... "

ते त्या दिशेनें गेले. तो महाल नव्हता. अंबाबाईचें मोठें भव्य असें मंदिर होतें.

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " देवीचं मंदिर दिसत आहे. दर्शन घेऊन येऊं. छत्रपतींची तुळजाभवानी काय किंवा ही इथली देवी काय आम्हा वीरांना त्यांच्यापासून स्फुरण मिळतं. "

दर्शन घेतल्यानंतर इकडून तिकडे आणि तिकडून इकडे अशा तऱ्हेनें तीन-चार तास ते गांवांत भटकत होते, परंतु त्यांना राजकुमारी पद्माराजेचा महाल सांपडला नव्हता. कडकराम बेचैन होत चालला होता.

" सरकार, " फडकराम म्हणाला, " आपण असं किती वेळ वणवण हिंडणार ? महाल लवकर सांपडेल असं वाटत नाहीं मला. आपण गांवाबाहेरील त्या आम्रवृक्षाखालीं विश्रांति घ्यावी... मी एकटा महाल हुडकून काढतों आणि मग आपण राणीसरकारांना भेटण्यास जाऊं. "

फडकरामची ही सूचना कडकरामला मान्य झाली. कडकराम पहुडतांच फडकराम राजकुमारीच्या तपासाला निघाला.

परंतु त्याच्या मनांत फार मोठा प्रश्न उपस्थित झाला कीं, आतां काय

करायचें? महाल कसा हुडकून काढायचा? जोंपर्यंत तो कडकरामला दिसूं शकत होता तोंपर्यंत फार जलद निघाला होता, परंतु पुढें एक मोठें वळण होतें. तेथील पुढचें कडकरामला कांहीं दिसूं शकणार नव्हतें. फडकराम एक चांगलें झाड पाहून त्याखालीं पहुडला! त्याला हें माहीत होतें कीं राजकुमारीला भेटल्याशिवाय कडकराम आतां इथून हलायचा नाहीं! ती काल्पनिक आहे याचीही त्याला कल्पना आलेली होती! पण आतां इलाज नव्हता. तिला कसेंही करून हुडकून आणणें भाग होतें! कडकरामची काल्पनिक सृष्टी त्याला आतां पूर्ण परिचित झालेली होती. कोणत्याहि गोष्टीला तो मूळ स्वरूपांत पाहत नसे! त्याला त्या ठिकाणीं वेगळीच कांहीं तरी कल्पना स्फुरून भलतेंच दिसत असे! हें सारें जादूगारानें केलें असें तो समजत असे. त्याच्या बाबतींत अशा अनेक कथा घडल्या होत्या! फडकरामच्या मनांत एक नामी युक्ति आली. कोणत्याही रूपवान तरुणीला जर त्याच्यासमोर राजकुमारी पद्माराजे म्हणून उभें केलें तरी त्यानें तें मान्य केलें असतें! फडकरामला आपल्या ह्या चातुर्याचें मोठें कौतुक वाटलें. तो दिवसभर त्या झाडाखालीं पडून राहिला.

कडकराम तिकडे काळजींत होता. रात्रीं गेलेला फडकराम अजून आलेला नव्हता! तेव्हां आतां तो निश्चित राजकुमारीला आणणार असें त्याला वाटूं लागलें होतें.

संध्याकाळ होतांच फडकराम कडकरामकडे निघाला. वाटेंत त्याला तीन तरुणी त्या रस्त्यानें येत असलेल्या दिसल्या. फडकराम घाईघाईनें आपल्या मालकाकडे आला.

"महाराज," तो म्हणाला, "तयार व्हा.... मी कामगिरी फत्ते करून आलोंय्. खुद्द राजकुमारी पद्माराजे आपल्या सख्यांसह आपल्या दर्शनाला निघाल्या आहेत. त्या थोडया वेळांतच येथें येऊन पोहोंचतील तेव्हां त्यांच्या स्वागताला तयार व्हा..."

कडकरामला प्रथम हें खरें वाटेना. तो जागचा हलेना. फडकरामनें त्याला रस्त्याच्या कडेला आणून दूरवर दाखविलें. तीन तरुणी येत असतांना दिसत होत्या!

"सरकार," फडकराम म्हणाला, "त्या पहा... खुद्द राजकुमारी मधोमध दिसत आहेत... किती ऐटबाज पोषाख केलाय् त्यांनीं पहा.. राजकुमारीला तें आतिशय शोभून दिसत आहे...त्यांना कोणती गोष्ट कमी आहे? हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांनीं त्या नुसत्या वाकलेल्या आहेत! मावळतीच्या उन्हामुळें त्यांचे सोनेरी केस किती चमकत आहेत तें पहा... त्यांच्या बरोबरच्या दासीदेखील तितक्याच सुंदर आहेत...."

कडकराम दूरवर पाहत होता. खरोखरच तिघीजणी तिकडून येत होत्या, पण त्याला अजूनही खरें वाटत नव्हतें.

"फडकराम," कडकराम म्हणाला, "तूं खरोखरच राजकुमारी पद्माराजेंना येतांना पाहिलं आहेस?"

"महाराज," कडकराम म्हणाला, "आपण विनाकारण आतां कांहीं शंका काढूं नका...त्या पहा तिघीजणी अगदीं जवळ आल्या आहेत... पहा..."

"मला तरी कुणी खेडुत तरुणी दिसत आहेत त्या."

"नाहीं, महाराज, नाहीं! आपण चुकत आहांत...रात्रंदिवस ज्या नांवाने आपण भारून गेला आहांत त्या खुद्द राजकुमारी पद्माराजेच आपल्याकडे येत आहेत."

त्या तिघीजणी जवळ येतांच फडकराम पटकन पुढं आला व त्या तिघी-पैकीं मधल्या तरुणीपुढें जाऊन तिला अभिवादन करून तो म्हणाला,

"राजकुमारी! जगांतील सर्वश्रेष्ठ सरदार कडकराम आपली वाट पाहत किती तरी वेळ इथं खडे आहेत! मी त्यांचा एक नोकर आहे."

हें बोलणें ऐकून कडकरामनेंहि त्या तरुणीला शाही मुजरा केला!

ह्या दोन अनोळखी माणसांना पाहून त्या तिघींना आश्चर्य वाटत होतें. मनांतून त्या विलक्षण घाबरल्या होत्या. शेजारीच असलेल्या आपल्या गावीं त्या चालल्या होत्या. कडकराम त्या मधल्या तरुणीकडे एकसारखा टक लावून पाहत होता. त्याला याचें आश्चर्य वाटत होतें कीं, जगांतील सर्वश्रेष्ठ अशी राजकुमारी एका खेडवळ तरुणीच्या स्वरूपांत आपणाला कशी दिसत आहे? हा असला वेष तिनें कशासाठीं घेतला असावा? त्याचें हें एकसारखें

रोखून पाहणें त्या तरुणीस असह्य होऊन ती म्हणाली,

" कां उगाच वाट अडविली आहे आमची ? चला दूर व्हा...आम्हांला उशीर होतोय...अंधार पडत जाईल... "

" राजकुमारी, " फडकराम म्हणाला, " जगांतील एक महान योद्धा आपणापुढं नतमस्तक झाला असतांना आपण त्याला बाजूला व्हा असं कसं म्हणत आहांत ? "

" अरेऽ " दुसरी तरुणी म्हणाली, " आम्ही खेडवळ म्हणून आमची फसवणूक करत आहांत काय ? कुणाला राजकुमारी म्हणत आहांत ? कशा-साठीं वाकवाकून मुजरे करीत आहांत ? बंद करा हें नाटक.- व्हा बाजूला— रस्ता सोडा मुकाट्यानं....अनोळखी स्त्रियांशीं बोलण्याचं धाडस तरी कसं केलं तुम्ही ? "

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " चल दूर हो ! माझं नशीबच खोटं आहे. पद्माराजेंच्यासाठीं अजून बरंच तप मला करावं लागणार आहे असं वाटतं. "

लगेच त्या तरुणीला उद्देशून तो म्हणाला, " राजकुमारी, माझी खात्री झाली आहे कीं या दुष्ट जादूगारानं नक्कीच तुझ्यावर जादू केलेली आहे. नाहीं तर तूं मला लगेच ओळखलं असतंस ! माझा तो दुष्ट जादूगार शत्रू माझी एकहि इच्छा पूर्ण होऊं देत नाहीं. "

" हे पहा, " ती तिसरी तरुणी म्हणाली, " तुमची ती राजकुमारी गेली खड्ड्यांत...आम्हांला तुमचं बोलणं ऐकण्याची अजिबात इच्छा नाहीं... चला व्हा दूर... नाहीं तर ह्या दगडानं मारीन पहा... "

जवळच एक दगड पडला होता. त्या तरुणीनें तो उचलण्याचा बहाणा करताच ते दोघे बाजूला झाले. फडकरामची युक्ति सफल झाली होती. कोणत्या का स्वरूपांत होईन त्यानं कडकरामला रजकुमरीला दाखविली होती ! त्यानें आपलें कर्तव्य बजावलें होतें.

त्या तिघी जणी दूर गेल्यावर कडकराम म्हणाला, " पहा, फडकराम, दैवाची विचित्र लीला पहा... ! त्या दुष्ट जादूगारानं दोन जिवांची भेट होऊ दिली नाहीं...नाहीं तर हें कसं शक्य आहे ? माझी लाडकी पद्माराजे

मला कशी ओळखू शकत नाहीं ? असं कधीं घडतं का ? पण माझ्या बाबतीत ते खरं झालं आहे. माझ्यासारखा जगांत दुर्दैवी दुसरा कुणी नसेल..."

फडकराम मनांतून हंसत होता. कडकरामचें हें बोलणें दुसऱ्या एखाद्याला बरें वाटण्यासारखें होतें !

दोघेंहि आतां अंजनगडच्या रस्त्याला लागले. कडकराम फार निराश दिसत होता. त्याच्या मनांतून मघाचा तो प्रकार हलत नव्हता. फडकरामशीं वारंवार तो तिच्यासंबंधीं बोलत होता. तिच्या काल्पनिक सौंदर्याचें व गांठीभेटीचें वर्णन करीत होता. फडकराम त्याला धीर देण्याचें नाटक व्यवस्थित पार पाडीत होता... !

* *

# १०

# शंकरचा पराभव

दोन-तीन दिवस त्यांचा सतत प्रवास चालू होता. अखेर त्यांना वाटेंत एक धर्मशाळा दिसतांच तेथें मुक्काम करण्याचें त्यांनीं ठरविलें. बऱ्याच वेळानंतर रात्रीं तेथें आणखी दोघेजण प्रवासी आले! त्यातील एक सरदारासारखा दिसत होता व दुसरा त्याचा नोकर असावा. थोड्याच वेळात त्या सरदारानें कांहीं तरी करुण गीत गुणगुणण्यास आरंभ केला.

कडकरामला झोंप येत नव्हती. त्याला कुणी तरी गप्पा मारण्यास हवें होतें. फडकरामला घेऊन तो त्या नव्या प्रवाश्याकडे गेला. त्याच्या नोकराशीं फडकराम बोलूं लागला.

दोन्ही सरदार गप्पा मारूं लागले. फडकराम व तो दुसरा नोकर मात्र पाहता पाहता झोंपीं गेले.

" बरं का– " तो नवा सरदार कडकरामला म्हणाला, " मी देखील एका राजकुमारीबरोबर लग्न करणार आहें. जगांतील ती सर्वांत सुंदर अशी राजकुमारी आहे. तिचं नाव चंदाराजे आहे! पण ती मोठी कठोर आहे. तिच्यासाठीं मी आजपर्यंत अनेक गोष्टी केल्या पण अजून ती खूष झालेली नाहीं. तिचं म्हणणं असं आहे कीं, साऱ्या हिंदुस्थानांत चंदाराजेच स्वरूपसुंदर आहे असं प्रत्येक माणसाकडून मी कबूल करून घेतलं पाहिजे. जो कबूल करीत नाहीं त्याच्याशीं मी युद्ध खेळतों व त्याला जिंकून त्याच्याकडून कबूल करून घेतों. आतांपर्यंत मी किती तरी मोठमोठ्या योद्धयांना व सरदारांना युद्धांत जिंकून हें कबूल करून घेतलें आहे. सर्वांत मोठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे

हिंदुस्थानांतील एकमेव प्रसिद्ध सरदार कडकरामना देखील मी युद्धांत नामोहरम केलेलं आहे. तो मूर्ख म्हणत असतो कीं, त्याची ती कोण राजकुमारी पद्माराजे म्हणे सर्व जगांत सुंदर आहे...त्याला मी जिंकल्यावर त्यानें कबूल केलं कीं पद्माराजे नसून चंदाराजे सर्वांत अधिक सुंदर आहे."

हें ऐकून कडकरामला आश्चर्य तर वाटलेंच परंतु त्या सरदाराचा फार राग आला. परंतु मोठ्या मुष्किलीनें तो आवरून कडकराम म्हणाला, "हिंदुस्थानांतील अनेक सरदारांना तुम्ही जिंकलं असेल हें कदाचित् सत्य असेल परंतु वीरश्रेष्ठ कडकरामला तूं जिंकलें आहे यावर मी मुळींच विश्वास ठेवणार नाहीं...कदाचित् त्याच्यासारखा दुसरा एखादा सरदार भेटला असावा...माझी खात्री आहे कीं सरदार कडकरामना आपण अजून पाहिलेलं नसावं...त्यानं नाहीं तर आपल्याला चारीं मुंड्या चीत करून सोडलं असतं... !"

"छे ! असं कसं होईल." दुसरा सरदार म्हणाला, "त्याला पाहिलं नाहीं असं होणार नाहीं....त्याला तर मी लढाईंत जिंकलं आहे, ही निर्विवाद सत्य घटना आहे....सरदार कडकराम म्हणजे मूर्तिमंत हाडाचा सापळा आहे....चेहरा उभट असून हातपाय लांबलचक आहेत....त्याच्याबरोबर फडकराम नांवाचा त्याचा एक महामूर्ख नोकर नेहमीं असतो.. पद्माराजे नांवाच्या राजकुमारीवर तो सारखी स्तुतिसुमनं उधळीत असतो...आणि आतांहि जर माझ्या बोलण्यावर आपला विश्वास बसत नसेल तर माझे आपल्याला आव्हान आहे ! युद्धाला मी तयार आहे.. चला.. या !"

"हूं ! उगाच जादा बडबड नको." कडकराम ठसक्यात बोलला, मी अजूनहि छातीठोकपणें सांगतों कीं सरदार कडकरामबरोबर तूं युद्ध खेळलेला नाहींस...हाँ.. कदाचित् असं असण्याची शक्यता आहे कीं, एखाद्या जादूगारानं त्याचं रूप घेऊन तुझ्याशीं सामना केला असेल...त्याच्या वाढत्या पराक्रमामुळं त्याला ठिकठिकाणीं अनेक हितशत्रु निर्माण झाले आहेत... ते त्याची सदैव बदनामी करीत असतात...आणि अजूनहि तुला खरं वाटत नसेल तर कान उघडे ठेवून ऐक ..महावीर कडकराम साक्षात् तुझ्यासमोर उभा आहे !...आता जर त्याच्याशीं लढण्याची तुझी हिंमत असेल तर

येऽ...मी तयार आहें...नुसतं लढायचं का घोड्यावरून...तेंहि ठरव... माझा घोडा बाहेर तयार आहे."

"सरदार कडकराम," तो नवा सरदार म्हणाला, "माझी लढण्याची तयारी आहे...जो एकदा तुमचं रूप घेतलेल्या जादूगाराशीं लढला आहे तो आतां खऱ्या कडकरामबरोबर चार हात करण्यास एका पायावर तयार आहे...परंतु चोरा-लुटारूंसारखी त्या अंधारांत लढाई होणार नाहीं आपली...मूर्तिमंत असे वीरपुरुष मोकळ्या मैदानांत लढतात. आपलाहि सामना सकाळींच होईल...पण हें लक्षांत ठेवा कीं, ज्याचा पराभव होईल त्याला ... जिंकणाराची एक गोष्ट मान्य करावी लागेल . हें कबूल आहे का?"

"कां नाहीं?" कडकराम ठसक्यात म्हणाला, "जरूर . जरूर मंजूर आहे...सकाळ होतांच आपला सामना होईल ..!"

सकाळ होतांच आपल्याला घोड्यावर स्वार होऊन दोन्ही सरदार मैदानांत उतरले...दोघांच्याहि कमरेला तलवारी व हातांत भाले होते... त्या दुसऱ्या सरदाराचा पोषाख फार भपकेबाज होता...त्याच्या कमरेला तीन-चार कट्यारी लटकलेल्या होत्या . त्याच्या डोक्यावर ऐटबाज फेटा होता...परंतु आपले तोंड त्यानें काळ्या शेल्यानें लपविलें होतें...त्याचे फक्त डोळे उघडे होते...कडकरामनें त्याला चेहरा दाखविण्यास सांगतांच तो म्हणाला,

"जोंपर्यंत लढाई संपत नाहीं तोंपर्यंत आपला चेहरा मी मुळींच दाखविणार नाहीं."

त्या दुसऱ्या सरदाराच्या नोकरानें फडकरामला गाठलें व युद्धास तयार होण्यास सांगितलें. जेव्हां मालक लढतात तेव्हां नोकरांनीं देखील लढलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें, परंतु फडकरामला कधीं लढण्याची संवय नव्हती. म्हणून तो घाबरत होता. तो म्हणाला,

"अशी पद्धत नसते. प्रथम सरदार लढतील...नंतर आपलं पाहू ...मी तर त्या उंच झाडावर चढून त्यांचा सामना पाहणार आहें..."

त्या दुसऱ्या नोकराला कांहीं बोलण्याची संधि न देतां फडकराम उंच

झाडावर जाऊन बसला. तोपर्यंत सामन्याला आरंभ झालेला होता. दोघेहि आपापले घोडे नाचवीत एकमेकांवर कुरघोडी करूं लागले. भाले सरसावूं लागले. त्या सरदारानें कडकरामला काल रात्रीं फार डिवचलें होतें. त्यामुळें तो मनस्वी संतापून डाव खेळीत होता. कडकरामची अचानक सरशी झाली. असा जोरदार वार केला कीं तो दुसरा सरदार घोड्यावरून जोरांत खालीं आपटला. त्याला असा जबरदस्त दणका बसला होता कीं खालीं पडतांच तो बेशुद्ध झाला...कडकराम पटकन खालीं उतरला व त्या सरदाराकडे धांवला. त्याच्या चेहऱ्यावरील शेला दूर झाला होता. तो दुसरा सरदार म्हणजे त्याचा नवा दोस्त शंकर होता ! त्यानें हें सर्व नाटकच केलेलें होतें. खरें म्हणजे तो त्याला परत नेण्यासाठीं आला होता. बकुळानेंच त्याला पाठविलें होतें. त्याला असें वाटत होतें कीं, आपण कडकरामला सहज लोळवूं आणि घातलेल्या अटीनुसार त्याला परत गांवाकडे घेऊन जाऊं; परंतु घडलें मात्र उलट. शंकरचाच पराभव झाला. आपण पराभूत होऊं असें वाटत नव्हतं त्याला.

जखमी शंकरला पाहतांच कडकरामनें फडकरामला हाका मारल्या. फडकराम तातडीनें झाडावरून खालीं उतरून आला. तेवढ्यांत शंकर शुद्धी-वर आला.

" शंकर," त्याच्या छातीवर भाला टेकवून कडकराम म्हणाला, " तुझी ही हिंमत? माझ्याशीं डाव खेळायचा होता तुला? आतां तुला कबूल करायला हवं कीं हिंदुस्थानांतील मी सर्वश्रेष्ठ सरदार आहें व राजकुमारी पद्माराजे-शिवाय जगांत दुसरी स्त्री सुंदर नाहीं. शिवाय तुला आतां पद्माराजेकडे जावं लागेल व मी हिंदुस्थानांतील महापराक्रमी सरदार आहें हें तिला सांगावं लागेल."

शंकर हें सारें ऐकण्याच्या परिस्थितींत नव्हता. तो कण्हत होता. कडक-रामच्या सर्व अटी त्यानें मान्य केल्या. कडकरामनें त्याला मुक्त करताच आपल्या नोकराबरोबर तो निघून गेला.

या आकस्मिक विजयामुळें कडकराम हरखून गेला. फडकरामलाहि आपल्या मालकाचें कौतुक वाटूं लागलें.

त्यांचा पुढचा प्रवास चालूं झाला. दोन-तीन दिवसांनीं ते एके ठिकाणीं थांबले. तेथें बाहुल्यांचा मनोरंजक खेळ चालू होता ! खेळ करणारा माणूस मोठ्या रंजकतेनें बोलून हातांतील विविध दोऱ्यांनीं बाहुल्या नाचवीत होता. भारतांतील पराक्रमी लोकांच्या कथा व लोकप्रिय लोककथांच्या द्वारें लोकांची करमणूक करीत होता. त्या खेळांत कडकराम इतका रंगून गेला कीं, त्या बाहुल्यांच्या ठिकाणीं त्याला तीं तीं खरीं माणसें दिसूं लागलीं. त्याला त्याचा इतका राग आला कीं, तलवार घेऊन तो त्या बाहुल्यांवर तुटून पडला. त्या सर्व त्यानें तोडून टाकल्या. हें पाहतांच तो खेळ करणारा अतिशय खवळला. त्यानें व खेळ पाहण्यासाठीं जमलेल्या इतर लोकांनीं कडकरामला व फडकरामला बेदम बदडून काढलें. अर्धमेले झालेले दोघेजण आपला जीव बचावून कसें तरी तेथून निसटले. जातांना फडकरामनें कडकरामला चागलेंच सुनावलें. त्या बिचाऱ्या बाहुलीवाल्याच्या पोटावर कडकरामनें विनाकारण पाय दिला होता. कडकरामला आपली चूक नंतर उमजून आली. नेहमींप्रमाणें त्यामुळें त्यांनीं भरपूर मार खाल्ला.

दोघांचेंहि अंग विलक्षण ठणकत होतें. हळूहळू ते एका नदीकिनारीं आले. नदीला पाणी बरेंच होतें. एक छोटीशी नाव दोरानें झाडाला बांधून तेथें ठेवली होती. कडकरामला वाटलें कीं, आपल्यासाठींच कोणी तरी ही नाव येथें मुद्दाम तयार ठेवली आहे !

" फडकराम," कडकराम म्हणाला, " ही नाव आपल्यासाठीं तयार ठेवली आहे. आपलीं घोडीं इथं झाडाला बांधून ठेव. आपण जरा जलप्रवास करून येऊं... "

" सरकार," फडकराम घाबरून म्हणाला, " ही नाव आपल्यासाठीं कशाला ठेवली असेल? आपला काय संबंध? कुणा कोळ्याची नाव असेल ती. शिवाय अशा जंगलांत आपलीं घोडीं इथं एकटीं बांधून हिंडत बसायचं... आपण आपले पुढच्या मार्गाला लागूं. चला... ! "

" तूं विनाकारण घाबरत आहेस. " कडकराम म्हणाला, " ज्यानं ही नाव आपल्यासाठीं ठेवली आहे तो आपल्या जनावरांची निगा ठेवीलच... महापराक्रमी कडकरामच्या घोड्याला हात लावण्याची कुणाची हिंमत

होणार आहे ? ”

फडकरामचा नाइलाज झाला. मालकाच्या हुकुमानुसार त्यानें दोन्ही घोडे एका झाडाला बांधले. जनावरें तेथें एकटीं सोडतांना त्याला फार वाईट वाटलें.

दोघेहि नावेंत बसले. तींत कांहींहि साहित्य नव्हतें. नांव आपोआप वाहत जाऊं लागली. ती त्यांना थांबवितां येत नव्हती किंवा वळवितां येत नव्हती. प्रवाहाबरोबर वाहत चालली. फडकराम विलक्षण घाबरला. आतां आपण पुन्हां किनारा पाहत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. जरा दूरवर नदीकिनारीं एक पवनचक्की होती !

“ फडकराम, ” कडकराम म्हणाला, “ तो समोर बघ राक्षस उभा आहे...त्यानंच कुणाला तरी कैद करून ठेवलंय...त्या माणसांसाठीं ही नाव कुणीं तरी मुद्दाम तेथें ठेवली असावी. त्याला माहीत असावं कीं, जगांतील सर्वांत महान असा कडकराम येथें येणार आहे व त्या कैद्यांची सुटका करणार आहे. माझ्या महापराक्रमाची सर्वांना आतां कल्पना आलेली आहे... संकटांतून सर्वांना मुक्त करण्याचा मी विडा उचलला आहे हें साऱ्या हिंदुस्थानला माहीत आहे. ”

“ महाराज, ” फडकराम म्हणाला, “ राक्षस वगैरे तिथं कांहीं नसून ती एक साधी पवनचक्की आहे ! तिथं कुणालाहि कैदेंत ठेवलेलं नाहीं. ”

“ फडकराम, ” कडकराम मोठ्या आवाजांत म्हणाला, “ तूं इतके दिवस माझ्या संगतींत आहेस, पण तुला अजून काडीचीहि अक्कल आलेली नाहीं. मूर्खा— मी तुला किती वेळां सांगितलं आहे कीं, जादूगार वाटेल तीं रूपें घेऊं शकतात ! ज्या गोष्टीला तूं पवनचक्की म्हणत आहेस तिथं खरोखर किल्ला आहे व त्यांत कैदी ठेवलेले आहेत. त्यांची मुक्तता केल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. ”

पवनचक्की आतां जवळ येत होती. त्यापासून पुढें नदीचा प्रवाह खालीं पडत होता त्यामुळें छोटा धबधबा निर्माण झाला होता. नाव तशीच उताराला लागली असती तर दोघांचें हाडहि शिल्लक राहिलें नसतें ! पवनचक्कीवाला जवळच उभा होता. तो ओरडूं लागला, “ अरे ! पुढं कुठं जातां ? नदीला

उतार आहे...जाऊं नका...माणसं आहांत कीं भुतं आहांत ? नाव कुणाची आणलीय् ? काय काम आहे तुमचं ? ”

“ ए ऽ दुष्टा, ” कडकराम त्याला राक्षस समजून म्हणाला, “ तुझं पारिपत्य करण्यासाठींच माझा जन्म झालेला आहे...तूं पकडून ठेवलेले निरपराध जीव मुकाट्यानें माझ्या हवालीं कर नाहीं तर तुझे तुकडे तुकडे करून टाकतों. ”

कडकरामनें नावेंत उभे राहून तलवार हवेंत जोरजोरानें फिरविण्यास आरंभ करतांच नाव वेगानें पुढें जाऊं लागली ! पवनचक्कीवाल्यानें आरडा-ओरडा करून चार माणसें गोळा केली. त्यांनीं मोठ्या मुष्किलीनें वांबूच्या साह्यानें नाव अडविली. क्षणाचा जरी विलंब झाला असतां तरी धबधब्यांत नाव गेली असती ! नाव उलटी झाली व दोघेहि पाण्यांत आपटले असते. लोकांनीं बांबूनें नाव किनाऱ्याला आणली. कमरेइतक्या पाण्यांतून कडकराम व फडकराम कसे तरी किनाऱ्याला येतांच त्या लोकांनीं त्या दोघांना यथास्थित बडवून काढलें. त्या होडीचा मालकहि तेथें होताच.

“ राक्षसांनो, ” मार खातां खातां कडकराम म्हणाला, “ त्या कैद केलेल्या माणसांना प्रथम सोडून द्या....त्यांना सोडल्याशिवाय मी इथून हलणार नाहीं...मग तुम्ही मला ठार मारलं तरी हरकत नाहीं. ”

“ ए ऽ मूर्खा ऽ ” तो पवनचक्कीवाला म्हणाला, “ कुठला किल्ला आणि कसले कैदी...इथं त्यांतलं कांहीं नाहीं... बडबड बंद कर... ”

“ उगाच खोटं बोलूं नका ! ” कडकराम म्हणाला,

“ तुम्ही सर्वजण दुष्ट जादूगार आहांत...तुम्ही जादूमुळें अनेकांना ह्या किल्ल्यांत कैद करून ठेवलेलं आहे...तुमच्याशीं वाद खेळण्यास मला अजिबात वेळ नाहीं...जगांतील अनेकांचीं दुःखं मला दूर करावयाचीं आहेत. ” त्या पवनचक्कीकडे पाहात ओरडत तो म्हणाला, “ अरे, त्या किल्ल्यांतील कैद्यांनो ! थोडे दिवस थांबा...हा वीर कडकराम तुमची सुटका करण्यासाठीं पुन्हा मोठी फौज घेऊन येत आहे... ”

त्या सर्व लोकांना कळून चुकलें कीं, हा एक मूर्ख मनुष्य आहे ! ह्याच्या नादाला लागून कांहीं उपयोग नाहीं. त्यांनीं त्या दोघांना अजून बडवून काढलें

व लाथा मारून हाकलून दिलें.

झुकांड्या खात खात किनाऱ्या-किनाऱ्यानें ते दोघेजण कसे तरी आपल्या घोड्याजवळ आले ! थोडी विश्रांति घेऊन पुन्हां पुढें निघाले... !

★ ★

# ११

# अग्निलोकांत प्रवेश

ते दोघेजण ज्या अंजनगडच्या जत्रेसाठीं चालले होते ते अजून बरेच दूर होते. वाटेंत अनेक वेळां त्यांनीं रस्ते बदलले होते, चुकले होते. त्यामुळें खरें म्हणजे ते वाट फुटेल तिकडे निघाले होते. घोडीं जात होतीं...ते जात होते एवढेच....! किंबहुना आपण अंजनगडला जाण्यासाठीं घराबाहेर प्रथम पडलों होतों हें ते विसरले होते !

आतां ते साखरपूर संस्थानच्या हद्दींतून जात होते. साखरपूर हें जरी छोटें संस्थान होतें तरी तेथील महाराज त्यांच्या निरनिराळ्या धोरणांमुळें प्रसिद्ध होते. त्यामुळें साऱ्या महाराष्ट्राला त्यांचा लहरी स्वभाव माहीत होता. ह्या छोट्या संस्थानांत शिस्त मोठी वाखाणण्यासारखी होती. महाराजांच्या उदारपणामुळें प्रजेला सर्व सुखसोयी लाभलेल्या होत्या. महाराज निरनिराळ्या कलांचे फार षौकीन होते. अनेक कलावंत त्यांच्या आश्रयानें मोठे झाले होते, प्रसिद्धीला आलेले होते. खुद्द महाराज उत्कृष्ट चित्रकार होते. त्यांनीं मोठमोठीं तैलचित्रें काढलेलीं होतीं. अशा सर्व गुणसंपन्न महाराजांच्या कानावर विक्षिप्त कडकरामच्या कथा गेलेल्या होत्या. त्यामुळें कडकराम ह्या प्रख्यात वल्लीला एकदां पाहण्याची त्यांची इच्छा होती. महाराणींनाहि कडकरामचे चाळे फार आवडले होते. त्याच्यासारख्या कल्पनासम्राटाला एकदां डोळे भरून पहावे असे त्यांनाहि वाटे. कडकराम एकदां आपल्या संस्थानांत आला पाहिजे असें त्याला वाटूं लागलें.

नेहमींप्रमाणें कडकरामनें जातां जातां दोन-तीन ठिकाणीं दुःखितांचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न केला व कडकरामचा अवतार त्यासाठींच आहे

हें जाहीर केलें होतें. राजाच्या सेवकांनींच त्या प्रसंगांतून कडकरामला सोडविलें होतें. म्हणून मार खाण्याचें राहून गेलें होतें ! निरनिराळ्या सेवकांनीं ह्या गोष्टी आपापल्यांत सांगितल्या. महाराजांच्या कानावर त्या जातांच त्यांना आनंद झाला ! आपल्या संस्थानांतून कडकराम जातोय असं कळल्याबरोबर त्यांनीं आपले दोन सेवक तातडीनें त्यांना मानानें बोलावून आणण्यासाठीं पाठविले.

" सरकार, " एक सेवक कडकरामला उद्देशून म्हणाला, " सरदार कडकराम आपणच का ? "

आकर्षक पोषाख केलेला साखरपूर संस्थानचा सेवक काय म्हणतोय हें प्रथम त्या दोघांच्या लक्षांतच येईना... ! इतकी नम्रता आजपर्यंतच्या प्रवासांत त्याच्या कोठेंहि पाहण्यांत आलेली नव्हती.

" होय ! " कडकराम म्हणाला, " मलाच सरदार कडकराम म्हणतात व हा माझा सेवक फडकराम आहे. "

सरदार कडकरामला त्या दोन्ही सेवकांनीं घोडयावरून उतरून प्रथम तीनदां लवून मुजरा केल्यावर त्यांतील एकजण म्हणाला, " सरदरसाहेब, आमच्या साखरपूरच्या महाराजांची अशी इच्छा आहे कीं, आपण उभयतांनीं चार दिवस त्यांचा पाहुणचार घ्यावा ! आपली कीर्ति त्यांच्या कानावर गेल्यामुळें आपली कधीं एकदां गांठ घेतांय् असं आपल्या महाराजांना वाटतंय्.... तरी आपण आमच्याबरोबर लगेच निघावं....आपल्या स्वागतासाठींच आम्हांला खुद्द महाराजांनीं पाठवलं आहे.... तेव्हा चलावं.... "

कडकरामला हें प्रथम खरंच वाटेना. त्याला आज कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. आपल्याला कोणा संस्थानिकाचें मानाचें आमंत्रण येईल असें स्वप्नांतही त्याला वाटलें नव्हतें. त्यानें मंद स्मित करून फडकरामकडे पाहिलें....त्यानें खुणेनेंच संमती दिली.

" चला, " कडकराम त्या सेवकांना म्हणाला, " आपल्या महाराजांची गांठ घेण्यास आम्हीही उत्सुक आहोंत. त्यांची कीर्ति आम्हीही फार दिवसांपासून ऐकत आलों आहोंत.... आज भेटीचा योग येत आहे म्हणून आम्हांला अतिशय आनंद वाटत आहे... चला ! "

त्या सेवकाच्या बरोबर ते निघाले. महाराजांनीं आपल्या ठिकठिकाणच्या व खुद्द राजवाड्यांतील सर्व नोकरांना कडकरामला अतिशय सन्मानपूर्वक वागविण्याच्या आज्ञा दिल्या होत्या. त्यामुळें आतां जातांना ठिकठिकाणचे संस्थानी सेवक कडकरामला लवलवून मुजरे करीत होते. कडकराम अगदीं हरखून जात होता. त्याच्या आयुष्यांत अशा तऱ्हेची संधी त्याला प्रथमच आलेली होती. लहानपणापासून त्याचें स्वप्न जणुं आज साकारत होते. एक महान सरदार म्हणून त्याचा गौरव होत होता. ठायीं ठायीं मुजरे होत होते.

एका खास अतिथिगृहांत त्यांची उतरण्याची शाही व्यवस्था करण्यांत आलेली होती. तें ठिकाण पाहतांच कडकराम—फडकराम एकमेकांकडे नुसते पाहूं लागले. आजपर्यंत त्यांच्या वांटणीला फक्त मारपीट व उपेक्षाच आली होती. आज त्यांचा वीरोचित सन्मान होत होता. अतिथिगृहाची खास सजावट केलेली होती. दासदासी नुसते झुलत होते. हुजरे ठिक-ठिकाणीं सेवेला हजर होते. थोडी विश्रांति घेऊन दोघेहि महाराजांच्या भेटीला निघाले. बरोबर खास सेवक होतेच.

राजवाड्यांत जातांच महाराज खुद्द दरवाजांत स्वागताला उभे होते. कडकराम—फडकरामनीं त्यांना लवून मुजरे केले! महाराजांनीं तर खुद्द कडकरामला वीरोचित वागणूक दिली. त्याला सन्मानाचा शाही पोषाख व एक सुंदर अशी छोटी तलवार दिली. फडकरामलाहि सेवकासारखा रेशमी पोषाख मिळाला.

" सरदार कडकराम," महाराज म्हणाले, " आपल्या ह्या भेटीमुळें आम्ही खूप झालेलों आहोंत. फार दिवसांपासून आपल्या पराक्रमाच्या अनंत कथा आम्ही जातीनं ऐकत आहोंत. तेव्हांपासून आपल्या भेटीची प्रतीक्षा करीत होतों. तो योग आज आलेला पाहून आम्ही समाधान पावलेलों आहोंत. आपल्या तोंडून खुद्द आपल्या महान पराक्रमाच्या कथा आपण आम्हांला रोज ऐकवाव्यात अशी आमची इच्छा आहे.. "

अशा तऱ्हेने रोज महाराज व महाराणी सरदार कडकरामच्या मूर्खपणाच्या गोष्टी ऐकूं लागले. त्यांची झकास करमणूक होत होती. महाराजांच्या

बरोबर रोज कडकराम—फडकराम जेवत खात होते. गप्पा मारीत होते. महाराज व महाराणींना आपलें हंसूं मोठ्या मुष्किलीनें दाबून ठेवावें लागत होतें! फडकरामनें एकदां आपली छोटें राज्य करण्याची सुप्त इच्छा बोलतां बोलतां सांगून टाकतांच महाराज त्याला म्हणाले, "मी आपणावर माझ्या एका लहान मुलखाचें राजेपद सोपवितों...तेव्हां मला आतां हें सांगा कीं तें राज्य आपण कसें सांभाळाल?"

महाराजांचें हें बोलणें ऐकून फडकरामला आपण जागे आहोंत कीं स्वप्नांत आहोंत असें एकदां वाटलें. त्याच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. आतां आपल्याला सरदारकी मिळाली असें त्याला वाटलें.

" महाराज, " तो म्हणाला, " राज्य कसं सामाळायचं हें मला चागलं माहीत आहे. मी आपली प्रजा सुखासमाधानांत राहण्याची पराकाष्ठा करीन...त्यांचें दुःख दूर करण्याचा सतत प्रयत्न करीन . आपण माझ्या ताब्यांत तें देऊन एकदां प्रयोग करून पहावा अशी माझी नम्र विनंती आहे...माझी खूप दिवसांची इच्छा त्यामुळं पुरी होईल...."

मग महाराणींना त्यानें राजकुमारी पद्माराजेंची हकीकत सांगितली. तिच्या जादूगारांनीं कसा प्रयोग केला हेंहि खुलून सांगितलें.

ही राजकुमारीची कथा मोठी गंमतशीर वाटली त्यांना ! बराच वेळ ते हंसत होते. कडकराम-फडकराम गेल्यावर महाराजांना एक गंमत सुचली ! त्यांनीं महाराणींना सांगतांच त्यांना हंसूं आवरेना !

महाराजांनीं शिकारीचा प्रचंड बेत आंखला होता. दरबारचे खास लोक व कडकराम फडकरामना घेऊन ते शिकारीला गेले ! दूरच्या जंगलांत जाण्यास बराच वेळ लागला. जातांना कडकरामच्या बोलण्यामुळें सारेजण हंसत होते ! तेवढ्यांत एका बाजूनें प्रचंड गडबड ऐकूं आली ! तीन-चार रंगीबेरंगी सजविलेल्या गाड्या दुरून येतांना दिसल्या. हें काय येत आहे हें कुणाला समजेना. कुणाला तरी मारण्याचा आणि कुणी तरी ओरडत असल्याचाहि आवाज एखाद्या गाडींतून येत होता. हळूहळू गाड्या जवळ दिसूं लागल्या ! निरनिराळे भयानक मुखवटे घातलेले लोक गाड्यांतून बसले होते. त्यांचे पोषाखहि चित्रविचित्र होते. रंगीबेरंगी फराऱ्या लावलेल्या

गाड्या उठून दिसत होत्या. मुखवटेहि रंगीबेरंगी होते.

हें पाहून फडकराम फार घाबरला. कडकरामलाहि हें काय आहें हें कळेना तोहि मनांतून मनस्वी घाबरलेला होता. पण चेहऱ्यावर कांहीं तो दाखवीत नव्हता. तेवढ्यात पहिली गाडी जवळ येऊन थांबली...चित्रविचित्र पोषाख केलेला एक जादूगारहि त्यांत होता. गोषा घेतलेल्या कांहीं स्त्रिया होत्या.

गाडीजवळ येतांच जादूगार म्हणाला, "मी जादूगार आहे...सुंदरपूरच्या राजकुमारी पद्माराजेवर मी जादू केल्यामुळें ती अतिशय दुःखी झालेली आहे...मी दिलेलें खेडूत तरुणींचें रूप तिला अजिबात पसंत नाहीं. तिचें मूळ स्वरूप मी तिला परत द्यावें म्हणून ती रोज माझ्या हांतापायां पडत आहे...त्यासाठींच मी तिला आणलेलें आहें...परंतु इथं जो फडकराम नांवाचा सरदार कडकराम यांचा सेवक आहे त्याच्या हातांत हें सारें आहे जर फडकरामनें आपल्या हातानें स्वतःला तीन हजार फटके मारून घेतले तरच राजकुमारीला मूळ स्वरूपसौंदर्य प्राप्त होईल...आणि ही वेळ जर चुकविली तर ती कायमची मुकी-बहिरी व आंधळी होईल...!"

हें ऐकतांच फडकराम थरथर कांपूं लागला. अतिशय घाबरला. तो बोलण्याचा प्रयत्न करीत होता पण तोंडांतून शब्द फुटत नव्हता. अखेर मोठ्या कष्टानें तो म्हणाला, "तीन हजार फटके! त्यापेक्षां मला फांसावर लटकाविलें तरी तें मी पसंत करीन...शिवाय आपल्याच हातानें मी फटके कसे मारून घेऊं? आणि हें कशासाठीं? मी काय घोडं मारलंय कुणाचं? राजकुमारीवर केलेल्या जादूचा आणि तसा माझा संबंध काय? ती मुकी होवो, आंधळी होवो अगर बहिरी होवो—मला काय करायचंय...हा मी चाललों घरीं."

फडकरामचें हें बोलणें ऐकून कडकरामला फार राग आला व वाईटहि वाटलें.

"फडकराम," कडकराम दुःखी आवाजांत म्हणाला, "माझ्यासाठीं इतकंहि तूं करूं शकत नाहींस? तूं जर तुझ्या हातांनीं फटके मारून घेऊं शकणार नसशील तर झाडाला बांधून मी तुला फटके मारीन, समजलास! परंतु ते फटके तुझे तूंच खाल्ले पाहिजेत असं जादूगाराचं म्हणणं आहे...

...७

तेव्हां आपणहून तुला तयार व्हायलाच हवं...राजकुमारीला या संकटांतून तूं वाचवलं पाहिजेस...जर एकदम तुझ्याच्यानं हें होत नसेल तर सात-आठ दिवसांत तीन हजार फटके पुरे कर...काय हो जादूगार...चालेल का हें?"

"चालेल! चालेल!" जादूगार म्हणाला.

"फडकराम," महाराज म्हणाले, "आतां तुमचं काय म्हणणं आहे?"

"कांहीं, नाहीं, महाराज," फडकराम आवंढा गिळून म्हणाला, "मी तीन हजार फटके मारून घेतले असं तूर्त समजा."

"तें ठीक आहे." महाराज म्हणाले, "जर ते फटके मारून घेतले नाहीं तर हें लक्षांत राहूं दे कीं मी परवा सांगितलेलं राज्य मिळणार नाहीं! आपल्या मालकाची साधीसुधी इच्छा देखील तुम्ही जर पूर्ण करूं शकत नाहीं तर राज्य चालविणें इतकें सोपें नाहीं...तें मिळविण्यास कष्ट पडतात... तिथं जादू वगैरे कांहीं चालत नाहीं."

नाइलाज म्हणून अखेर फडकराम फटके मारून घेण्यास तयार झाला व म्हणाला, "मी असे फटके मारून घेईन कीं ज्यामुळें रक्त निघणार नाहीं— जे फटके मी मारीन पण योगायोगाने पाठीवर असणार नाहींत ते मोजले जाणार नाहींत!"

त्याची ही अट मंजूर झाली. कडकरामनें आपल्या ह्या प्रामाणिक सेवकाला प्रेमाचें आलिंगन दिलें. त्याला तर आतां राजकुमारी आपल्याला मिळाली असेंच वाटलें! सर्व लोक खूष झाले. घरीं परतले.

जादूगाराचा तांडा दूर गेला! महाराजांच्या नोकरांनीं जादूगाराचें सोंग व्यवस्थित आणलें होतें! हें सारें नाटक खुद्द महाराजांनीं रचलें होतें!

फडकराम आतां दररोज आपल्या पाठीवर फटके मारून घेऊं लागला....! राजकुमारी कडकरामला मिळो अथवा न मिळो, पण त्यामुळें त्याला राज्य मिळणार होतें हें निश्चित! राजवाड्यातील सारे जण फट-क्याचा हा सोळा पाहत असत व हंसूं लपवीत असत! अंदर की बात फक्त त्यांनाच माहीत होती!

महाराजाचा एक नोकर फार हुषार होता. आपल्या मालकाला खूष करण्यासाठीं त्यानें आणखी एक गंमत घडवून आणण्याचें ठरविलें. आपली

योजना त्यानें महाराजांना व महाराणींना सांगतांच त्यांना हंसूं आवरेना. त्यांनीं तात्काळ संमती दिली.

त्या नोकरानें स्त्रीवेष घेतला व रडत रडत जाऊन कडकरामचे पाय धरले.

" ऊठ, रडूं नकोस. " गाडिवरून कडकराम म्हणाला,

" कशासाठी रडत आहेस ? "

" सरकाऽर "

" बोऽल....बोऽल "

" सरकार, " ती म्हणाली, " तुमच्याशिवाय माझे दुःख दूर होणार नाहीं...जगांत तुम्हीच असे वीर बहादुर आहांत....त्यामुळं आपली दिगंत कीर्ति ऐकून मी आपल्या चरणांशीं आलें आहें...एका राक्षसानं जादू करून माझं घरदार पळविलं आहे... ! त्याच्या तावडींतून तें तुम्ही परत मिळवून आणा...तें फक्त तुम्हांलाच जमेल....त्याच्याशीं लढाई करण्याचं सामर्थ्य फक्त तुमच्यामध्येंच आहे...येरागबाळ्याचं तें काम नाहीं. "

" अगदीं किरकोळ काम आहे हें. " कडकराम स्तुतीमुळें फुगून जाऊन म्हणाला, " पण तो राक्षस कुणीकडे गेला ?

" तेंच सांगत आहें, सरकार. " ती स्त्री म्हणाली, " तो उंच आकाशात गेला. तेव्हा त्याच्याकडे जाण्यासाठीं मी एक जादूचा लाकडी घोडा आणला आहे...त्यावर बसून उंच आभाळांत जाण्यास तुम्हांला भीति वाटेल म्हणून तुमचे डोळे बाधून मी तुम्हांला त्यावर बसवीन...त्याच्या मानेवर एक कळ आहे. ती फिरविली कीं घोडा उंच उंच जाईल...त्याला लगामाची जरूरी नाहीं...राक्षसाला मारून तुम्ही मात्र लगेच परत या...मी वाट पाहत बसतें... "

कडकराम असल्या संधीची वाटच पाहत होता. आल्यापासून त्याला अशी भरीव कामगिरी मिळालेली नव्हती. त्यामुळें त्याला आजिबात चैन पडत नव्हतें. शिवाय खुद्द महाराजांसमोर त्याला आज आपला पराक्रम दाखविता येणार होता...त्यामुळं तो अगदीं आनंदांत होता... !

महाराजांनीं तातडीनें एक पोकळ लाकडी मोठा घोडा तयार करून घेऊन राजवाड्यासमोरील पटांगणात तयार ठेवला होता. महाराज, महाराणी

व दरबारचे खास लोक कडकरामचा हा पराक्रम पाहण्यास बसले होते.

सर्वांच्या देखत कडकराम व फडकराम मोठ्या रुबाबात तेथें आले. दोघांनींहि युद्धाचा खास पोषाख घातलेला होता. कडकरामनें कमरेला दोन तलवारी व हातांत त्याचा आवडता भाला घेतला होता. त्या दुःखी स्त्रीनें त्या दोघांचे डोळे कापडाच्या पट्टीनें बांधतांच ते दोघे घोड्यावर स्वार झाले, कडकरामनें घोड्याच्या मानेवर असलेली कळ दाबतांच घोडा वर जाऊं लागला ! पाठीमागून लोक घोडा ढकलीत होते...तो पुढें पुढें जात होता ! कडकरामला मात्र आपण वर वर चालल्यासारखें वाटत होतें...लोक घोड्याला गोलाकार फिरवीत होते.

"फडकराम," कडकराम ओरडला, "नीट व्यवस्थित बैस... वाटल्यास मला धरून बैस.... घोडा उंच उंच जाऊं लागला आहे... राक्षस दिसतांच मी त्याला ठार मारीन.... तूं अजिबात घाबरूं नकोस... मी सर्व पाहतों !"

लोक हंसत होते ! अशी लोकविलक्षण करमणूक त्यांची कधींही झालेली नव्हती !

"फडकराम," थोड्या वेळानें कडकराम पुन्हा म्हणाला, "आपण बरेच वर आलों आहोंत... लवकरच आपण राक्षसाच्या नगरींत जाऊं.... घोडा फार गतीनं वरवर जात आहे..."

महाराजांचे बरेचसे नोकर कांहीं वेळानें हातांत मशाली घेऊन घोड्या-भोंवतीं नाचूं लागले !

"फडकराम," कडकराम म्हणाला, "बघ... ! आतां आपण बहुतेक अग्निलोकांत पोहोंचलों आहोंत... सगळीकडे अग्नीच अग्नी बांधलेल्या डोळ्यांनाही दिसत आहे .. तेथील लोक नाचनाचून आपलें स्वागत करीत आहेत... आतां स्वर्गलोक प्रथम येईल व मग राक्षसाची नगरी येईल. स्वर्ग-लोकांतून सारे देव आपलं स्वागत करतील..."

फडकरामच्या आश्चर्याला पारावार उरला नव्हता ! निदान स्वर्गलोकांतून जातांना हळूच डोळ्यांची पट्टी दूर करावी असें त्याला वाटूं लागलें. त्याला देवाचें दर्शन घेण्याची संधी आपण सोडायची नव्हती...तोपर्यंत अग्निलोक

थोडासा पाहावा ह्या हेतूनें डोळ्यांची पट्टी तो थोडीशी दूर करणार तोंच तो घोडा एकदम उंच जाऊन खालीं पडला ! त्यांत सुरुंगाची दारू भरलेली होती. महाराजांच्या नोकरांनीं घोड्याच्या शेपटीला आग लावल्याबरोबर घोडा उंच उडून खालीं पलीकडे लांब जाऊन पडला !

त्या पटांगणांतील बागेच्या एका कोपऱ्यांत कडकराम व फडकराम जोरांत आपटले !

कडकरामनें डोळ्यांची पट्टी दूर केली ! आपण महाराजांच्या बागेंतील कोपऱ्यांत तोंडावर पडलों आहोंत व आपल्या अंगावर फडकराम कोसळला असल्याचें त्याला दिसून आलें. आपण अग्निलोकांतून एकदम येथें कसें आलों हें प्रथम त्याच्या लक्षांतच येईना. आपले कपडे झटकत तो पटकन् उठला. इकडे तिकडे पाहिलें सारेजण हंसू लपवीत होते. तिकडे दुर्लक्ष करून कडकराम म्हणाला, " आमची कामगिरी फत्ते झाली आहे. राक्षसाचा मी निकाल लाविला आहे. पण तो फार प्रचंड होता. मरता मरता त्यानें आम्हांला उचलून खालीं फेकलें म्हणून जोरानें आम्हीं खालीं पडलों. हरकत नाहीं.... त्या दुर्दैवी स्त्रीचें घरदार आतां तिला परत मिळेल.... त्या राक्षसाला घाबरण्याचें कांहीं एक कारण नाहीं ! "

कडकराम-फडकरामच्या ह्या चाळ्यांमुळें महाराजांचे दिवस मजेंत चालले होते. ह्या नवीन विदूषकामुळें महाराणीहि खूष होत्या. रोज नित्य नवें मनोरंजन होत होतें. अजून कांहीं तरी करमणूक त्यांना हवी होती.

" फडकराम, " महाराणी एक दिवशीं म्हणाल्या, " उद्यां तुम्ही सरदार बनून संस्थानच्या चंदनपेट्याला जा... तेथील कारभार तुम्हांला पहावा लागेल...तुमची प्रजा तुमची वाट पहात आहे....तुमच्या स्वागताला तयार आहे .. "

महाराणींनीं चंदनपेट्याच्या आपल्या सर्व नोकरांना फडकरामच्या स्वागताच्या सर्व सूचना दिल्या होत्या. त्याच्याशीं कसें वागायचें हेंहि सांगून ठेवलें होतें !

फडकरामला स्वर्ग दोन बोटें उरला होता ! फारा दिवसांचें त्याचें स्वप्न साकारणार होतें. त्याच्या बायकापोरांचें कल्याण होणार होतें... !

★ ★

## १२

# फडकरामची सरदारकी

त्या दिवशीं रात्रभर फडकरामला झोंप आली नाहीं ! आपल्या राज्याचा कारभार आपण कसा करायचा याचे मनसुबे तो रचीत होता— त्याला आदर्श राज्यकारभार करायचा होता. पहांटेपासून कडकराम त्याला सरदारकीचे धडे देत होता. प्रजेची किती काळजी घ्यावयास हवी हें समजून सांगत होता. " फडकराम," कडकराम म्हणाला, " सरदारकी सांभाळण्यासाठीं प्रामाणिकपणाची अतिशय आवश्यकता आहे. रयत नेहमीं सुखी व आनंदी असायला हवी. आजपर्यंतच्या माझ्या कीर्तीला साजेलशी तुझी राज्ययंत्रणा हवी. कोणत्याहि गोष्टीमुळें मला तूं खालीं पहायला लावणार नाहींस अशी माझी खात्री आहे—"

शुभ वेळ पाहून सकाळीं फडकराम मोठ्या दिमाखांत आपल्या राज्यांत निघाला. कडकरामनें मोठेपणाच्या नात्यानें त्याला शुभाशीर्वाद दिले.

" सरदार, " फडकराम गहिंवरून म्हणाला, " आपल्याच सेवेचें हें फळ आहे— आपण माझी काळजी करूं नका— आपलं नांव उजळण्यासारखी कामगिरी मी करून दाखवीन—"

कडकराम घोड्यावर स्वार झाला. त्याच्याबरोबर महाराजांचे दोन हत्यारबंद सेवक होते. दोन नद्यांच्या मधील भागाचा कारभार त्याला पहायचा होता. आपल्या हद्दींत ते पोहोंचतांच तेथील प्रमुख सेवकानें त्याचें स्वागत केलें ! शिवाय कांहीं प्रतिष्ठित नागरिकहि त्या वेळीं उपस्थित होते. त्यांनीं हारतुरे फडकरामला घालून जनतेच्यावतीनें स्वागत केलें. फडकरामनें सर्वांची ओळख करून घेतली. तेथून लगेच तो आपल्या सेवका-

सह कार्यालयांत गेला व काम पाहूं लागला !

जरा विश्रांती घेऊन दुपारीं त्याला न्यायदानाचें काम पहायाचें होतें. बरेच काम तुंबून राहिलें होतें. किती तरी प्रकरणांचा निकाल द्यावयाचा होता. पहिला खटला एका शिंप्याचा व खेडुताचा होता.

" सरकार, " शिंपी फडकरामला मुजरा करून म्हणाला, " कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट आहे. ह्या माणसानं कापडाचा एक तुकडा माझ्याकडे आणून मला टोपी तयार करण्यास सांगितली. मी त्याला होय म्हटलें. पुढें तो म्हणाला कीं, ह्या कापडाच्या दोन टोप्या बनतील काय? मी म्हणतों होय! नंतर त्यानें तीन, मग चार व शेवटीं पांच टोप्या तयार करण्यास सांगितलें तरी मी होयच म्हणालों! टोप्या तयार होऊन बरेच दिवस झाले तरी हा माणूस त्याचे शिलाईचे पैसे अजून देत नाहींच, पण उलट मला कापड नाहीं तर त्याचे पैसे परत मागतोय...."

" काय रे," फडकरामने त्या माणसाला दरडावून विचारले, " ही कुठली पद्धत? तूं अजून ह्या शिंप्याला पैसे कां देत नाहींस? "

" महाराज, " हा माणूस म्हणाला, " ह्या शिंप्याला त्या टोप्या तरी दाखविण्यास सांगा...आपण एकदां डोळ्यांनीं पहा...व मग मला विचारा."

शिंप्यानें खिशांतून त्या पांच टोप्या काढून फडकरामला दाखवितांच तेथें सर्व लोक हंसूं लागले. हा नामांकित खटला ऐकण्यास बरेच नागरिक उपस्थित होते. शिवाय आपला नवा सरदार कसा न्याय देतो हेंहि सर्वांना पहायाचें होतें. त्या टोप्या इतक्या लहान होत्या कीं त्यांत फक्त एखादें बोट कसें तरी गेलें असतें !

" महाराज, " तो शिंपी नम्रतेनें म्हणाला, " ह्या पहा पांच टोप्या.... मी शपथपूर्वक सांगतों कीं ह्या माणसानें दिलेल्या कापडांतील एक चिंधी देखील मी खाल्लेली नाहीं....जेवढं कापड होतं तितक्या टोप्या केल्या...."

ह्या गंभीर समस्येवर फडकरामनें थोडा विचार करून निकाल दिला, " मोठा चमत्कारिक खटला आहे हा, तरीहि माझा असा हुकूम आहे कीं, शिंप्याला शिलाईचे पैसे मिळूं नयेत व ह्या माणसाला कापडाचे पैसेहि मिळूं नयेत. ह्या टोप्या दुसऱ्या कोणा माणसास दिल्या जाव्यात ! "

नव्या सरदाराचा हा अजब निकाल ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें. परंतु हुकुमाविरुद्ध जाण्याची कुणाचीहि टाप नव्हती. फडकरामचा रुबाब पाहून सारे त्याला घाबरत होते. लोकांना मात्र हंसू आवरत नव्हतें.

आतां दुसरा खटला पुढें आला. दोघेजण पुढें आले. एकाच्या हातांत एक मध्यम आकाराची छडी होती. दुसऱ्याच्या हातांत कांहींहि नव्हतें.

" सरकार, " दुसरा मनुष्य म्हणाला, " ह्या छडीवाल्या माणसानें माझ्याकडून सोन्याच्या दहा मोहरा उधार नेल्या होत्या. तेव्हां तो असं म्हणाला होता कीं जेव्हां मी त्याला पैसे मागेन तेव्हां तो परत देणार होता, परंतु जेव्हां प्रत्यक्षांत मी त्याला पैसे मागण्यास गेलों तेव्हां मोहरा परत केल्या आहेत अशा खोट्यानाट्या गप्पा तो मारूं लागला. मोहरा परत दिल्या आहेत असें देवाची शपथ घेऊन तो जर आपल्यासमोर सांगण्यास तयार असेल तर त्या पैशावर पाणी सोडण्यास मी तयार आहें. तो जर प्रामाणिक असेल तर माझें धन परत करील. "

" काय रेऽ " फडकराम त्याला दरडावून म्हणाला, " त्याचे पैसे त्याला कां दिले नाहींस ? कसली वाट पाहतो आहेस ? "

" हुजूर, " तो मनुष्य नम्रतेने म्हणाला, " हा गृहस्थ एकदम खोटं-नाटं सांगत आहे ..त्याच्या सर्व मोहरा त्यालाँ मी परत दिल्या आहेत... आपल्यासमोर वाटेल तेवढ्या शपथा खाण्यास मी तयार आहें...दिलेल्या वचनाला जागणारी जात आहे ही महाराज. "

असें म्हणून त्या माणसानें आपल्या हातांतील छडी त्या माणसाजवळ देत म्हटलें कीं " साऱ्या मोहरा मी परत केल्या आहेत ! आतां त्याचं कांहींहि देणं मी लागत नाहीं. "

ज्याच्या मोहरा घेतलेल्या होत्या त्याला फार आश्चर्य वाटलें. मोहरा कसल्याहि परिस्थितींत परत दिल्या नसतांना हा परत केल्याचें बिनदिक्कत कसें सांगत आहे !

" महाराज, " तो गृहस्थ म्हणाला, " हा चक्क खोटं बोलत आहे... खोटी शपथ घेत आहे...ही छडी माझी नाही...मला नको आहे...मला मोहरा परत हव्या आहेत... "

फडकराम कांहीं बोलण्यापूर्वींच त्या दुसऱ्या माणसानं आपली छडी त्या पहिल्या माणसाकडून परत घेतली व फडकरामला मुजरा करून तो एकदम बाहेर निघून गेला. सारेजण बघूं लागले. फडकरामच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. आपण कांहीं निकाल देण्यापूर्वींच हा परत कसा फिरला ?

आपले सेवक बाहेर पाठवून फडकरामनें त्या माणसाला पकडून आणलें ! फडकरामनें त्याच्या हातांतील ती छडी काढून घेतली व त्या मोहरावाल्या माणसाच्या हातांत ती छडी देत म्हटलें, " ह्या धर तुझ्या मोहरा...तुला परत दिल्या आहेत...जा...तुला न्याय मिळाला आहे ! "

तो माणूस अजून बुचकळ्यांत पडला. सरदार काय म्हणत आहेत हें त्याला कळेना.

" सरकार, " तो म्हणाला, " गरिबाची चेष्टा करूं नका मायबाप... चार पोराबाळांचा धनी आहें मी . गरिबाला न्याय द्या— ही छडी कुणीकडे व त्या दहा मोहरा कुणीकडे ? काय करायचीय ही छडी मला...! "

" आण ती छडी इकडं, " हंसून फडकराम म्हणाला, ती छडी हातात घेऊन तिचे दोन तुकडे करतांच तिच्यांतून दहा मोहरा खालीं पटकन पडल्या ! सारी न्यायसभा पाहूं लागली ! नव्या सरदाराच्या विलक्षण चातुर्याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. कौतुक वाटलें.

अशा तऱ्हेचा लोकविलक्षण न्याय व चमत्कारिक खटला कुणी अजून-पर्यंत पाहिला नव्हता.

त्यानंतर अजून बऱ्याच खटल्यांचें काम फडकरामनें पाहिलें. संध्याकाळ होत आली. आतां मात्र तो चांगलाच कंटाळला.

तो येईपर्यंत त्याचें निवासस्थान व्यवस्थित सजविलें होतें. जेवण तयार होतें. भरपूर ताव मारून फडकराम विसावला. आजच्याइतकी शांत झोंप अलिकडे त्याला कधींहि लागलेली नव्हती...!

अशा तऱ्हेनें दिवस जात होते. रोज काम वाढत होतें. नित्य नवें काम उपस्थित होत होतें. फडकराम अगदीं थकून जाई. हळूहळू ह्या दररोजच्या त्याच त्या कामाचा त्याला वीट आला. ह्या नव्या जबाबदारीचा कंटाळा आला. क्षणाचीहि फुरसद मिळत नव्हती. एकान्त मिळत नव्हता. मोकळीक

नव्हती. नव्या ओळखी होत नव्हत्या. झाल्या तरी वाढवितां येत नव्हत्या. सतत चारदोन शिपाई त्याच्या अंवतींभंवतीं असत! ही जबाबदारीची जागा पेलणं सोपं नाहीं ही खात्री होऊन चुकली.

एकदां फडकरामचा रात्रीं नुकतांच डोळा लागला होता. दिवसभरच नव्हे तर रात्रीं उशीरपर्यंत तो कामांतच होता. जरा पडतो न पडतो तोंच त्याला झोपेंतून उठविलें गेलें! शत्रूनें अचानक हल्ला केला होता! शत्रू एकदम तुटून पडला. ध्यानीं मनीं नसतांना आतां! पण हें सारें महाराजांनीं केलेलें नाटक आहे याची कल्पना फडकरामला नव्हती! त्याचें कामदेखील मुद्दाम वाढविण्यांत आलें होतें! त्याला बेजार करून सोडणें हाच एक हेतु त्यामागें होता.

" हुजूर, " एक शिपाई त्याला झोंपेंतून उठवीत म्हणाला, " दगा! दगा झाला, महाराज! उठा...सत्वर जागे व्हा. "

" काय झालं? " फडकराम झोंपेंतून जागा झाल्यावर म्हणाला.

" सरकार, " शिपाई म्हणाला, " लढाईची तयारी करा...शत्रूनं अचानक हल्ला केला आहे...चल! आपलें दुसरें पथक तयार आहे... आपल्या हुकुमाची वाट पाहत आहे. "

लढाई! शत्रू! शब्द ऐकतांच फडकरामच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. त्याला आजपर्यंत हे शब्द ऐकूनच माहीत होते. पण आतां प्रत्यक्षांत...! अरे बापरे! कुणीकडून आपल्याला ही सरदारकीची आवदसा आठवली असें झालें त्याला. आजपर्यंत लढण्याचें काम सरदार कडकराम पार पाडीत होता. फडकराम लांब उभा राहूनच सारा खेळ पाहत असे.

शिपायांनीं घाईघाईनें त्याच्या अंगावर लढाईचा पोषाख चढविला. ढाल-तलवार आली. पथकाबरोबर फडकरामला निघावें लागलें. कृष्ण पक्ष असल्यामुळें काळाकुट्ट अंधार पडला होता. समोर कोण उभं आहें हेंहि स्पष्ट दिसत नव्हतें. जोराची थंडी गार-वाऱ्यामुळें फडकराम थरथरूं लागला. शिवाय चिलखत वगैरे लढाईचा पोषाख त्याला पेलत नव्हता! भीतीमुळें त्याचे पाय उचलत नव्हते. थंडीचा कडाका असूनहि त्याला घाम फुटण्याची वेळ आली.

शत्रूचा आरडाओरडा समोर ऐकूं येऊं लागला. जोरदार लढाई चालू झाली होती. पहिलें पथक रणमैदानांत केव्हांच उतरलें होतें. धांवपळ चालू होती. कुणाचा तरी धक्का लागून फडकराम खालीं पडला...अनेक शिपाई त्याला तुडवून गेले ! कुणाला कुणाचा मेळ नव्हता. कांहीं दिसत नव्हतें. नुसती दंगल माजलेली होती. फडकराम प्रत्यक्ष लढाई न करतां चांगलाच सडकून निघाला.

थोड्याच वेळांत लढाई बंद झाली. शत्रू पळून गेला.

" सरकार, " एक शिपाई म्हणाला, " आपण होतां म्हणून शत्रु पळून गेला. आपल्यासारखा पराक्रमी सरदार ह्या भागाला अजूनपर्यंत लाभलेला नाहीं. आपण जर आज नसतां तर शत्रु राज्य गिळंकृत करीत होता..."

खालीं पडल्यामुळें व लोकांनीं तुडविल्यामुळें फडकरामला बरेंच लागलें होतें. अंधारामुळें याची कुणाला कल्पना नव्हती. कांहीं शिपायांना वाटलें कीं लढाईतच हा जखमी झालेला आहे ! घरीं पडल्यावर शिपायांनीं त्याला मलमपट्टी केली.

या जखमा बऱ्या झाल्या कीं इथून निघून जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. आतां मात्र तो पुरता विटला होता. कांहीं दिवसांनीं बरें वाटतांच एके दिवशीं खरोखरच तो निघाला. लोकांना हें कळतांच त्यांनीं त्याला थांबण्याची खूप विनंती केली पण तो ऐकेना...! कुणाचेंहि कांहीं न ऐकतां अखेर घोड्यावर तो स्वार झाला !

साखरपूरच्या महाराजांना आपलें परत येण्याचें कारण सांगून तो म्हणाला, "महाराज, मी ही सरदारकी हौसेनं मागून घेतली परत माझ्याच्यानं ती कामगिरी पुरी पार पडली गेली नाहीं म्हणून खूप वाईट वाटत आहे. आता मला आपण घरीं परतण्याची आज्ञा द्यावी... "

महाराज कांहींच बोलले नाहींत. त्याच्या सेवकांनीं लढाईचें नाटक व्यवस्थित पार पाडलें होतें. व दैनंदिन कामांत फडकरामला व्यवस्थित तंग करून सोडलें होतें. महाराजांनीं फडकरामला थांबण्याचा खूप आग्रह केला परंतु त्यानें निश्चय सोडला नाहीं. फडकरामलाहि तेथें राहण्याचा कंटाळा आला होता. रोज त्याच त्या गप्पांत कोणी रंगत नव्हते. त्यानेंहि महाराजांना

जाण्याची परवानगी मागितली.

महाराजांना धन्यवाद देऊन दोघेहि पुन्हा प्रवासास निघाले. साखरपूरच्या निमित्तानें त्यांचा काळ तेथें बराच गेला होता.

नवा प्रवास पुन्हां सुरू झाला... !

* *

# १३

# अखेरचा पराभव

प्रवासांत फडकराम आपल्या सरदारकीच्या हकीकती सांगत होता. क्षणाक्षणाला फुशारक्या मारीत होता. परंतु फडकरामचें त्याच्या बडबडीकडे अजिबात लक्ष नव्हतें. त्याच्या डोक्यांत त्या जादूगाराचे शब्द अजून घुमत होते. राजकुमारी पद्माराजेची सुटका हें त्याचें आतां महत्त्वाचें कार्य होतें. तेथें ठरल्याप्रमाणें फडकरामनें तीन हजार फटके मारून घेतलेले नव्हते. त्यामुळें राजकुमारीची मुक्तता खोळंबून राहिली होती.

" फडकराम, " कडकराम म्हणाला, " तुझें फटक्याचें काम अजून अपूर्ण आहे.... डोळ्यांत प्राण आणून राजकुमारी मुक्ततेची प्रतीक्षा करीत असेल. "

" हुजूर, " फडकराम म्हणाला, " माझ्या लक्षांत आहे. आपण निश्चिंत असा. मी दिलेलं वचन माझ्या चांगल्या स्मरणांत आहे. एक दिवस असा उजाडेल कीं त्या दिवशीं माझे तीन हजार फटके पूर्ण होऊन राजकुमारी तुमच्यासमोर येऊन हजर होतील !

जातां जातां वाटेंत त्यांना उरमोडी नदी लागली. पलीकडेच एक गांव होतें. तेथें त्यांनी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं कडकराम नदीकाठीं सहज घोड्यावरून हिंडत असतां एका पंचकल्याणी घोड्यावर स्वार झालेला दुसरा एक सरदार त्याला दिसला. आपला पांढराशुभ्र अरबी घोडा तो मोठ्या थाटानें इकडून तिकडे मिरवीत होता. त्याचा पोषाख अतिशय रुबाबदार होता. हातात अणकुचीदार भाला होता. तो कडकरामला ओळखीत होता !

" सरदार कडकराम, " तो दुसरा सरदार म्हणाला,

" तुम्ही खूप नामांकित सरदार आहांत याची मला कल्पना आहे.... तुमच्या अनेक लढायांची मला माहिती आहे.... पण तरीहि माझें तुम्हांला युद्धाचें आव्हान आहे ! मी तुमच्या त्या राजकुमारी पद्माराजेला जगांतील सर्वोत्तम सुंदर स्त्री मानण्यास अजिबात तयार नाहीं. तिच्याहून सुंदर अशा दासी ठिकठिकाणीं मी पाहिल्या आहेत ! "

कडकरामला हें बोलणें उद्धटपणाचें वाटलें ! तो खवळला. बऱ्याच दिवसांपासून त्याचे हात सळसळत होते, परंतु त्याला संधि मिळाली नव्हती. त्यानें आव्हान स्वीकारलें !

" कडकराम " तो दुसरा सरदार म्हणाला, " लढण्यापूर्वी माझी एक अट आहे ! "

" कोणती ? "

" जो सरदार ह्या लढाईंत हरेल त्यानें हत्यारें येथेंच टाकून पुन्हां भटकन्तीसाठीं कधींच घराबाहेर पडायचें नाहीं ? सरदारकी सोडायची आहे तयारी ? "

" आहे ! "

कडकरामला आपल्या पराक्रमाची खात्री होती. त्याच थाटांत त्यानें उत्तर दिलें.

लढाईला तोंड लागलें ! एकमेक एकमेकांवर नेम धरूं लागले. कडकराम घोड्याला विशिष्ट तऱ्हेनें लगाम खेचून मागच्या पायावर उभा करूं लागला. टपल्या पुढचे दोन्ही पाय ऐटींत वर करून झेंप टाकूं लागला. साखरपूरच्या महाराजांच्या तबेल्यांत भरपूर खाऊन तो तट्ट फुगलेला होता.

फडकराम दूर उभा राहून टेहळणी करीत होता. असल्या प्रकाराला आता तो मात्र पुरता विटलेला होता. द्वंद्वयुद्ध चांगलेंच रंगाला आलें होतें. नदीकिनारीं असलेले बरेच लोक तेथें गोळा होऊन हा अद्भुत सामना पाहूं लागले होते. कडकरामचा जोराचा आरडाओरडा चालू होता !

परंतु पाहतां पाहतां त्या जबाबदार नव्या सरदारानें कडकरामला खालीं पाडलें ! त्याचा घोडाही जखमी होऊन खालीं पडला.

" कडकराम " त्याच्या छातीवर भाला रोखून तो सरदार म्हणाला, " ठरलेल्या अटीनुसार आतां घरीं परतण्यास चला ! आतां सरदारकी संपली ! जगाचं दुःखनिवारण करण्याचं महान् कार्य संपुष्टांत आलं.... आतां घरींच काय गोंधळ घालायचा आहे तो घाला.... ! "

आपल्या नशिबानें आज आपल्याला दिलेला धोका पाहून कडकराम फार नाराज झाला.

" सरदार, " कडकराम दुःखी होऊन म्हणाला, " माझ्या दुर्दैवानं पराभव झाला आहे हें खरं आहे. परंतु राजकुमारी पद्‌माराजे जगांतील सुंदर स्त्री नाहीं हें मी प्राण गेला तरी कबूल करणार नाहीं. झालेल्या पराभवामुळं माझं सर्व कार्य अपूर्ण राहिलेलं आहे. आयुष्यभर मी जितकं मिळविलं तितकं आज घालविलं आहे. माझं नांव.... माझा पराक्रम....सारा संपला. आज तुझ्या हातून मला मरण जरी आलं असतं तरी तें मला अधिक परवडलं असतं. अशा तऱ्हेचं अपमानित जीवन जगण्याची इच्छा नाहीं माझी. "

" सरदार, " तो दुसरा सरदार म्हणाला, " इतके निराश होऊं नका...राजकुमारी पद्‌माराजे जगांतील सर्वांत सुंदर स्त्री आहेत हें वाटल्यास मी मान्य करीन पण तुम्ही मात्र यापुढें हत्यारबंद होऊन घराबाहेर पडायचं नाहीं. "

कडकरामनें नाइलाजानें ही अट मान्य केली. आपलीं हत्यारें तेथेंच टाकून कडकराम फडकरामबरोबर गांवीं जाण्यास निघाला !

त्याचा पराभव करणारा तो दुसरा सरदार म्हणजे वेषांतर केलेला शंकरच होता. कडकराम गांवीं परत येण्यासाठींच केवळ ही अट त्यानें घातलेली होती. त्याचा हेतु सफळ झालेला होता.

वाटेंत फारसे कुणी बोलत नव्हते. झालेल्या प्रकारामुळें कडकराम बोलण्याच्या परिस्थितींत नव्हता. राजकुमारी पद्‌माराजे ही सर्वश्रेष्ठ असल्याचें त्या दुसऱ्या सरदारानें मान्य केलें होतें, परंतु फडकरामनें तीन हजार फटके अजून पूर्ण केले नव्हते त्यामुळें तिची सुटका अजून झालेली नव्हती. फडकरामला याची आठवण त्यानें पुन्हां दिली. आपल्या मालकाची दुःखी कष्टी

अवस्था पाहून तो लगेच तयार झाला. परंतु त्याबद्दल त्यानें एक हजा मागितले ! नाहीं तरी कडकरामबरोबर इतके दिवस सतत राहून त्याला पैची प्राप्ती झालेली नव्हती. त्याच्या बायकापोरांनीं त्याला त्याबाबत ि असतें. त्यांना पैशाची जरुरी होती. राजकुमारीच्या मुक्ततेसाठीं त्यानें रामला पैसे देण्याचें मान्य केलें.

वाटेंत एका झाडाखालीं त्यांनीं मुक्काम केला. रात्र होऊं लागली कडकरामनें फटके मारून घेण्याची तयारी केली. एका झाडाजवळ उ तो स्वतः फटके मारून घेऊं लागला. ओरडूं-ओरडूं लागला. वास्त अतिशय हलक्या हातानें फटके मारून घेत होता, परंतु ओरडत होता म मोठ्यानें. अंधार पडल्यावर स्वतःच्या पाठीऐवजीं झाडालाच तो फटके युक्तीनें मारूं लागला ! जोरजोरानें ओरडूं लागला. कडकरामला वाई होतें. पण त्याशिवाय इलाज नव्हता. कडकरामनें त्याला फटके मार करण्यास सांगितलें. पण तो ऐकेना. तीन हजार फटके पूर्ण झाल्यावरच त खालीं बसला. आपल्या प्रामाणिक नोकराचें हें साहस पाहून कडकरामला धन्यता वाटली.

दोन-तीन दिवसांत ते गावीं पोहोंचले.

थोड्याच वेळांत सर्जा शिंपी, दादू न्हावी, शंकर वगैरे त्याच्या घरीं जमले खूप गप्पा झाल्या. कडकराम फार थकला होता. प्रवासाचा ताण पडला होता. त्यामुळें त्या दिवशीं तो लवकर झोंपला. पण झालेल्या पराभवामुळे त्याला चांगली झोप लागत नव्हती.

दुसऱ्या दिवसापासून कडकरामनें आपल्या आळींतील पोरेंबाळें गो करून पराक्रमाच्या कथा सांगण्यास आरंभ केला. त्याची कथनशैली आ होती. शिवाय अभिनयाची जोड त्याला असल्यामुळें बरेच बालगोपाळ होत असत. फडकरामहि अधूनमधून उपस्थित असे.

आतां सर्जा शिंपी व दादू न्हाव्यास फारशी काळजी नव्हती. रं व्यवस्थित काम केलें होतें. बकुळा आनंदांत होती.

फक्त विजयाद ... ा सीमोल्लंघनास जात वर्षांतून एकदांच ... रून घ्यावी लागत असे

BVBK-0400025